RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com

**श्री काडसिद्धेश्वर गुरुभक्त मंडळातर्फे वार्षिक सत्संग सोहळा संपन्न**

पान २ वर

# मराठी अक्रॉस मुंबई

संपादक - संजय मंगेश भैरे

**सरकारी सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हीच प्रशासनाची ओळख - महापौर तावडे**

पान ३ वर

वर्ष: ११ अंक :१६ ■ मुंबई, मंगळवार १७ ते २३ मार्च २०२६ मूल्य - ५.०० रुपये ■ पाने - ८

## एलपीजी जहाज 'शिवालिक' होर्मुझ सामुद्रधुनी पार करून गुजरातच्या मुंद्रा बंदरात दाखल



**मुंद्रा, वृत्तसंस्था**

एलपीजी वाहून नेणारे 'शिवालिक' हे जहाज होर्मुझ सामुद्रधुनी पार करून गुजरातमधील मुंद्रा बंदरात दाखल झाले आहे. आखाती प्रदेशात वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर या जहाजाच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत होते. माल उतरवण्यास कोणताही विलंब होऊ नये यासाठी बंदरात आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, प्राधान्याने धक्क्याची सोय आणि इतर व्यवस्था आधीच पूर्ण करण्यात आल्या होत्या.

नौवहन मंत्रालयाचे अधिकारी राजेश कुमार सिन्हा यांनी सांगितले की, पर्शियन आखातातील सर्व भारतीय खलाशी सुरक्षित असून मागील २४ तासांत कोणतीही घटना घडलेली नाही. परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात असून प्रत्येक जहाज आणि त्याच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क ठेवला जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

एलपीजी वाहक 'शिवालिक'ने १३ मार्च रोजी होर्मुझ सामुद्रधुनी पार केली. अधिकाऱ्यांनी सांगितले की, जहाज बंदरात पोहोचण्यापूर्वीच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि प्राधान्याने धक्का उपलब्ध करून देण्याची तयारी करण्यात आली होती, जेणेकरून जहाज आल्यानंतर माल उतरवण्यात कोणताही विलंब होऊ नये.

सध्या या प्रदेशात कार्यरत असलेल्या २२ भारतीय जहाजांबाबत अधिकृत पुष्टी झाल्यानंतरच सविस्तर माहिती दिली जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. सरकारनेही या भागातील जहाजांशी सातत्याने संपर्क ठेवला असून अधिकृत माहिती मिळताच अद्ययावत माहिती जाहीर केली जाईल, असे स्पष्ट केले आहे.

## पाच राज्यांच्या निवडणुकीचे बिगुल वाजले

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

**देशातील पाच राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकले गेले असून केंद्रीय निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेऊन निवडणुकांची घोषणा केली. देशाचे लक्ष लागलेल्या पश्चिम बंगालसह तामिळनाडू, आसाम, पुद्दुचेरी आणि केरळ या राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत. केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी निवडणुकांच्या तारखांची घोषणा केली. विशेष म्हणजे या पाच राज्यांच्या निवडणुकांसह महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी मतदारसंघातील पोटनिवडणुकांचीही तारीख जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार पश्चिम बंगालमध्ये दोन टप्प्यांत निवडणुका होत असून २३ आणि २९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.**

निवडणुकांच्या तारखांची घोषणा करताना त्यांनी सांगितले की, आसाममध्ये सर्व १२५ मतदारसंघांमध्ये एका टप्प्यात मतदान होणार आहे. तसेच केरळमध्येही १४० विधानसभा मतदारसंघांसाठी एकाच टप्प्यात मतदान होईल. या दोन्ही राज्यांमध्ये ९ एप्रिल रोजी मतदान होणार असून ४ मे रोजी मतमोजणी केली जाईल. तामिळनाडूमधील २३४ विधानसभा मतदारसंघांसाठी २३ एप्रिल रोजी एका टप्प्यात मतदान होणार आहे. तर पश्चिम बंगालमध्ये २९४ विधानसभा मतदारसंघांसाठी दोन टप्प्यांत मतदान होणार असून १५२ आणि १४२ मतदारसंघांमध्ये अनुक्रमे २३ आणि २९ एप्रिल रोजी मतदान होईल. या सर्व विधानसभा निवडणुकांचे निकाल ४ मे रोजी जाहीर केले जाणार आहेत.

"गेल्या काही दिवसांत निवडणूक आयोगाने सर्व राज्यांचा दौरा करून तयारीचा आढावा घेतला. आयोगाने सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची भेट घेऊन त्यांच्या सूचनांचा स्वीकार केला. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक तसेच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचीही भेट घेतली. प्रशासनाने मतदार यादी पुनरावलोकनासाठी केलेल्या कामगिरीबद्दल बूथस्तरीय अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे," असे ज्ञानेश कुमार यांनी सांगितले. निवडणुका होत असलेली पाचही राज्ये भौगोलिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या भारताच्या विविधतेचे प्रतिनिधित्व करतात, असे सांगत त्यांनी मतदारसंख्या, मतदान कर्मचारी आणि निवडणूक यंत्रणेची माहिती दिली.

पाच राज्यांतील एकूण मतदारांची संख्या १७.४ कोटी इतकी आहे, तर एकूण ८२४ विधानसभा मतदारसंघ आहेत. या मतदान प्रक्रियेसाठी एकूण २.१९ लाख मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून सुमारे २५ लाख कर्मचारी निवडणूक प्रक्रियेत कार्यरत राहणार असल्याची माहितीही आयोगाने दिली.




पश्चिम बंगाल – २३ व २९ एप्रिल
तामिळनाडू – २३ एप्रिल
केरळ – ९ एप्रिल
आसाम – ९ एप्रिल
पुद्दुचेरी – ९ एप्रिल
सर्व राज्यांची मतमोजणी- ४ मे रोजी

### बारामती आणि राहुरी पोटनिवडणूक २३ एप्रिल रोजी

महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीचीही घोषणा केली आहे. बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक २३ एप्रिल रोजी होणार आहे. तर ४ मे रोजी या पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे.

### पश्चिम बंगालमध्ये भाजपविरुद्ध ममता बॅनर्जी यांचे आव्हान

२९४ विधानसभा मतदारसंघ असलेले पश्चिम बंगाल राज्य सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील मानले जाते. त्यामुळे येथे केंद्रीय सुरक्षा दलांच्या सुमारे ४८० कंपन्या आधीच तैनात करण्यात आल्या आहेत. आयोगाने स्पष्ट केले आहे की, केंद्रीय दलांच्या तैनातीबाबतचा निर्णय आता जिल्हा पोलिस प्रमुखांऐवजी आयोगाकडून नियुक्त करण्यात आलेले पोलिस निरीक्षक जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून घेतील. दरम्यान, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी या सलग चौथ्यांदा सत्ता टिकवून ठेवण्याच्या तयारीत आहेत, तर विरोधी पक्ष असलेला भाजप सत्तांतर घडवून आणण्यासाठी पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरला आहे. येथे निवडणुका विशेष तीव्र पुनरावलोकन प्रक्रियेनंतर होत असून, हा मुद्दा राजकीय वादाचा ठरून सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचला होता.

### तामिळनाडूमध्ये स्टॅलिन यांच्यासमोर सत्तेचे आव्हान

तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रविड मुनेत्र कळघमचे प्रमुख एम. के. स्टॅलिन सलग दुसऱ्यांदा सत्ता कायम ठेवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यांना अखिल भारतीय अण्णा द्रविड मुनेत्र कळघम आणि भारतीय जनता पक्षाच्या युतीचे आव्हान असेल. मात्र यंदाच्या निवडणुकीचे मोठे आकर्षण म्हणजे अभिनेते आणि राजकारणी विजय यांनी आपल्या 'तमिळगा वेत्री कळघम' या पक्षासह राजकारणात प्रवेश केला आहे. त्यामुळे यंदा राज्यातील निवडणूक लढत तिरंगी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### केरळमध्ये डावे आणि काँग्रेस यांच्यात पारंपरिक लढत

केरळमध्ये नेहमीप्रमाणे डावे आघाडी आणि काँग्रेस आघाडी यांच्यातच मुख्य सामना रंगणार आहे. दर पाच वर्षांनी सत्ता बदलण्याची परंपरा असलेल्या या राज्यात भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) चे ज्येष्ठ नेते पिनराई विजयन सलग दुसऱ्यांदा विजय मिळवण्याच्या प्रयत्नात आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील निकालांमुळे काँग्रेसचा आत्मविश्वास वाढला असला, तरी अंतर्गत गटबाजी नियंत्रणात ठेवण्याचे मोठे आव्हान त्यांच्या समोर आहे.

### आसाममध्ये सरमा यांच्या नेतृत्वाची परीक्षा

ईशान्य भारताचे प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या आसाममध्ये मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा दुसऱ्या कार्यकाळासाठी सज्ज आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते गौरव गोगोई यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पुनरागमनाची आशा व्यक्त करत आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांत माजी प्रदेशाध्यक्ष भूपेन बोरा यांच्यासह अनेक प्रमुख नेत्यांनी पक्ष सोडल्यामुळे काँग्रेससमोरील आव्हाने अधिकच वाढली आहेत.

## बारामतीमधून सुनेत्रा पवार लढणार

**मुंबई, प्रतिनिधी**

केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आज तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, केरळ आणि पुदूचेरी या ठिकाणच्या विधानसभा निवडणुकांची घोषणा केली. या निवडणुकीसोबत महाराष्ट्रातील विधानसभेच्या रिक्त जागांवर पोटनिवडणूक जाहीर झाली. भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनाने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त झालेली आहे. तर, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारीला झालेल्या विमान अपघातात निधन झाले. यामुळे बारामती विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त आहे. या दोन्ही जागांची पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली. बारामतीची जागा राष्ट्रवादी काँग्रेस लढवणार असून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या जागेवर लढणार असल्याचे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितले आहे. तर राहुरीच्या जागेवर माजी आमदार प्राजक्त तनपुरे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून इच्छुक आहेत. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवार दिला जाणार नसल्याची माहिती आहे.

### राहुरी आणि बारामती पोटनिवडणूक बिनविरोध व्हाही हा प्रयत्न- मुख्यमंत्री

राज्यातील महापालिका, विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुकांनंतर आता सर्वांचे लक्ष बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीकडे लागले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजप आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर या दोन्ही जागा रिक्त झाल्या आहेत. या जागांवर लवकरच पोटनिवडणूक लागण्याची



शक्यता वर्तवली जात आहे. आता या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक मोठी घोषणा केली आहे. या दोन्ही निवडणुका बिनविरोध व्हाव्यात यासाठी आमचा प्रयत्न आहे, असे विधान देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा ३९ वा पदवीदान समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डॉक्टर ऑफ सायन्स ही मानद पदवी बहाल करण्यात आली. या सन्मानामुळे मुख्यमंत्री आता डॉक्टर देवेंद्र फडणवीस झाले आहेत. या कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीसांनी पोटनिवडणुकीवर भाष्य केले.

बारामती आणि राहुरी या दोन्ही जागांवर होणारी निवडणूक बिनविरोध व्हावी अशी आमची इच्छा आहे. यासाठी सर्वांनी एकमताने निर्णय घ्यावा असा आमचा प्रयत्न आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. मात्र, जर ही निवडणूक आमच्यावर लादली गेली, तर आम्ही ती पूर्ण ताकदीने लढायला तयार आहोत, असा इशाराही देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

## सिलिंडर वाटपाचा प्राधान्यक्रम निश्चित

**मुंबई, प्रतिनिधी**





इराणवर इस्रायल आणि अमेरिकेने क्षेपणास्त्र हल्ले केले आणि त्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांचा मृत्यू झाला. त्यानंतर इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यात युद्ध भडकले असून या संघर्षाचा आज सतरावा दिवस आहे. या युद्धामुळे जगातील अनेक देशांमध्ये इंधन टंचाई निर्माण झाली आहे. महाराष्ट्रासह देशभरात एलपीजी गॅसचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे. नागरिकांना सिलिंडर मिळवण्यासाठी लांबच लांब रांगा लावाव्या लागत आहेत. व्यावसायिक वापराच्या सिलिंडरवर प्रतीक्षा यादी लागल्याने हॉटेल व्यवसायावरही गंभीर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, गॅस टंचाई आणि पर्यायी उपाययोजनांबाबत राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी विधान परिषदेत माहिती दिली.

घरगुती वापराच्या सिलिंडरच्या किमतीत वाढ झाली आहे. व्यावसायिक सिलिंडरची किंमत पूर्वी १७२० रुपये होती, ती आता १८३५ रुपयांवर पोहोचली आहे. घरगुती सिलिंडरचे दरही वाढले आहेत. घरगुती वापरासाठी देण्यात येणाऱ्या तीन सिलिंडरवर शासनाकडून अनुदान दिले जाते. बीपीसीएल आणि एचपीसीएल या कंपन्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा केल्यानंतर त्यांनी एलपीजीचे उत्पादन ९ हजार मेट्रिक टनांवरून ११ हजार मेट्रिक टनांपर्यंत वाढविल्याची माहिती दिली. सध्या निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

घरगुती गॅसची गरज पूर्ण केल्यानंतर उरलेल्या गॅसच्या वाटपासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्राधान्यक्रम निश्चित केला आहे. त्यानुसार रुग्णालयांना शंभर टक्के प्राधान्य देण्यात आले आहे. शैक्षणिक संस्था, सार्वजनिक सेवा, स्मशानभूमी आणि अनाथालयांनाही शंभर टक्के प्राधान्य देण्यात आले आहे. संरक्षण क्षेत्र, पोलीस यंत्रणा, हवाई वाहतूक तसेच रेल्वे स्थानकांवरील उपहारगृहांना सत्तर टक्के प्राधान्य देण्यात आले आहे, तर औषध उद्योगाला पन्नास टक्के प्राधान्य देण्यात आले आहे. घरगुती वापराची गरज पूर्ण केल्यानंतर जर सिलिंडर उपलब्ध राहिले, तर या प्राधान्यक्रमानुसार त्यांचे वितरण केले जाईल, अशी माहिती छगन भुजबळ यांनी विधान परिषदेत दिली.

गॅस पुरवठा हा केंद्र सरकारच्या अखत्यारीतील विषय आहे. केंद्र सरकारकडे एलपीजी आणि पीएनजीचा पुरेसा साठा असल्याची माहिती देण्यात आली असून नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही. अनावश्यक गर्दी करणे किंवा गॅसचा काळाबाजार करणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि इतर अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. या समित्यांमार्फत आतापर्यंत २१२९ चौकशा करण्यात आल्या आहेत. या कारवायांमध्ये १२०८ गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले असून सुमारे ३३ लाख ६६ हजार ४११ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात एकूण २३ गुन्हे दाखल करण्यात आले असून १८ जणांना अटक करण्यात आली आहे, अशी माहितीही मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

### केरोसीन पुन्हा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न

राज्यात केरोसीनचा साठा उपलब्ध आहे. मात्र नागपूर खंडपीठाने यापूर्वी एक निर्णय देत केरोसीनचा पुरवठा थांबवण्यास सांगितले होते, कारण बहुतांश नागरिकांनी उज्ज्वला गॅस योजनेचा लाभ घेतला होता. सध्याची परिस्थिती लक्षात घेता उच्च न्यायालयाला परिस्थितीची माहिती देऊन केरोसीन पुन्हा उपलब्ध करून देण्याची परवानगी मागावी लागेल. त्यानंतर सरकारी कंपन्यांच्या पेट्रोल पंपांवर केरोसीन उपलब्ध करून देण्याचा विचार आहे, असेही मंत्री भुजबळ यांनी सांगितले.

## बिडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प - ८६४ सदनिकांचे वितरण

**मुंबई,प्रतिनिधी**




मुंबईतील नायगाव बिडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संकुलातील ८६४ सदनिकांचा वितरण समारंभ आज पार पडला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते या सदनिकाधारकांना चाव्यांचे प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आले. त्यामुळे हा दिवस त्यांच्या आयुष्यात पाडाव्या आधीच गोडवा आणणारा ठरला.

यावेळी बोलताना, बीडीडी चाळीत राहणारे सर्वजण आता टॉवरमध्ये राहणार आहेत, एक वेगळा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर आज चाव्या घेताना पहिला असल्याचे शिंदे यांनी म्हटले. आज अनेकांचे नवीन घरात जाण्याचे स्वप्न पूर्ण होत आहे याचा मला विशेष आनंद आहे. देवेन्द्रजी मुख्यमंत्री असताना या प्रकल्पाला सुरुवात झाली, त्यानंतर मधल्या काळात सरकार बदलले, त्यामुळे काही स्पीडबेकर मध्ये आले. देवेंद्रजीना कालच 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवी मिळाली, मी जरी डॉक्टर नसलो तरी २०२२ ला आम्ही दोघांनी मिळून एक ऑपरेशन केले, त्यामुळेच नंतर प्रकल्पाला पुन्हा गती मिळाली असे नमूद केले. ३० जूनला पुन्हा सरकार स्थापन झाल्यावर दोनच महिन्यात या प्रकल्पातील पोलिसांना सवलतीमध्ये घरे देण्यासह अनेक महत्त्वाचे निर्णय आम्ही घेतले. घर हे प्रत्येकाचे स्वप्न असते आणि स्वप्नपूर्तीचा जो आनंद असतो तो सगळ्यात जास्त असतो, आज ते स्वप्न बीडीडीवासियांचा पूर्ण होते आहे याचा मला विशेष आनंद वाटत असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले.

घर हा कुटुंबाच्या सुख समाधानाचा, आत्म सन्मानाचा सुख समृद्धीचा पाया आहे. बीडीडी चाळीना अनेक वर्षांचा ऐतिहासिक वारसा आहे. या चाळीनी स्वातंत्र्याचा लढा अनुभवला आहे, गिरण्यांचा सुवर्णकाळाच्या त्या साक्षीदार आहेत, कामगार चळवळ, दलीत पँथर चळवळ अशा अनेक चळवळी पहिल्या आहेत. पिढ्यानपिढ्या या चाळीत राहणाऱ्यांचे सामाजिक आणि संस्कृतिक ऋणानुबंध या वास्तुशी जोडले गेले आहेत. तीन ते चार पिढ्या आपल्या या चाळीत गेल्या. १५० ते १६० फुटांच्या चाळीत आयुष्य काढणे किती अवघड असते हे आम्हाला चांगले माहीत आहे. त्यामुळेच सर्वसामान्य माणसावर चांगले दिवस आले पाहिजे, त्याला चांगले आणि त्यांच्या हक्काचे घर मिळायला हवे हीच महायुती सरकारची भूमिका असल्याचे शिंदे यांनी यावेळी सांगितले.

## विधानभवनाच्या सुरक्षेला 'बोगस' पासाचा सुरुंग

**मुंबई, प्रतिनिधी**



राज्याच्या विधीमंडळात सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा उत्साह असतानाच, विधानभवनाच्या अभेद्य सुरक्षेचे धिंडवडे काढणारा एक अत्यंत धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या नावे आणि एमआयडीसीच्या बनावट लेटरहेडचा वापर करून चक्क ५० बोगस प्रवेशिका (पास) विकल्या गेल्याचा खळबळजनक खुलासा खुद्द मंत्र्यांनीच सभागृहात केला आहे. अवघ्या दोन दिवसांपूर्वी विधानभवन बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळालेली असताना, अशा प्रकारे ५ ते ७ हजार रुपयांना पासांची विक्री होणे, हा प्रकार सुरक्षेच्या चिंधड्या उडवणारा ठरला आहे. उदय सामंत यांनी याप्रकरणी सभापतींकडे अत्यंत गंभीर तक्रार केली असून, एमआयडीसीच्या लेटरहेडची हुबेहूब रंगीत झेरॉक्स काढून त्यावर अधिकाऱ्यांच्या बनावट सह्या केल्याचे समोर आले आहे. काही शिपायांच्या मदतीने २००० ते ५००० रुपयांपर्यंत पैसे घेऊन हे पास वाटण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, आमदार अमोल मिटकरी यांनीही यापूर्वीच काही अनोळखी लोक आणि विशिष्ट संघटनेचे कार्यकर्ते विधानभवन परिसरात वावरत असल्याचे ट्विट करून सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. "कठोर नियम असतानाही हे लोक आत आले कसे आणि त्यांनी विधीमंडळाच्या दालनात जेवण करून पुस्तके वाटली कशी?" असा सवाल मिटकरींनी विचारल्याने सरकारची कोंडी झाली आहे. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून सभापती राम शिंदे यांनी तातडीने चौकशी समिती नेमण्याचे आदेश दिले असून, दोषींवर अधिवेशन संपेपर्यंत कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. तर गृहराज्यमंत्री (ग्रामीण) पंकज भोयर यांनी एसआयडीसीच्या अहवालानंतर अंतिम निर्णय घेणार असल्याचे स्पष्ट केले आहे. एका बाजूला बॉम्बच्या धमकीमुळे कडेकोट बंदोबस्ताचा दावा केला जात असताना, दुसरीकडे अशा प्रकारे चक्क मंत्र्यांच्या नावाने पासांची विक्री होणे, याला जबाबदार 'बोलविता धनी' कोण? असा संतप्त प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

## सिद्धगिरी नर्सिंग महाविद्यालय महाराष्ट्रासाठी आदर्श : डॉ. रामलिंग माळी

**कोल्हापूर, प्रतिनिधी**

सिद्धगिरी गुरुकुल फाउंडेशन अंतर्गत सिद्धगिरी नर्सिंग इन्स्टिट्यूट येथे बी.एस.सी.नर्सिंग ६ वी बॅच व जी.एन.एम. नर्सिंग ४ थी बॅच यांचा "लॅम्प लाईटिंग व शपथविधी समारंभ" परमपूज्य काडसिद्धेश्वर स्वामीजी यांच्या पावन उपस्थितीत प्रेरणादायी व उत्साही वातावरणात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सिलचे अध्यक्ष डॉ. रामलिंग माळी व कोल्हापूर सर्कलचे आरोग्य उपसंचालक डॉ. दिलीप माने उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना रामलिंग माळी बोलत होते.

डॉ. माळी पुढे म्हणाले, "नर्सिंग या व्यावसायिक कोर्ससाठी काही लोक आवड म्हणून येतात तर काही लोक नाईलाज म्हणून हा व्यवसाय निवडतात. पण नर्सिंग हे एक आदर्श क्षेत्र आहे. या क्षेत्राकडे आवडीने लक्ष देवून काम केल्यास निश्चितच आपण प्रभावी काम करू शकता. महाराष्ट्रातील अनेक शहरात हि सिद्धगिरी महाविद्यालया सारखे आदर्शवत व सुविधांनीयुक्त महाविद्यालय चालवणे अशक्यप्राय आहे. खर तर सिद्धगिरी नर्सिंग महाविद्यालय सर्वांच्यासाठी एक आदर्श महाविद्यालय ठरेल." असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

आरोग्य उपसंचालक डॉ. दिलीप माने यावेळी म्हणाले, "नर्सिंग कर्मचारी यांची आरोग्य विभागात मागणी मोठी आहे. चांगले परीचारीक्तेचे शिक्षण घेतलेले आणि प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ मिळणे हि दुरापास्त होत चालले आहे. सिद्धगिरी नर्सिंग महाविद्यालय केवळ नर्सिंग स्टाफ तयार करत नाही तर संस्कारांची जोड असणारी, सामाजिक ऋण म्हणून सेवा कार्यास तत्पर असणारी एक पिढी तयार करणारा स्त्रोत आहे. परमपूज्य स्वामीजींच्या मार्गदर्शनाखाली महान सेवा कार्य या ठिकाणी चालू आहे, त्यात शासन म्हणून नक्कीच आमचा वाटा असेल."





या कार्यक्रमास परम पूज्य श्री काडसिद्धेश्वर स्वामीजी यांची पावन उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वामीजी म्हणाले,"काहीही विचार न करता आणि निरभय भावनेने जी सेवा केली जाते, तीच खरी सेवा असते. ती करण्यासाठी तुम्ही हे क्षेत्र निवडले आहे. हे अत्यंत पवित्र क्षेत्र आहे. यापेक्षा दुसरे पवित्र क्षेत्र असूच शकत नाही. ज्याची सेवा जन्मदात्यांनाही करता येत नाही, त्यांची सेवा करण्याचे सौभाग्य तुम्हाला लाभले आहे."स्वामीजींच्या या हृदयस्पर्शी शब्दांनी विद्यार्थ्यांना सेवाभावाची नवी प्रेरणा दिली. यावेळी प्रस्तावना करताना विवेक सिद्ध यांनी सिद्धगिरी मठाचा १३५० वर्षांचा वारसा विशद करत मठाचे विविध प्रकल्प आणि नर्सिंग महाविद्यालयाचा प्रवास विशद केला. यावेळी आभार प्रदर्शन डॉ. वैशाली सावंत यांनी केले.

या कार्यक्रमास सिद्धगिरी संस्थान मठाचे ट्रस्टी प्रताप भोसले, सिद्धगिरी नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या प्रा. रेगिना सातवेकर, उपप्राचार्य सुरज चोपडे, सिद्धगिरी संस्थान मठाचे कार्यकारी संचालक यशवर्धन बारामतीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी गुंडोपंत वड, सिद्धगिरी हॉस्पिटलच्या जननी विभागाच्या संचालिका डॉ. वर्षा पाटील, मानव संसाधन विभाग प्रमुख विवेक सिद यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सेवाधर्माची शपथ घेत ज्ञानाचा दीप हाती घेत आपल्या व्यावसायिक जीवनाचा नवा अध्याय सुरू केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लीना काळे व वर्षा साने यांनी केले. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यसभा निवडणूक : बिहारच्या पाचही जागांवर एनडीएचा विजय

**पाटणा, वृत्तसंस्था**

बिहारमध्ये सोमवारी राज्यसभेच्या निवडणुकीतील मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर एनडीएने पाचही जागांवर विजय मिळवला. मात्र मतदान प्रक्रियेदरम्यान आमदारांना धमकावणे व त्यांची फोडाफोड केल्याचा आरोप करत विरोधकांनी तीव्र आक्षेप नोंदवले. काँग्रेस आणि राजदच्या नेत्यांनी काही आमदार मतदानापूर्वी गायब झाल्याचा दावा करत भाजपने निकालावर प्रभाव टाकल्याचा आरोप केला. सत्ताधारी आघाडीने हे सर्व आरोप फेटाळून लावले. दरम्यान, विरोधी पक्षांच्या नेत्यांनी मतमोजणी पारदर्शक पद्धतीने करण्याची मागणी करत मतदानावेळी अनुपस्थित राहिलेल्यांविरुद्ध कारवाई करण्याचा इशारा दिला.

बिहार काँग्रेसचे अध्यक्ष राजेश राम यांनी मतदानापूर्वी काँग्रेसचे तीन आमदार बेपत्ता झाल्याचा आरोप करत ही परिस्थिती भाजपनेच निर्माण केल्याचे म्हटले. त्यांच्या म्हणण्यानुसार हे आमदार १३ मार्चपर्यंत पक्षाच्या संपर्कात होते, परंतु त्यानंतर अचानक त्यांच्याशी संपर्क तुटला.



"आमचे आमदार भाजपने पळवून नेले आहेत. १३ मार्चच्या रात्रीपर्यंत ते आमच्या संपर्कात होते, पण त्यानंतर अचानक त्यांच्यापैकी तिघांशी संपर्क होत नाही. त्यांना नजरकैदेत ठेवले असून त्यांच्या घराबाहेर पोलिस तैनात केल्याची माहिती आम्हाला मिळाली," असे राम यांनी सांगितले.

राम यांनी पुढे म्हटले की अशा घटना नवीन नाहीत आणि निवडणुका जिंकण्यासाठी भाजप अन्यायकारक मार्गांचा वापर करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. या प्रकरणात सहभागी असलेल्या व्यक्तींविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यापूर्वी पक्षाचे वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### मतमोजणी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

राजदचे नेते तेजस्वी यादव यांनीही मतमोजणी प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करत विरोधकांकडे विजयासाठी पुरेशी मते असल्याचा दावा केला. त्यांच्या म्हणण्यानुसार राजदला ३७ मते मिळाली, तर एनडीए उमेदवाराला ३० मते मिळाली असून मतमोजणी पारदर्शक पद्धतीने व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

# श्री काडसिद्धेश्वर गुरुभक्त मंडळातर्फे वार्षिक सत्संग सोहळा संपन्न

**ठाणे, प्रतिनिधी**





श्री काडसिद्धेश्वर गुरुभक्त मंडळ (ठाणे-मुलुंड विभाग) यांच्या वतीने आयोजित २३ वा वार्षिक सत्संग सोहळा दि.१३ मार्च २०२६ रोजी ठाणे येथे गावदेवी मैदानात भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात प.पू. स्वामीजींनी 'आत्मा आणि अनात्मा' या विषयावर उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन करत आध्यात्मिक विवेचन केले.

सोहळ्याचा प्रारंभ पहाटेच्या मंगल समयी काकड आरतीने झाला, त्यानंतर सकाळच्या आणि दुपारच्या सत्रात भजनांचा कार्यक्रम रंगला. सायंकाळी स्वामीजींचे आगमन होताच भाविकांनी त्यांचे जल्लोषात आणि उत्साही वातावरणात स्वागत केले.

स्वामीजींनी आपल्या निरूपणात स्पष्ट केले की, या विस्तीर्ण विश्वात प्रामुख्याने दोनच तत्त्वे आहेत: डोळ्यांना दिसणारा 'व्यक्त प्रपंच' आणि डोळ्यांना न दिसणारा पण सर्वव्यापी असलेला 'अव्यक्त परमात्मा'. प्रपंच आणि परमात्मा यातील हा सूक्ष्म भेद ओळखणे म्हणजेच खरा 'विवेक' असल्याचे त्यांनी सांगितले.

"आत्मा असून दिसत नाही आणि अनात्मा नसूनही दिसतो," हे पटवून देताना स्वामीजींनी घड्याळाचे मार्मिक उदाहरण दिले. आपण जेव्हा घड्याळाकडे पाहतो, तेव्हा फिरणारे काटे (अनात्मा) दिसतात, पण त्यामागील न दिसणारे मशीन (आत्मा) असते, ज्याच्याशिवाय काटे फिरू शकत नाहीत. सामान्य माणूस नश्वर देहाला सत्य मानतो आणि शाश्वत आत्म्याला विसरतो, हेच सृष्टीचे गुपित असल्याचे त्यांनी नमूद केले. ज्याप्रमाणे आपल्याला विजेचे दिवे दिसतात, पण त्यातून वाहणारी वीज दिसत नाही, तरीही त्या प्रकाशाचे मुख्य कारण ती अदृश्य वीजच असते; त्याचप्रमाणे या जगात दिसणाऱ्या सर्व गोष्टींमागे एक अदृश्य शक्ती कार्यरत आहे. जर ती शक्ती नसेल, तर या जगातील कशाचेही अस्तित्व उरणार नाही. आपण सर्वजण दिव्यासारखे आहोत आणि आपल्या प्रत्येक हालचालीला कारणीभूत असणारी गोष्ट म्हणजे 'आत्मा'. हा आत्मा डोळ्यांना दिसत नाही, कानांना ऐकू येत नाही किंवा जिभेला त्याची चव कळत नाही. तो इंद्रियांच्या पलीकडचा, अगम्य आणि अभेद्य आहे. जरी तो आपल्याला जाणवत नसला, तरी त्याच्याच मार्गदर्शनाखाली सर्व कार्ये सुरू असतात. फूल आणि त्याचा सुगंध म्हणजे 'प्रपंच' किंवा 'अनात्मा' होय. परंतु, हे फूल ज्याच्या अस्तित्वामुळे फुलले आहे, तो 'आत्मा' आहे. आत्मा दिसत नाही, पण त्याचे अस्तित्व असल्याशिवाय फुलासारखी सुंदर गोष्ट निर्माण होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे झाड जिवंत राहण्यासाठी, त्याला फुले-फळे येण्यासाठी आत्म्याची गरज असते, तसेच मानवी शरीराचेही आहे. जर झाडातील आत्मा निघून गेला तर ते वाळून जाते. आपल्या शरीरातील इंद्रिये—जसे की डोळे, कान, नाक आणि बुद्धी—हे सर्व केवळ त्या आत्म्यामुळेच कार्यरत आहेत. शरीराला अस्तित्वात राहण्यासाठी आत्म्याची नितांत गरज आहे, परंतु आत्म्याला अस्तित्वात राहण्यासाठी शरीराची आवश्यकता नाही. शरीर नसतानाही आत्मा स्वतंत्रपणे राहू शकतो. हाच परमात्मा केवळ मंदिरात नसून प्रत्येक सजीवामध्ये व्यापलेला आहे.

परमात्मा किंवा आत्मा हा केवळ मंदिरांमध्येच नसून तो सर्वत्र व्यापलेला आहे. साध्या कष्टकऱ्यांमध्ये आणि सर्जनशील कलाकारांमध्येही तोच वास करतो. शेतात घाम गाळणारा शेतकरी असो किंवा कठीण दगडाला आकार देणारा मूर्तिकार, त्या प्रत्येकाच्या कष्टामागे आणि प्रेरणेमागे तीच दैवी शक्ती आहे. ऊन, वारा आणि पाऊस यांसारख्या निसर्गाच्या प्रत्येक रूपात तोच आत्मा सामावलेला असून निसर्गातील चैतन्य त्याच्यामुळेच टिकून आहे. अग्नीतील दाहकता, पाण्यातील ओलावा आणि आकाशातील विशालता हे सर्व त्या आत्म्याचेच अंश आहेत. वारा जो संचार करतो किंवा हालचाल करतो, त्या हालचालीचे मूळ कारणही तोच आत्मा आहे. आपल्या शरीरातील पंचमहाभूते देखील त्याच्यामुळेच सक्रिय आहेत. जोपर्यंत हा आत्मा शरीरात आहे, तोपर्यंतच शरीराची सर्व कार्ये सुरळीत चालतात; त्याच्या विना अगदी गवताचे पातेही हलू शकत नाही.

आपल्या शरीराच्या नखशिखांत भागात हा आत्मा भरलेला आहे, जो विविध प्रेरणा आणि शक्तींच्या माध्यमातून स्वतःची ओळख करून देतो. ज्याप्रमाणे दिवा लागल्यावर आपल्याला विजेचे अस्तित्व जाणवते, त्याचप्रमाणे शरीराच्या प्रत्येक कार्यावरून त्यातील चैतन्याचा म्हणजेच आत्म्याचा अनुभव येतो. सृष्टी हे एक कार्य असेल, तर त्यामागे नक्कीच कोणीतरी 'कारण' आहे. जशी साखरेची गोडी डोळ्यांना दिसत नाही पण ती अनुभवता येते, तसाच हा परमात्मा सर्वत्र असूनही केवळ अनुभवानेच ओळखता येतो.

अध्यात्मिक जग आणि भौतिक जग ही दोन वेगळी क्षेत्रे आहेत. भौतिक जगातील मापदंड हे आध्यात्मिक अनुभूतीसाठी पुरेसे नसतात. रसनेंद्रिय (जीभ) जिवंत असेल तरच आपल्याला पदार्थाची चव कळते, तसेच अंतर्मन जागृत असेल तरच आपल्याला त्या ईश्वरी तत्त्वाचा आभास होतो. मातीत बी पेरल्यावर त्याचे रोपात रूपांतर होणे किंवा एकाचे दहा होणे, हे सर्व त्या आत्म्याच्या शक्तीमुळेच घडते. म्हणूनच, दृश्य जगाच्या पलीकडे असलेल्या या अदृश्य पण शक्तिशाली आत्म्याला ओळखणे हाच जीवनाचा खरा उद्देश आहे.

माणसाचा देह दिवसभर काय व्यवहार करतो, हे आत्म्याला समजते. शरीराच्या हालचाली आणि क्रियांचा तो मुख्य जाणकार असतो. केवळ बाह्य शरीरच नाही, तर अंतर्मनात कोणते विचार आणि भावना सुरू आहेत, याचाही बोध आत्म्याला होतो. 'मला काही समजत नाही' किंवा 'मला काही माहिती नाही' असे आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा ते अज्ञानही ज्याला समजते, तोच खरा आत्मा आहे. जागृती (जागे असतानाचे व्यवहार), स्वप्न (झोपेत पाहिलेली दृश्ये) आणि सुषुप्ती (गाढ झोप) या तिन्ही अवस्थांचा आत्मा साक्षी असतो. रात्री झोप सुखात लागली की दुखात, गाढ होती की अर्धवट, हे सकाळी उठल्यावर जो सांगतो, तोच तो चैतन्यमय आत्मा होय. आत्म्यावर पाच प्रकारचे कोश (आवरणे) असतात, ज्याप्रमाणे आपण शरीरावर कपडे घालतो. या पाचही कोशांच्या आत राहून तो त्यांचे कार्य पाहतो. २५ तत्त्वांचे बनलेले स्थूल शरीर आणि १७ तत्त्वांचे (५ ज्ञानेंद्रिये, ५ कर्मेंद्रिये, ५ प्राण, मन आणि बुद्धी) बनलेले सूक्ष्म शरीर ही आत्म्यावरील मुख्य आवरणे आहेत.

अन्नमय कोश: अन्नापासून रसाची, रसापासून रक्ताची आणि रक्तापासून वीर्याची निर्मिती होऊन हे शरीर बनते. अन्नावरच जगणारे हे शरीर 'अन्नमय कोश' म्हणून ओळखले जाते. प्राणमय कोश: शरीराच्या आत पाच प्रकारचे प्राण (प्राण, अपान, व्यान, उदान, समान) कार्यरत असतात. हे वायू शरीराच्या सर्व हालचाली आणि ऊर्जेचे नियंत्रण करतात. विज्ञानमय आणि मनोमय कोश: संकल्पात्मक विचार करणारी शक्ती म्हणजे मन आणि काय करावे किंवा काय करू नये हे ठरवणारी बुद्धी (विज्ञान), हे देखील आत्म्याला झाकणारे महत्त्वाचे कोश आहेत.

मानवी शरीरात अन्नामय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय असे पाच कोश असतात. मनोमय कोश हा संकल्प-विकल्पात्मक व्यवहार करतो, तर विज्ञानमय कोश निर्णयात्मक बुद्धीचे काम करतो. आनंदमय कोश आणि निद्रा: पाचवा कोश म्हणजे आनंदमय कोश, जो निद्रेच्या अवस्थेत अनुभवता येतो. गाढ झोपेत केवळ आनंदाचा अनुभव असतो आणि हा कोश देखील आत्म्यावर असलेल्या एका कवचासारखाच असतो.

या पाचही कोशांच्या पलीकडे राहून त्यांना आपापल्या कार्यासाठी प्रवृत्त करणारा जो घटक आहे, त्याला 'आत्मा' किंवा 'साक्षी' असे म्हटले जाते. आत्मा या सर्व कोशांचा केवळ द्रष्टा असतो. आत्मा हा केवळ शरीर आणि अवस्थांचाच साक्षी नाही, तर तो भूत, वर्तमान आणि भविष्य या तिन्ही काळांचा देखील साक्षी आहे. काल काय घडले, आज काय होत आहे आणि उद्या काय होणार आहे, या सर्वांचा स्वामी किंवा धनी हा आत्माच असतो.

जेव्हा हा अंश शरीरात राहतो, तेव्हा त्याला आपण 'आत्मा' म्हणतो आणि जेव्हा तो संपूर्ण सृष्टीत व्यापून राहतो, तेव्हा त्याला 'परमात्मा' असे संबोधले जाते. आत्मा हा अजर आहे, म्हणजेच तो कधीही जन्माला येत नाही आणि तो अमर आहे, म्हणजेच त्याला कधीही मृत्यू येत नाही. तो शाश्वत असून केवळ शरीरे बदलत राहतो.

शरीर परिवर्तन: ज्याप्रमाणे आपण जुने कपडे काढून नवीन कपडे परिधान करतो, त्याचप्रमाणे आत्मा एका शरीरातील भोग संपले की ते शरीर सोडून दुसरे शरीर धारण करतो.

मानवी जीवनात बालपण, तारुण्य आणि वृद्धत्व अशा विविध अवस्था येतात आणि जातात, परंतु आत्मा या सर्व बदलांमध्ये स्थिर राहतो. भगवद्गीतेतील 'देहिनोऽस्मिन्यथा देहे...' या श्लोकाद्वारे हेच तत्व स्पष्ट केले आहे.

विविध रूपांतील अस्तित्व: आत्मा आज मानवाच्या, तर उद्या प्राण्याच्या किंवा इतर कोणत्याही योनीतील शरीरात प्रवेश करू शकतो. शरीर स्त्रीचे असो वा पुरुषाचे, त्यातील चैतन्य तत्व एकच असते. स्वामीजी महाराजांच्या शिकवणीनुसार, 'मी' म्हणजे हे बदलणारे शरीर किंवा अवस्था नसून, मी तो न बदलणारा, अविनाशी 'आत्मा' आहे, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. असे असे प्रतिपादन करत स्वामीजींनी आत्मज्ञानाचे हे अमृत सर्वांना पाजले आणि मानवी जीवनाचे खरे ध्येय काय असावे, याची स्पष्ट दिशा दाखवून दिली.

मानवी शरीराचे विश्लेषण करताना त्यांनी स्थूल, सूक्ष्म आणि कारण शरीर तसेच अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय या पाच कोशांची माहिती दिली. आत्मा या सर्वांचा केवळ 'साक्षी' कसा आहे, हे त्यांनी ओघवत्या भाषेत मांडले. "मला काही समजत नाही" असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा ते अज्ञानही ज्याला समजते, तोच खरा 'आत्मा' असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

माणूस अनेकदा शरीराला शाश्वत मानतो आणि जे कधीही मरत नाही अशा आत्म्यासाठी रडत बसतो. शरीर नश्वर आहे हे ठाऊक असूनही ते मरू नये अशी आपली इच्छा असते आणि अमर आत्म्याला 'मेला' समजून आपण दुःख करतो. ही मानवाची एक प्रकारची विपरीत समजूत आहे, कारण सृष्टीचा नियम असा आहे की जुने जाते तेव्हाच नवीन गोष्टींना जागा मिळते. निसर्गात ज्याप्रमाणे झाडाची जुनी पाने गळतात आणि नवीन पालवी फुटते, तसाच नियम मानवी जीवनालाही लागू होतो. जर झाडाची सर्व फुले तशीच राहिली असती, तर फळे कधीच आली नसती; अनेक फुले गळतात तेव्हाच काही मोजक्या फुलांचे रूपांतर फळात होते. हे परिवर्तन सृष्टीचे सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी आणि जगाचा समतोल राखण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. या निरंतर चालणाऱ्या प्रक्रियेमागे जे मुख्य कारण आहे, त्यालाच आपण 'परमात्मा' किंवा 'आत्मा' म्हणतो. झाडाला नवी पालवी फुटणे हे त्यातील चैतन्याचे किंवा आत्म्याचे लक्षण आहे. शरीरात होणारे बदल किंवा परिस्थितीतील चढ-उतार हे बाह्य असले, तरी या सर्वांचा अनुभव घेणारा आणि त्यांना पाहणारा आत्मा हा सर्वांमध्ये सारखाच असतो.

ज्याला स्वतःच्या 'स्व'ची किंवा आत्मस्वरूपाची ओळख पटते, तोच खरा आनंदी आणि उल्लसित राहू शकतो. इतर सर्वजण अज्ञानामुळे दुःखी राहतात. प्रवचनात पाण्याचा दाखला दिला आहे की, जमिनीखाली जलवाहिन्या आधीच अस्तित्वात असतात. जेव्हा आपण त्यावरील माती आणि दगड दूर करतो, तेव्हाच आपल्याला त्या पाण्याचा आणि स्त्रोताचा आनंद घेता येतो. मानवी शरीर हे एका शेतासारखे आहे, ज्यामध्ये आनंदाचा झरा आधीपासूनच वाहत आहे. जर आपण अज्ञानाची माती दूर करून त्या आत्मतत्वाचा शोध घेतला नाही, तर आपण केवळ प्राण्यांप्रमाणे किंवा कीड्यांप्रमाणे जन्म घेऊन आणि खाऊन-पिऊन एक दिवस मरून जाऊ. जीवनाचे सार्थक करण्यासाठी स्वतःमधील त्या ईश्वरी अंशाला ओळखणे गरजेचे आहे.

मानवी जीवनात आनंदाचा अनुभव हा बाह्य गोष्टींवर नसून तो पूर्णतः आंतरिक असतो. आपण म्हणतो त्याप्रमाणे 'आनंदाचे डोही आनंद तरंग' हा अनुभव सहजासहजी येत नाही. माणूस या जगात जसा येतो, तसाच निघून जातो; परंतु मधल्या काळात तो खऱ्या आनंदाला मुकतो. हा आनंद मिळवण्यासाठी आपल्या अंतःकरणावर साचलेला अज्ञानाचा कचरा दूर करणे आवश्यक आहे. आपल्या आत्मिक आनंदावर अज्ञानाचे जे थर साचलेले असतात, ते केवळ सद्गुरूंच्या मार्गदर्शनानेच दूर होऊ शकतात. गुरुंनी सांगितल्याप्रमाणे जसा जसा हा अज्ञानाचा कचरा आपण बाजूला सारतो, तसतसा आत असलेला आनंदाचा झरा मोकळा होऊ लागतो. एकदा का हा झरा वाहू लागला की, व्यक्तीला प्रत्येक कार्यात आनंदाचा अनुभव घेता येतो.

ज्याप्रमाणे साखरेच्या पाकात आपण जे काही टाकतो, ते सर्व गोड होऊन जाते, तशीच अवस्था आनंदी व्यक्तीची होते. जेव्हा माणसाचा अंतरात्मा आनंदाने भरलेला असतो, तेव्हा त्याच्या मुखातून निघणारे शब्दही समोरच्याला आनंदच देतात. इतकेच नाही तर त्याची दृष्टी आणि वृत्ती ज्या ज्या गोष्टींकडे पाहते, त्या सर्व गोष्टी त्याला आनंदमयच दिसू लागतात. बाहेरच्या जगात आनंद नसून तो आपल्या अंतःकरणात आहे. आपण एखाद्याचे शब्द ऐकतो तेव्हा त्या शब्दांत आनंद नसतो, तर आपली वृत्ती आत्मानंदात बुडून ते शब्द ग्रहण करते, म्हणून आपल्याला आनंद वाटतो. जगातील वस्तू किंवा व्यक्ती आपल्याला सुख देऊ शकत नाहीत; तर आपली स्वतःची आंतरिक वृत्ती त्या अनुभवांना आनंदाचे स्वरूप देत असते.

संसारात अनेक लोकांचा असा गैरसमज असतो की त्यांना खाण्यापिण्यातून किंवा भौतिक सुखातून आनंद मिळतो. परंतु, खरे तर कोणत्याही बाह्य गोष्टीत आनंद नसतो. तो केवळ आपल्या मानण्यावर अवलंबून असतो. जर आपण मनात आनंद मानला तरच तो मिळतो, अन्यथा कितीही सुखसोयी असूनही माणूस दुःखीच राहू शकतो. केवळ एखादी गोष्ट माहीत असणे (जाणणे) पुरेसे नसते, तर ती मनात उतरवणे (मानणे) महत्त्वाचे असते.ताटात काय वाढले आहे यापेक्षा ते अन्न 'चांगले आहे' ही मनाची मान्यताच आपल्याला समाधान देते. साखरेचे गोडपणही ज्याला मधुमेह आहे त्याच्यासाठी 'कडू' (त्रासदायक) असू शकते, कारण त्याने तसे मानलेले असते.

सुख आणि दुःख हे आपल्या धारणेवर कसे अवलंबून असतात, हे सांगताना स्वामीजींनी कुंतीचे उदाहरण दिले . जेव्हा श्रीकृष्णाने कुंतीला वर मागायला सांगितले, तेव्हा तिने 'दुःख' मागितले. याचे कारण असे की, दुःखाच्या काळात भगवंताची सतत आठवण येते आणि त्या आठवणीतच तिला खरा आनंद मिळत होता. सुख किंवा दुःखाचा कोणीही स्वतंत्र दाता नसून ती आपल्या मनाची एक अवस्था आहे.

भगवान बुद्धांच्या उदाहरणातून स्वामीजींनी हे स्पष्ट केले की, जोपर्यंत आपण एखादी वाईट गोष्ट स्वीकारत नाही, तोपर्यंत ती आपल्याला त्रास देऊ शकत नाही. कोणी आपल्याला कितीही शिव्या दिल्या तरी आपण त्या न स्वीकारल्यास त्या देणाऱ्याकडेच राहतात. आपला आत्माच आपला मित्र किंवा शत्रू असू शकतो. आपण आनंदी राहायचे की दुःखी, हे पूर्णपणे आपल्या आंतरिक मान्यतेवर आणि वृत्तीवर अवलंबून असते. असे स्वामीजींनी समजून सांगीतले.

माणसाने आयुष्यात कोणत्या गोष्टींना महत्त्व द्यावे आणि कोणत्या गोष्टी सोडून द्यावे, हे स्वतः ठरवणे म्हणजे 'ज्ञान' होय. प्रपंचात वावरताना आपण अनेकदा बाह्य गोष्टींमध्ये अडकतो, परंतु खरे ज्ञान हे आपल्याला काय मानावे आणि काय मानू नये याची जाणीव करून देते. आत्मा हा शाश्वत आणि अविनाशी आहे. त्याला कोणत्याही प्रकारची इजा पोहोचत नाही किंवा त्याचा नाश होत नाही. जो कधी संपतच नाही, त्याच्यासाठी दुःख करण्यात काहीच अर्थ नाही. दुसरीकडे, शरीर आणि जगातील इतर भौतिक पदार्थ हे 'अनात्मा' आहेत. हे पदार्थ कितीही प्रयत्न केले तरी कायमस्वरूपी टिकणारे नाहीत. ते कधी ना कधी क्षीण होणारच आहेत, त्यामुळे त्यांच्यासाठी रडणे किंवा चिंता करणे व्यर्थ आहे. सृष्टीमध्ये जे काही दृश्य स्वरूपात दिसते ते सर्व 'अनात्मा' आहे आणि या संपूर्ण सृष्टीच्या मागे जे मूळ कारण आहे, तो 'परमात्मा' आहे. हे साधे सत्य ज्याला उमजते, त्याला अध्यात्माचे संपूर्ण सार समजले असे म्हणता येईल. अध्यात्म ऐकायला खूप सोपे आणि समजल्यासारखे वाटते, परंतु घरी जाईपर्यंत आपण ते विसरतो. याचे मुख्य कारण म्हणजे आपले विषयांवर, वस्तूंवर, पैशांवर आणि अधिकारावर जितके प्रेम आहे, तितके प्रेम आपल्या ज्ञानावर किंवा साधनेवर नाही. स्वामी महाराजांनी सांगितल्याप्रमाणे, जर आपण पूर्ण विश्वासाने या सत्याचा स्वीकार केला, तर तत्क्षणी आनंदाची प्राप्ती होऊ शकते. 'अहं ब्रह्मास्मी' किंवा 'मी आत्मा आहे' ही भावना सतत मनात जागृत ठेवणे मोक्षाच्या दिशेने नेणारे पाऊल आहे.

प्रपंचावर प्रेम करू नये असे नाही, परंतु ते प्रेम इतके नसावे की ज्यामुळे आपल्याला दुःख होईल. प्रपंचाचा स्वभावच 'येणे-जाणे' (आगम-अपाय) असा आहे. ज्या गोष्टी कायम टिकणार नाहीत, त्यांच्यासाठी रडण्यापेक्षा जे शाश्वत आहे त्याचे चिंतन करणे अधिक श्रेयस्कर आहे. शेवटी, जर आपण सतत आत्म्याचे स्मरण ठेवले, तरच आपल्याला खरा आनंद मिळू शकतो. अनात्म्यापासून दुःखी न होता, जगाकडे एक 'साक्षी' म्हणून पाहण्याची बुद्धी आणि शक्ती सद्गुरूंनी सर्वांना द्यावी. अशी प्रकारे पू. स्वामीजींनी आपल्या रसाळ निरूपणाचा समारोप केला.

सोहळ्याच्या प्रारंभी श्री. व सौ. दीपक कोरे यांनी प.पू. स्वामीजींची भावपूर्ण 'पाद्यपूजा' केली. त्यानंतर श्री. मंगेश देसाई यांनी समर्थ रामदास स्वामी विरचित 'दासबोध' ग्रंथाचे वाचन केले. स्वामीजींच्या प्रवचनापूर्वी सातारा जिल्ह्यातील नामवंत वक्ते प्रा. श्रीधर साळुंखे यांनी आपले 'विचारपुष्प' गुंफले. ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार आणि महाप्रसाद या सोहळ्याचे नियोजन श्री. ज्ञानदेव येसले आणि गुरुसेवक मंडळाने केले. मंडळाचे अध्यक्ष श्री. बाबुराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली हा सत्संग कार्यक्रम संपन्न झाला यावेळी ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला स्थानिक नगरसेवकांनी उपस्थित राहून मोलाची मदत केली. 'सिद्धगिरी नॅचरल' स्टॉलला सुद्धा अनेकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रात्री उशिरापर्यंत महाप्रसादाचे वाटप सुरू होते, हजारो भाविकांनी या सत्संगाचा लाभ घेतला.

## कोळसा पुरवठ्याची साखळी विस्कळीत झाल्याने हॉटेल व्यवसायाचे धाबे दणाणले

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबईची भूक भागवणाऱ्या हॉटेल व्यवसायावर सध्या एका अभूतपूर्व इंधन संकटाचे सावट पसरले आहे. मुंबईतील शिवडी परिसरातून होणाऱ्या कोळसा पुरवठ्याची साखळी विस्कळीत झाल्याने, शहरातील हजारो हॉटेल्स आणि उपहारगृहांची डोकेदुखी वाढली आहे. गॅस पुरवठ्यात आलेल्या तांत्रिक अडचणींमुळे हॉटेल मालकांनी आपला मोर्चा लाकडी कोळशाकडे वळवला खरा, पण आता हा पर्यायही संपण्याच्या मार्गावर असल्याने व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

शिवडी येथील कोळसा बाजारात सध्या कमालीची धावपळ पाहायला मिळत असून, दररोज साधारण १० ट्रक कोळसा मुंबईच्या विविध उपनगरांमध्ये रवाना होत आहे. मात्र, ही वाढलेली मागणी पूर्ण करताना घाऊक व्यापाऱ्यांची दमछाक होत आहे. सध्या व्यापाऱ्यांकडे उपलब्ध असलेला साठा केवळ पुढील १० दिवस पुरेल इतकाच शिल्लक आहे. जर येत्या १० दिवसांत गॅस पुरवठा पूर्ववत झाला नाही, तर मुंबईतील हॉटेल गाड्या आणि खानावळींसमोर मोठे संकट उभे ठाकण्याची शक्यता आहे.

मागणी आणि पुरवठा यांच्यातील या बिघडलेल्या गणिताचा थेट फटका आता सामान्यांच्या खिशाला बसू लागला आहे. कोळशाच्या दरात प्रति किलोमागे पाच रुपयांची वाढ झाली असून, साठा संपत आल्याने हे दर आगामी काळात अधिकच कडाडण्याचे संकेत मिळत आहेत. "गॅस नाही आणि आता कोळसाही मिळेनासा झाला, तर व्यवसाय करायचा कसा?" असा संतप्त सवाल शिवडीतील व्यापाऱ्यांनी उपस्थित केला आहे. परिस्थिती वेळेत न सावरल्यास हे इंधन संकट हाताबाहेर जाण्याची भीती वर्तवण्यात येत आहे

## महाराष्ट्रात मानवी तस्करीचे सावट? राष्ट्रीय आयोगाचा दणका

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह देशातील पाच राज्यांमध्ये बेपत्ता होणाऱ्या व्यक्तींच्या संख्येत झालेली चिंताजनक वाढ आणि पोलिसांच्या तपासातील कथित शिथिलतेमुळे 'राष्ट्रीय मानवी हक्क आयोगा'ने (NHRC) आता कडक पाऊल उचलले आहे. राज्याचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांना याप्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, अवघ्या दोन आठवड्यांत बेपत्ता व्यक्तींच्या स्थितीचा ताजा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोच्या (NCRB) धक्कादायक आकडेवारीनुसार, महाराष्ट्र, राजस्थान, बिहार, ओडिशा आणि तेलंगण या राज्यांमध्ये मानव तस्करीच्या घटना सर्वाधिक आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, बेपत्ता होणाऱ्या या व्यक्तींना भीक मागणे, बालमजुरी आणि वेश्यावृत्तीसारख्या काळोख्या जगात लोटले जात असल्याचा संशय आयोगाने व्यक्त केला आहे. विशेषतः अल्पवयीन मुलांच्या तस्करीत ओडिशा आणि बिहार आघाडीवर असून, मुलींच्या तस्करीत राजस्थान पहिल्या क्रमांकावर आहे.

महाराष्ट्रातील आकडेवारी अंगावर काटा आणणारी राज्याच्या विधिमंडळात सादर झालेली आकडेवारी महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे करणारी आहे. सन २०२४ मध्ये राज्यात एकूण ४५ हजार ६६२ महिला बेपत्ता झाल्या होत्या, त्यापैकी केवळ ३० हजार ८७७ महिलांचा शोध लागला आहे. याच काळात ११ हजार ३१६ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या होत्या, ज्यातील ८ हजार ४७५ मुलींना शोधण्यात पोलिसांना यश आले.

दुर्दैवाने, २०२५ मध्ये ही परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. या वर्षात बेपत्ता महिलांची संख्या वाढून ४८ हजार २७८ वर पोहोचली, तर त्यातील ३६ हजार ५८१ महिला सापडल्या आहेत. अल्पवयीन मुलींच्या बाबतीतही हा आकडा १२ हजार ३१६ इतका वाढला असून, त्यातील १० हजार २९५ मुली पुन्हा सापडल्या आहेत.

केवळ दोन वर्षांत ९० हजारांहून अधिक महिला आणि मुली बेपत्ता होणे, ही बाब मानवी हक्कांचे उल्लंघन असल्याचे आयोगाने म्हटले आहे. बेपत्ता व्यक्तींच्या शोधमोहिमेत पोलिसांकडून होत असलेली दिरंगाई ही गंभीर बाब असून, यावर राज्य सरकार आणि पोलीस प्रशासन आता कोणती पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या नोटिशीमुळे गृह विभागात मोठी खळबळ उडाली असून, आता शोधकार्याला वेग दिला जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## तीन वैद्यकीय महाविद्यालयांना मिळणार स्वायतत्ता

### माजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबईतील ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सर ज. जी. समूह रुग्णालय तसेच नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय या संस्थांना स्वायत्तता देण्यासंदर्भात सविस्तर धोरणात्मक आराखडा तयार करण्यासाठी राज्याचे माजी मुख्य सचिव जयंत कुमार बांठिया यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय नुकताच जारी केला.

समितीत टाटा मेमोरिअल रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. राजेंद्र बडवे, के.ई.एम. रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. संजय ओक, ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रणजीत माणकेश्वर, बी. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पुणे येथील प्राध्यापक आणि विभागप्रमुख डॉ. राजेश कार्यकर्ते, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलसचिव यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. महाराष्ट्र वैद्यक परिषदेचे प्रबंधक हे या समितीचे सदस्य सचिव असतील. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची सध्याची प्रशासकीय आणि शैक्षणिक संरचना, स्वायत्त दर्जा देण्याची आवश्यकता,संभाव्य लाभ, तसेच देश-विदेशातील यशस्वी मॉडेल्सचा अभ्यास ही समिती करणार आहे. समितीकडून एम्स, पीजीआय चंदीगड आणि टाटा



मेमोरिअलसारख्या संस्थांच्या व्यवस्थापन पद्धतीचा आढावा घेण्यात येणार आहे.

स्वायत्त महाविद्यालयांसाठी संचालक मंडळ आणि शैक्षणिक परिषद यांची रचना आणि अधिकार, संचालक/अधिष्ठाता यांचे अधिकार आणि जबाबदाऱ्या, स्वायत्त व्यवस्थेसाठी आवश्यक आर्थिक आणि प्रशासकीय यंत्रणेबाबत शिफारस करणे, आर्थिक स्वातंत्र्य, अंतर्गत महसूल निर्मिती, लेखापरीक्षण व्यवस्था, तसेच कर्मचारी आणि अध्यापकांसाठी नवीन सेवा अटी आणि धोरणे याबाबत समिती शिफारसी करणार आहे. आवश्यक कायदेशीर, प्रशासकीय आणि धोरणात्मक बदलांबाबतही समिती शासनाला मार्गदर्शन करणार आहे.

शासकीय शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता देताना त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रशासकीय आणि आर्थिक बाबींमध्ये अधिकारांचे हस्तांतरण सुचवणे, स्वायत्त संस्थेच्या कार्यक्षमतेसाठी देखरेख, मूल्यमापन आणि उत्तरदायित्व यंत्रणेबाबत शिफारस करणे, धोरणाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यासाठी आराखडा तयार करणे आदी कामे समिती करणार आहे.

## दिव्यांग विभागात आता रोबोटिक वेगाचा बदल

**मुंबई,प्रतिनिधी**

राज्यातील दिव्यांग बांधवांकडे पाहण्याचा सरकारी दृष्टिकोन आता केवळ 'मदत' करण्यापुरता मर्यादित न राहता, त्यांना हक्काने स्वावलंबी बनवण्याकडे वळला आहे. राज्य शासनाने एक ऐतिहासिक पाऊल उचलत 'दिव्यांग कल्याण विभागा'चे नाव बदलून आता "दिव्यांग सक्षमीकरण विभाग" असे केले आहे. केवळ नावच नव्हे, तर संपूर्ण विभागाची रचनाच बदलून त्यात आता कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि प्रगत तंत्रज्ञानाचा समावेश करण्यात आला आहे.

बदलाचे वारे आणि नवी रचना दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार आता दिव्यांग व्यक्तींना केवळ लाभार्थी न मानता त्यांना शिक्षण, कौशल्य आणि रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यावर शासनाने शिक्कामोर्तब केले आहे. नवीन रचनेनुसार, पुणे येथील 'दिव्यांग कल्याण आयुक्तालया'चे नाव आता 'दिव्यांग सक्षमीकरण आयुक्तालय' असे असेल. विशेष म्हणजे, प्रशासकीय कामातील अडथळे दूर करण्यासाठी मंत्रालयीन स्तरावरील फाईल फिरण्याचे पाच स्तर कमी करून आता केवळ तीन स्तरांवर आणले आहेत, ज्यामुळे निर्णयप्रक्रिया अत्यंत वेगवान होणार आहे.

२१०५ पदांचे जंगी भरती कवच विभागाच्या पुनर्रचनेनंतर शासनाने तब्बल २१०५ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता दिली आहे. यामध्ये १४५८ नियमित पदे असून २०१ नवीन पदांची निर्मिती करण्यात आली आहे. उर्वरित पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरली जातील. जिल्हा स्तरावर देखील 'दिव्यांग सक्षमीकरण कार्यालये' कार्यान्वित होणार असून मुंबईत जिल्हाधिकारी, तर इतर जिल्ह्यांत मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांच्या निगराणीखाली हे कामकाज चालेल.

पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा हात मानवी हस्तक्षेप कमी करून भ्रष्टाचार रोखण्यासाठी ऑनलाईन सेवा आणि कालबद्ध निकालांवर भर देण्यात आला आहे. माहिती तंत्रज्ञान आणि एआयच्या मदतीने दिव्यांगांच्या तक्रारी आणि गरजांचे निराकरण आता युद्धपातळीवर केले जाणार आहे. प्रशासकीय सुशासनावर भर देताना अनावश्यक प्रादेशिक व तालुका स्तरावरील पदे रद्द करून थेट जिल्हास्तरावरून सेवा देण्याचे धोरण राज्य सरकारने स्वीकारले आहे.

## धनगर आरक्षणासाठी राज्य सरकार सकारात्मक

**मुंबई, प्रतिनिधी**

धनगर आरक्षणासाठी राज्य सरकार सकारात्मक आहे. आरक्षणाबाबत कायदेशीर तोडगा काढण्यासाठी धनगर समाजाच्या शिष्टमंडळाची राज्याच्या महाधिवक्त्यांसोबत तातडीने बैठक आयोजित केली जाईल. जेणेकरून धनगर बांधवांच्या आरक्षणासंदर्भात कायदेशीर दिशा स्पष्ट होईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिली.

धनगर आरक्षणाच्या प्रश्नावर शुक्रवारी विधानभवनात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीत धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळण्यामागील कायदेशीर अडचणींवर चर्चा झाली.

महाराष्ट्रात लोकसंख्येच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात असलेल्या धनगर समाजाचे ऐतिहासिक योगदान आहे. धनगर समाजाचे आरक्षण कायद्याच्या चौकटीत टिकणारे असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने राज्याच्या महाधिवक्ता यांच्यासोबत धनगर समाजातील या विषयाचा अभ्यास असलेल्या प्रतिनिधींच्या बैठकीचे आयोजन तातडीने करण्यात येईल. त्यातून आरक्षणासाठीची कायदेशीर दिशा स्पष्ट होईल. कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देताना सर्व बाजू तपासून त्याची खातरजमा करुन आरक्षणाचा प्रस्ताव केंद्राकडे सादर करण्याची राज्य सरकारची भूमिका असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीला जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, राज्यसभा सदस्य रामराव वडकुते, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, विधि न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे, आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव विजय वाघमारे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज, पशुसंवर्धन दुग्धविकास विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. आदी उपस्थित होते.

# राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांना प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर

**मुंबई, प्रतिनिधी**

राज्याच्या ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांना अमेरिकेतील U.S. India SME Council, Washington DC तर्फे "Outstanding Visionary Leader & True Changemaker" हा प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



हा पुरस्कार १४ मार्च रोजी जाहीर करण्यात आला असून त्यांचा सत्कार २५ मार्च रोजी दिल्ली येथील भारत मंडपममध्ये आयोजित विशेष समारंभात करण्यात येणार आहे. राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी महाराष्ट्रात विशेषतः परभणी जिल्ह्यात ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. महिला उद्योजकांना प्रोत्साहन, लखपती दीदी योजना, ग्रामीण महिलांसाठी सिल्क अँड मिल्क उपक्रम, तसेच एकल महिला सशक्तीकरण अभियान यांसारख्या योजनांद्वारे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आल्याची माहिती परिषदेत देण्यात आली आहे.

अमेरिका-भारत आर्थिक सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी कार्यरत असलेली U.S. India SME Council ही संस्था लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे, नाविन्यपूर्ण उद्योजकता वाढविणे तसेच पायाभूत सुविधा, ऊर्जा, शाश्वत विकास, आरोग्य आणि ग्रामीण विकास अशा विविध क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढविण्यासाठी काम करते.

# सरकारी सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हीच प्रशासनाची ओळख - महापौर तावडे

**मुंबई, प्रतिनिधी**

'महाराजस्व अभियान' सारख्या उपक्रमांमुळे नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध होत आहेत. शासनाच्या सेवा नागरिकांच्या दारी पोहोचवणे हीच खरी लोकाभिमुख प्रशासनाची ओळख आहे, असे उद्गार महापौर रितू तावडे यांनी काढले. घाटकोपर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत आयोजित विशेष महसूल समाधान शिबिराला महापौर रितू तावडे यांनी भेट दिली. त्यावेळी त्या बोलत होत्या.



मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय अंतर्गत, कुर्ला तहसीलदार कार्यालय घाटकोपरमधील यांच्यावतीने उपाश्रया लेनमधील शेठ धनजी देवशी राष्ट्रीय शाळा येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून मुंबईच्या महापौर रितू तावडे या उपस्थित होत्या. नगरसेविका राखी जाधव, नगरसेविका निर्मिती कानडे, नगरसेवक धर्मेश गिरी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाच्या संकल्पनेतून राबवण्यात येत असलेल्या या अभियानाचा उद्देश नागरिकांच्या महसुली संदर्भातील दैनंदिन समस्या, विविध प्रमाणपत्रे व प्रलंबित अर्ज तात्काळ निकाली काढणे हा आहे. मंडळ स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या या विशेष शिबिरांमुळे शासनाच्या सेवा नागरिकांच्या जवळ पोहोचत असून प्रशासन अधिक गतिमान आणि लोकाभिमुख होत आहे, असे महापौरांनी नमूद केले तसेच शासनाच्या लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांसाठी कागदपत्र पडताळणी व पूर्तता (केवायसी) करून घेण्यासाठी एक दालन समाविष्ट करावे, अशी सूचना महापौरांनी केली.

या शिबिरामध्ये नागरिकांना उत्पन्न, रहिवास, जात, नॉन क्रिमिलेअर आदी विविध दाखले, ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र तसेच संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजना यांसारख्या विविध शासकीय योजनांसाठी अर्ज स्वीकृतीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली तसेच नागरिकांच्या अर्जाची पडताळणी, आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन तसेच प्रलंबित प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता करून घेण्याचे कामकाजही या शिबिरामध्ये करण्यात आले. यावेळी नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध योजनांचे लाभार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घेतला. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे अनेक शासकीय कामांसाठी नागरिकांना एका ठिकाणीच सुविधा उपलब्ध झाल्याने स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# राज्यातील हजारो करदात्यांना उच्च न्यायालयाचा मोठा दिलासा

**मुंबई, प्रतिनिधी**

जुन्या थकबाकीसाठी सेटलमेंट योजनेचा लाभ घेतलेल्या राज्यातील हजारो करदात्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. एखाद्या करदात्याने 'अ‍ॅम्नेस्टी स्कीम' अंतर्गत थकबाकीचा निपटारा करण्यासाठी अर्ज केला असल्यास सरकार त्यांचा जुना टॅक्स रिफंड नवीन मागणीविरुद्ध परस्पर वळता करू शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला.



'प्रेसिडेंट ट्रेड अँड एक्झिम कॉर्पोरेशन' नावाच्या कंपनीने दाखल केलेल्या याचिकेवर न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. आरती साठे यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. कंपनीचा २००७-०८ या वर्षाचा ३३.२९ लाख रुपयांचा रिफंड सरकारकडे प्रलंबित होता. याचदरम्यानच्या काळात सरकारने प्रलंबित कर विवादांसाठी 'महाराष्ट्र थकबाकी तडजोड योजना २०२३' जाहीर केली. त्या योजनेंत याचिकाकर्त्या कंपनीने २००८-०९ आणि २००९-१० या वर्षांतील थकबाकीचा निपटारा करण्यासाठी अर्ज केला आणि नियमानुसार २० टक्क्यांची रक्कम भरली.

मात्र, विक्रीकर विभागाने कंपनीचा आर्थिक वर्ष २००७-०८ चा रिफंड थेट २००८-०९ च्या थकबाकीशी वळता केला आणि रिफंड देण्यास नकार दिला. यावर याचिकाकर्त्या कंपनीच्या वकिलांनी जोरदार आक्षेप घेतला.

त्यावर सरकारची बाजू ऐकून घेत मुंबई उच्च न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठाने निर्णय दिला. 'सेटलमेंट अ‍ॅक्ट' हा एक स्वतंत्र कायदा आहे. या कायद्यांतर्गत एकदा करदात्याने या योजनेचा लाभ घेतला की, तो थकबाकीतून मुक्त होतो. परताव्याची रक्कम अशा प्रकारे थकबाकीशी वळती करणे हे सेटलमेंट योजनेच्या उद्देशाला हरताळ फासणारे आहे, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने नोंदवले आणि १८ एप्रिल २०२४ रोजी कर विभागाचा आदेश रद्द केला. याचवेळी याचिकाकर्त्या कंपनीचा ३३.२९ लाख रुपयांचा रिफंड व्याजासह २ आठवड्यांच्या आत कंपनीच्या खात्यात जमा करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले.

# मुंबई निवासी गोमंतकांचा शिवसेना मेळावा संपन्न

**मुंबई, प्रतिनिधी**



शिवसेनेचे मुख्यनेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली गोवा राज्यामध्ये शिवसेना पक्षाचा प्रवेश होवून एक वर्षाचा कालावधी झाला आहे. २०२७ साली होणा-या गोवा राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभुमीवर गोव्यात शिवसेना पक्षाच्या बांधणीसाठी मुंबईतील गोमंतक वासीयांचा मेळावा गोवा राज्याचे शिवसेना संपर्कनेते गजानन कीर्तिकर यांच्या नेतृत्वाखाली व शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मागदर्शनाखाली विशाल हॉल, अंधेरी (पूर्व), मुंबई येथे संपन्न झाला.

सदर मेळाव्यात मार्गदर्शन करताना शिवसेना नेते गजानन कीर्तिकर यांनी आगामी काळात होणा-या गोवा विधानसभा निवडणुकीसाठी सज्ज राहण्याचे आवाहन उपस्थितांना केले. या निवडणुकीसाठी स्थानीय लोकाधिकार सेना महासंघ आणि मुंबईतील गोमंतकवासीय यांच्या सहयोगाने गोवा राज्यातील स्थानिक पदाधिका-यांना सोबत घेऊन भुमिपुत्रांसाठी व्यापक चळवळ उभी करण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत व मार्गदर्शन पक्षाकडून मिळेल आणि शिवसेनेचे मुख्य नेते व्यक्तिशः यामध्ये लक्ष घालून संघटनेला ताकद देतील असेही कीर्तिकर म्हणाले. या मेळाव्यामध्येच गोमंतकांसाठी शिवसेना पक्षाच्या वतीने दक्षिण व उत्तर गोव्यासाठी २ रूग्णवाहीकांचे लोकार्पण करण्यात आले. त्याप्रमाणे आगामी काळात देखील पक्षाच्या बळकटीसाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

सदर मेळाव्यास शिवसेना पक्षाचे गोवा राज्य संपर्कप्रमुख तथा मुंबईचे माजी नगरसेवक सुभाष कांता सावंत, गोवा राज्यप्रमुख उपेंद्र गावकर, शिवसेना विभागप्रमुख माजी नगरसेवक राजू पेडणेकर, शिवसेना विभागप्रमुख दिलीप नाईक, स्थानीय लोकाधिकार सेना महासंघाचे सरचिटणीस अरूण मोरे, गोवा राज्य सचिव काशिनाथ मयेकर, दक्षिण गोवा जिल्हाप्रमुख गणबा नाईक-देसाई, उत्तर गोवा जिल्हाप्रमुख सुनील सांतीनेजकर, दक्षिण गोवा जिल्हा संपर्कप्रमुख प्रकाश पावसकर आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

या मेळाव्यास मुंबईतील गोमंतक आणि लोकाधिकार महासंघाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तर गोवा जिल्हा संपर्कप्रमुख मिलिंद प्रधान यांनी केले.

# मुंबई मनपा रुग्णालयासाठी मोफत बेस्ट बस सुरू करा- शीतल गंभीर

**मुंबई, प्रतिनिधी**

: स्वस्त व योग्य उपचार पद्धतीमुळे देशभरातील रुग्ण मुंबई महापालिकेच्या रुग्णालयात धाव घेतात. मात्र पालिकेच्या रुग्णालयात येणारे रुग्णांची आर्थिक स्थिती बेताची असल्याने त्यांना प्रवासाचा खर्च परवडत नाही. त्यामुळे मुंबई महापालिकेचे रुग्णालय ते जवळील रेल्वे स्थानकादरम्यान बेस्ट बसची मोफत सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी ठरावाची सूचना भाजप नगरसेविका शीतल गंभीर यांनी मांडली आहे.

येत्या १७ मार्च रोजी सभागृहाची बैठक आयोजित केली असून महापौर रितू तावडे काय निर्णय घेणार याकडे मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.

मुंबई महानगरपालिकेची ४ प्रमुख रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालये, १ दंत रुग्णालय, १६ परिमंडळीय रुग्णालये, ६ विशेष रुग्णालये आणि २९ प्रसूतिगृहे आहेत. रुग्णालयात आपत्कालीन सोयीसुविधा, तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध असून, नाममात्र दराने उपचार मिळतात. देशाच्या मनपा कानाकोपऱ्यातून रुग्ण मनपाच्या उपचारार्थ धाव घेत असतात. मनपा रुग्णालयात उपचारार्थ येणारे रुग्ण हे गरीब असतात आणि रेल्वे स्थानकावर उतरल्यावर, रेल्वे स्थानकापासून रुग्णालयापर्यंत जाण्यासाठी खर्च त्यांना परवडत नाही. रुग्णांची आर्थिक स्थिती लक्षात घेता मनपाच्या रुग्णालयापर्यंत पोहोचण्यासाठी, रुग्णांसाठी अशी 'बेस्ट'ची मोफत बससेवा सुरू करण्यात यावी, अशी ठरावाची सूचना गंभीर यांनी मांडली

# नाश्ता विक्रेत्यांनी दर वाढवले

**मुंबई, प्रतिनिधी**

व्यावसायिक एलपीजीच्या पुरवठ्यात तुटवडा निर्माण झाल्यामुळे नागरिकांनी घाईघाईने सिलिंडर बुकिंग सुरू केली आहे. त्यामुळे काही भागांतील रस्त्यावरील नाश्ता विक्रेत्यांनी पदार्थांच्या किमतीत ५ ते १० रुपयांनी वाढ केल्याची माहिती सूत्रांनी दिली. सध्या वडापावचा दर प्रति नग २५ रुपये झाला आहे. गुढीपाडव्याशी संबंधित वस्तूंची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांनी सांगितले की, या परिस्थितीचा त्यांच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे. काही मंदिरांमध्ये प्रसादाच्या तयारीवरही परिणाम झाल्याचे सांगण्यात आले.



सरकारकडून घरगुती एलपीजीचा पुरवठा "सुरक्षित" आणि "अखंडित " ठेवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे सांगण्यात आले आहे. साठेबाजी टाळण्यासाठी केंद्र सरकारने पाइपद्वारे गॅस (पीएनजी) जोडणी असलेल्या घरांना पर्यायी इंधन म्हणून अतिरिक्त घरगुती एलपीजी सिलिंडर घेणे, ठेवणे किंवा भरून घेण्यास मनाई केली आहे. मुंबई महानगर प्रदेशात सुमारे २८ लाख घरांना पीएनजी जोडणी आहे. महाराष्ट्र गॅस कंपनीच्या सूत्रांनी सांगितले की, पीएनजी वापरणाऱ्या किती घरांकडे अतिरिक्त एलपीजी सिलिंडर आहे, याची अचूक माहिती नाही; मात्र हा आकडा लक्षणीय असू शकतो, असा अंदाज आहे.

रविवारीही काही भागांत घाईघाईने खरेदी सुरूच होती. पुरवठा कमी होईल या भीतीने अनेक रहिवासी गॅस वितरकांच्या केंद्रांवर धाव घेत असल्याचे दिसून आले. त्यामुळे मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे येथील अनेक भागांत लांबलचक रांगा लागल्या.

नवी मुंबईतील सानपाडा येथे एलपीजी सिलिंडरसाठी सुमारे एक किलोमीटरपर्यंत रांग लागल्याचे दिसून आले. कांदिवली आणि ठाण्याच्या काही भागांतील केंद्रांवरही नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागली. अनेकांनी डिलिव्हरी किंवा रिफिलसाठी ओटीपी मिळूनही रिकामे सिलिंडर घेऊन रांगेत उभे राहून रिफिल मिळवण्याचा प्रयत्न केला. शिवसेनेचे संजय निरुपम यांनी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी गोरेगावमधील एका एलपीजी केंद्राला अचानक भेट दिली. त्यांनी सांगितले की, त्या केंद्रावर दररोज सुमारे ३०० ते ४०० सिलिंडर ग्राहकांना दिले जात आहेत. पाहणीनंतर त्यांनी सांगितले की प्रत्यक्षात पुरवठ्याचा कोणताही गंभीर तुटवडा नाही; मात्र नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या भीतीमुळे गर्दी वाढली आहे. २५ दिवसांच्या रिफिल अंतरामुळे तुटवड्याचा भास निर्माण झाला असावा, पण अफवांमुळे परिस्थिती अधिक बिघडली आहे. त्यांनी नागरिकांना घाबरू नये आणि चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले.

दरम्यान, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून दोन जहाजे पार गेल्यामुळे वितरकांनी काहीसा दिलासा व्यक्त केला आहे. मात्र अजूनही २८ ते ३० जहाजे मार्ग मोकळा होण्याची प्रतीक्षा करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# नवी मुंबईत एफ-४ शर्यतीसाठी ७० झाडे आणि रस्त्यावरील दुभाजक हटवणार

**नवी मुंबई, प्रतिनिधी**

नेरुळ येथे वर्षाच्या अखेरीस आयोजित करण्यात येणाऱ्या फॉर्म्युला-४ (एफ-४) कार शर्यतीसाठी पायाभूत सुविधा उभारण्यासाठी ७० हून अधिक झाडे तोडली जाणार किंवा स्थलांतरित केली जाणार असल्याचा आरोप एका कार्यकर्त्याने केला आहे.

कार्यकर्ते प्रवीण खेडकर यांनी सांगितले, "प्रस्तावित स्पर्धेसाठी करण्यात येणाऱ्या पायाभूत कामांमुळे ७० हून अधिक झाडांवर परिणाम होणार आहे. याबाबत नवी मुंबई महापालिकेकडून सविस्तर माहिती मागवण्यात आली आहे." ही झाडे रस्त्याच्या दुभाजकावर तसेच एका खेळाच्या मैदानात असल्याचे त्यांनी सांगितले. शर्यतीसाठी त्या मार्गावरील रस्त्याचा दुभाजक हटवला जाणार असून, रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत स्थानिक रहिवाशांना त्याचा त्रास सहन करावा लागणार आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या क्रीडा, संस्कृती व युवक कल्याण समितीचे अध्यक्ष तसेच नगरसेवक गिरीश म्हात्रे यांनी तीन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमाला मंजुरी देण्याबाबत आणि त्यासाठी लागणाऱ्या खर्चासंदर्भात महासभेत प्रस्ताव मांडला आहे. यापूर्वी महापालिकेने सेक्टर-२६ मधील वामनदेव मैदान परिसरात अनेक झाडे लावली होती.

दरम्यान, नेरुळ गावातील रहिवाशांनी या शर्यतीचा ट्रॅक मैदानातून नेण्यास विरोध दर्शवला आहे. त्यांनी शुक्रवारी झालेल्या बैठकीत महापौर सुजाता पाटील यांच्याकडे आपले म्हणणे मांडले. मात्र कार्यक्रमानंतर खुल्या जागेची पुन्हा पूर्ववत दुरुस्ती करून ती पुन्हा खेळाच्या मैदानासाठी वापरली जाईल, अशी हमी महापौरांनी दिल्याचे सांगितले.

# डेंग्यू, मलेरिया रोखण्यासाठी पाऊल २०,००० बांधकाम कामगारांना देणार प्रशिक्षण

**मुंबई, प्रतिनिधी**

xपावसाळ्यात मुंबई शहरातील डेंग्यू आणि मलेरियाची साथ रोखण्यासाठी मुंबई महापालिका प्रशासन सज्ज झाले आहे. यासाठी शहरातील ४,००० बांधकामांच्या ठिकाणी काम करणाऱ्या २०,००० कामगारांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पावसाळा सुरू होताच मुंबई शहर आणि उपनगरांत दरवर्षी विविध आजारांचा धोका निर्माण होतो. डेंग्यू आणि मलेरिया हे साथीचे रोग पसरू नये यासाठी पालिका प्रशासनाने पाऊल टाकले आहे, यासाठी पालिकेने नवी शक्कल लढवली आहे. डेंग्यू आणि मलेरियाचे बहुतेक रुग्ण बांधकाम ठिकाणी आढळतात. याचा गांभिर्याने विचार करून पालिकेच्या आरोग्य विभागाने शहरातील ४ हजार खाजगी आणि सरकारी बांधकाम ठिकाणी काम करणाऱ्या सुमारे २० हजार कामगारांना डेंग्यू आणि मलेरियाशी सामना करण्यासाठी प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे.

अनेक प्रकरणांमध्ये रोग उशिरा आढळतो. ज्यामुळे उपचारांना विलंब होतो. जेव्हा मलेरिया किंवा डेंग्यू ताप येतो तेव्हा बरेच लोक मेडिकल स्टोअरमधून औषधे खरेदी करतात आणि ताप दाबतात. त्यामुळे या प्रशिक्षणात डेंग्यू आणि मलेरियाची लक्षणे आणि त्वरित चाचणी घेण्याची आवश्यकता देखील स्पष्ट केली जाईल. तसेच ताप आल्यास तातडीने चाचणी करावी, यावर भर दिला जाईल, असे उघडे म्हणाले.

आरोग्य विभागाचे उपायुक्त शरद उघाडे यांनी सांगितले की, 'शहरातील बांधकाम ठिकाणी पाणी साचल्यामुळे डासांमुळे होणारे आजार मोठ्या प्रमाणात आढळतात, ज्यामुळे डेंग्यू आणि मलेरियाचे डास सहजपणे प्रजनन करतात आणि तिथे काम करणाऱ्या कामगारांना बळी पडतात. अशा परिस्थितीत, आम्ही या कामगारांना डेंग्यू आणि मलेरियापासून बचाव करण्यासाठी विशेष प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. शहरातील ४,००० बांधकाम ठिकाणी काम करणाऱ्या सुमारे २०,००० कामगारांना विशेष प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षणानंतर, त्यांना आरोग्य मित्र (आरोग्य मित्र) म्हटले जाईल आणि ते त्यांच्या आजूबाजूला पाणी साचू नये याची खात्री करणे, वातावरण स्वच्छ ठेवणे आणि पूर्ण बाह्यांचे कपडे घालणे यासारखे विविध प्रतिबंधात्मक उपाय करतील. हे आरोग्य मित्र केवळ बाघकाम ठिकाणीच नव्हे, तर आसपासच्या निवासी भागातही रोगांबद्दल जनजागृती करतील, ज्यामुळे त्यांचा प्रसार कमी होण्यास मदत होऊ शकते, असे उघडे म्हणाले.

दरवर्षी एप्रिल किवा मे महिन्यात मलेरिया आणि डेंग्यू प्रतिबंधासाठी बैठका घेतल्या जातात, त्यामुळे तयारीसाठी फारसा वेळ उरत नाही. तथापि, यावर्षी आयुक्तांसोबत बैठका जानेवारीमध्ये सुरू होतात. यंदा शहरातील प्रत्येक भागाला जीआयएस टॅग केले जाईल, त्यामुळे जर एखाद्या विशिष्ट भागात डेंग्यू किवा मलेरियाचा प्रादुर्भाव जास्त आढळला, तर तो हॉटस्पॉट म्हणून घोषित केला जाईल आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पालिका त्वरित विविध पावले उचलेल, अशी माहिती उघडे यांनी दिली.

# 'परे'ची दिव्यांगासाठी आरोग्य सेवांची सुविधा

**मुंबई, प्रतिनिधी**

पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल डिव्हिजनमध्ये २०२५-२६ दरम्यान प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. यात दिव्यांग प्रवाशांसाठी विशेष सुविधा, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची सोय आणि आपात्कालीन आरोग्य सेवांचा समावेश आहे.

सीएसआरच्या माध्यमातून प्रवाशांना या सुविधा उपलब्ध केल्या जात असल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, स्टेशनांवर विविध सुविधा मिळत असल्यामुळे प्रवाशांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. मुंबईतील इंडियन रेड क्रॉस सोसायटीमधून २४ जानेवारी रोजी मुंबई सेंट्रल डिव्हिजनच्या १११ स्टेशनांवर दिव्यांग प्रवाशांसाठी क्रॅचेस आणि चालण्याच्या काठ्या देण्यात आल्या. तर ५ नोव्हेंबर २०२५ रोजी बलसाडचे खासदार धवल पटेल यांच्या फंडातून बोरिवली स्टेशनच्या प्लॅटफॉर्म-१ वर प्रवाशांसाठी आरओ आधारित पेयजल मशीन बसवण्यात आली आहे.

दिव्यांगांच्या सुविधेसाठी रेल्वेने १७ मे २०२५ रोजी मुंबई सेंट्रल आणि बांद्रा टर्मिनसवर महत्त्वपूर्ण प्रवासी सुविधेसाठी ब्रेल लिपीतील फलकही बसवण्यात आले आहेत. यामुळे दृष्टीबाधित प्रवाशांना स्टेशन परिसरात दिशा समजण्यासाठी सोपे जाणार आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### काळ्या बाजारात गॅस सिलिंडर विकताना टेम्पोचालक अटकेत

**मुंबई, प्रतिनिधी**

देवनार पोलिसांनी गोवंडी परिसरात व्यावसायिक एलपीजी सिलिंडर वाढीव दराने विक्री केल्याप्रकरणी एका व्यक्तीला अटक केली आहे. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार नागरी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी शनिवारी बेकायदेशीरपणे साठवून ठेवलेले काही व्यावसायिक गॅस सिलिंडर जप्त केले. या परिसराची तपासणी करत असताना अधिकाऱ्यांना एक उभा असलेला टेम्पो आढळला. त्याचे दरवाजे बंद असल्याने चालकाचा संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र तो अपयशी ठरल्याने पथकाने पोलिसांची मदत घेतली. देवनार पोलिसांच्या मदतीने टेम्पोचे दरवाजे उघडण्यात आले. तपासणीदरम्यान टेम्पोमध्ये २१ किलो वजनाचा भरलेला एक व्यावसायिक एलपीजी सिलिंडर आणि दोन रिकामे सिलिंडर आढळून आले. चौकशीदरम्यान टेम्पोचा मालक मोहम्मद फारूक शेख याने गॅस एजन्सीकडून सिलिंडर खरेदी करून ते काळ्या बाजारात विकत असल्याची कबुली दिली. प्रत्येक सिलिंडरमागे सुमारे २०० रुपयांचा नफा मिळवत असल्याचेही त्याने सांगितले.

### लाडक्या बहिणींना फेब्रुवारी, मार्चचा हप्ता १५ एप्रिलपूर्वी एकत्र

**मुंबई, प्रतिनिधी**

राज्य सरकारने लाडक्या बहिणींसाठी आनंदाची बातमी दिली आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांना फेब्रुवारी आणि मार्च या दोन महिन्यांचा हप्ता आता एकत्र दिला जाणार असल्याचे वृत्त आहे. नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला म्हणजेच १५ एप्रिलपूर्वी पात्र महिलांच्या खात्यात एकूण तीन हजार रुपये जमा होणार आहेत. नुकत्याच मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी भरीव निधीची तरतूद करण्यात आल्याने हा प्रलंबित लाभ देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जानेवारीच्या हप्त्यानंतर प्रतीक्षेत असलेल्या महिलांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान, काही महिलांचा लाभ बंद होण्याची शक्यता आहे. ज्या महिलांनी अद्याप ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही किंवा ज्यांच्या अर्जात त्रुटी आहेत, त्यांना दुरुस्तीसाठी ३१ मार्च २०२६ पर्यंतची अंतिम मुदत देण्यात आली आहे. या मुदतीनंतर ज्यांचे ई-केवायसी पूर्ण नसेल किंवा ज्या महिला अपात्र ठरतील. त्यामुळे १५ एप्रिलचा संयुक्त हप्ता मिळवण्यासाठी महिलांना ३१ मार्चपर्यंत आपली कागदपत्रे आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य आहे.

### पोलीस असल्याची बतावणी करून पवईत विदेशी चलन पळविले

**मुंबई, प्रतिनिधी**

पोलीस असल्याची बतावणी करून एका तरुणाकडील साडेसहा लाखांचे विदेशी चलन चार तोतया पोलिसांनी पळवून नेल्याची घटना पवई परिसरात घडली. याप्रकरणी पवई पोलिसांनी चारही तोतया पोलिसांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने पळून गेलेल्या आरोपीच्या अटकेसाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. ३१ वर्षांचा तरुण हा पवई परिसरात राहतो. शनिवारी १४ मार्चला सायंकाळी पाच वाजता तो ७५९० रुपयांचे अमेरिकन डॉलर घेऊन जात होता. पवईतील समरसेट इमारतीच्या गेटसमोरून जात असताना तिथे चार जण आले. या चौघांनी त्याला पोलीस असल्याची बतावणी करून चौकशीसाठी ताब्यात घेतल्याचा बनाव केला. काही अंतर घेऊन गेल्यानंतर त्यांनी त्याच्याकडील साडेसहा लाखांचे ७५९० अमेरिकन डॉलर घेऊन पलायन केले होते. हा प्रकार नंतर त्याच्या लक्षात येताच त्याने पवई पोलिसांना घडलेला प्रकार सांगितला. त्याच्या जबानीनंतर पोलिसांनी पळून गेलेल्या चारही तोतया पोलिसाविरुद्ध तोतयागिरी करुन फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी ताब्यात घेतले असून या फुटेजवरुन आरोपीची ओळख पटविण्याचे काम सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### घरफोडी करणाऱ्या चौकडीला बिहार, पश्चिम बंगालमधून अटक

**मुंबई, प्रतिनिधी**

घरफोडी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील चार जणांना बिहार, पश्चिम बंगालमधून अटक करण्यात माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलिसांना यश आले आहे. आरोपींकडून सुमारे २५ लाख रुपयांची मालमत्ता हस्तगत करण्यात आली असून ७ गुन्हे उघडकीस आले आहेत. माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत खिडकीचे ग्रिल तोडुन ऑक्शनसाठी ठेवलेली ब्रँडेड घडयाळे व फोटोग्राफीचे कॅमेरे चोरीला गेले होते. आस्था गुरु ऑक्शन फर्मचे सिदधांत महेश यांनी पोलिसांत तक्रार केली होती. गुन्हा नोंद होताच पोलिसांनी जवळपास ५० सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी बिहार व पश्चिम बंगाल राज्यात पळून गेल्याचे निष्पन्न झाले होत. यानंतर तत्काळ दोन पथके बिहार व पश्चिम बंगाल येथे रवाना झाली. अनेक अडथळयावर मात करुन सुमारे १० दिवस गावात वेंशांतर करुन राहिले. त्यानंतर छोटू मियाँ मुबारक हुसैन (२३), मुनावर तुश्नउद्दीन शेख (४२), मोहंमद रजीफुल मर्मोहंमद रहीम शेख (३२) आणि अचबुल चारु शेख (३४) या ४ आरोपीना अटक केली.

### राज्यातील २० लाख बांधकाम कामगारांचे अर्ज धूळखात पडून

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या भोंगळ कारभारामुळे राज्यातील २० लाखांहून अधिक नोंदणीकृत कामगारांचे लाभ आणि अर्ज वर्षापासून प्रलंबित आहेत. उच्च न्यायालयाचे आदेश व मंत्र्यांच्या सूचनांना कामगार विभागाच्या सचिव यांनी केराची टोपली दाखवली आहे, असा आरोप निवारा बांधकाम कामगार संघटनेचा आहे. या प्रशासकीय अनास्थे विरोधात उद्या सोमवार (दि. १६) पासून आझाद मैदानावर बेमुदत उपोषण करण्यात येणार आहे, अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष शंकर पुजारी यांनी दिली. शासनाने १० नोव्हेंबर २०२५ पासून कामगारांना लोकसेवा हक हमी कायदा लागू केला आहे. मात्र, या कायद्याची कोणतीही अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. मंडळाकडून केवळ भांडी आणि पेट्या वाटपाचे काम सुरू आहे. शिक्षण, आरोग्य आणि विवाहासारखे महत्त्वाचे आर्थिक लाभ देणारे अर्ज आणीवपूर्वक प्रलंबित ठेवले जात असल्याचा आरोपही पुजारी यांनी यावेळी केला.

### दहिसरमध्ये महसूल समाधान शिबीर एका दिवसात १७६५ नागरिकांना सेवा

**मुंबई, प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' (टप्पा क्र. १) अंतर्गत बोरीवली तालुक्यातील दहिसर येथे शनिवारी भव्य महसूल शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एका दिवसात तब्बल १७६५ नागरिकांना विविध महसूल सेवा देण्यात आल्या. शिबिराची पाहणी करण्यासाठी केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पियुष गोयल, आमदार मनीषा चौधरी, उपमहापौर संजय घाडी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. त्यांनी नागरिकांशी संवाद साधत शिबिरातील सुविधांची माहिती घेतली. या शिबिरात नागरिकांना डोमिसाईल, उत्पन्न व ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र, संजय गांधी निराधार योजना प्रमाणपत्र, जिवंत सात-बारा मोहीम, प्रलंबित फेरफार, डिजिटल सात-बारा वितरण तसेच मिळकत पत्रिका व फेरफार नोंदी यांसारख्या विविध महसूल सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.

### दागिने बनविण्यासाठी दिलेल्या शुद्ध सोन्याचा अपहार, कारागीर फरार

**मुंबई, प्रतिनिधी**

सोन्याचे दागिने बनविण्यासाठी दिलेल्या सुमारे ६७ लाख रुपयांच्या चारशे ग्रॅम वजनाचे शुद्ध सोन्याचा सुनील उत्तम दंडापत या कारागिराने अपहार केला. याप्रकरणी सुनीलविरुद्ध ना. म. जोशी मार्ग पोलिसांनी अपहारासह फसवणुकीचा गुन्हा नोंदवून त्याचा शोध सुरू केला आहे. यातील तक्रारदार ज्वेलर्स व्यापारी असून ते जोगेश्वरी येथे राहतात. त्यांचे झव्हेरी बाजार येथे एक ज्वेलर्स शॉप आहे, तर लोअर परेल येथे दागिने बनविण्याचे एक युनिट आहे. याच युनिटमध्ये गेल्या दीड वर्षांपासून सुनील हा कारागीर म्हणून काम करत होता. त्याने ४०० ग्रॅम वजनाच्या शुद्ध सोन्याचा हिशोब दिला नव्हता किंवा त्याचे दागिने बनवून दिले नव्हते. याबाबत त्याच्याकडे विचारणा केल्यानंतर तो टोलवाटोलवी करत होता. काही दिवसांपूर्वीच तो युनिटमधून पळून गेला होता. त्याच्याविरुद्ध ना. म. जोशी मार्ग पोलिसांनी अपहारासह फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

## संपादकीय

# जागतिक अर्थव्यवस्थेसमोर मोठे संकट

अमेरिकेने इस्रायलसोबत मिळून आंतरराष्ट्रीय कायद्यांकडे दुर्लक्ष करत इराणवर केलेला हल्ला अमेरिकन कायद्यांनुसारही बेकायदेशीर ठरतो. या युद्धामुळे जगभरात निर्माण झालेल्या गॅस आणि तेलाच्या टंचाईचे समाधान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या हातात असल्याचे दिसत नाही. इराणवर हल्ला आणि त्यानंतर होणाऱ्या प्रत्युत्तरामुळे पश्चिम आशियातून होणाऱ्या ऊर्जा पुरवठ्यावर मोठा परिणाम होईल, याचा पुरेसा विचार त्यांनी केला नसल्याचे स्पष्ट होते.

इराण इस्रायलसोबत खाडी देशांमधील अमेरिकेच्या लष्करी तळांवरही हल्ले करत आहे आणि त्याने होर्मुझ सामुद्रधुनीतही अडथळे निर्माण केले आहेत. या मार्गातून जगातील सुमारे २० ते ३० टक्के तेल आणि गॅसचा पुरवठा होतो. इराणने होर्मुझ मार्ग बंद करण्याची आणि जगाने २०० डॉलर्स प्रति बॅरल दराने तेल खरेदीसाठी तयार राहावे, अशी चेतावणी दिल्यानंतर असेही सांगितले आहे की या मार्गातून जाणाऱ्या जहाजांनी त्यांच्या



नौदलाला माहिती देणे आवश्यक राहील. मात्र या मार्गातून तेल आणि गॅसचा पुरवठा सुरळीतपणे पुन्हा सुरू होत नाही तोपर्यंत ऊर्जा संकट दूर होण्याबाबत निश्चितपणे काही सांगता येत नाही.

खाडी देश तेल-गॅसचा पुरवठा प्रामुख्याने होर्मुझ मार्गातून करत असल्याने ते मोठ्या प्रमाणात इराणच्या भूमिकेवर अवलंबून आहेत. त्यामुळे भारत आणि चीनसारख्या देशांना या मार्गातील अडथळ्यांमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, कारण त्यांच्या ऊर्जा गरजांचा मोठा भाग खाडी देशांवर अवलंबून आहे. दिलासा देणारी बाब म्हणजे भारतीय पंतप्रधान, इराणचे राष्ट्राध्यक्ष आणि दोन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांमधील चर्चेनंतर इराणने भारताच्या जहाजांना होर्मुझ मार्गाने जाण्याची परवानगी देण्याचे संकेत दिले आहेत.

नवी दिल्लीतील इराणच्या राजदूतांनीही भारताला मित्रदेश संबोधत अशाच सकारात्मक संकेत दिले असून दोन भारतीय जहाजांना या जलमार्गातून जाण्याची परवानगी मिळाली आहे. मात्र भविष्यात सर्व भारतीय जहाजे कोणत्याही अडथळ्याविना या मार्गातून जाऊ शकतील की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. खाडी देशांमधील तेल-गॅस उत्पादनावर परिणाम होताच आणि त्यांचा पुरवठा अडथळ्यांत सापडताच त्यांच्या किमती वाढू लागल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेसमोर मोठे संकट उभे राहिले असून ही परिस्थिती नव्या आर्थिक आपत्तीचे रूप धारण करत आहे.

तेल, गॅस आणि खतांवर अवलंबून असलेल्या अनेक भारतीय उद्योगांनाही या संकटाचा फटका बसू लागला आहे. काही उद्योग बंद होण्याच्या उंबरठ्यावर आहेत, तर काहींना उत्पादन कमी करण्याची वेळ आली आहे. खाडी देशांतून तेल-गॅसचा पुरवठा थांबल्यास भारतासह जगभरात महागाई वाढण्याबरोबरच बेरोजगारी वाढण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. या परिस्थितीसाठी थेट अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जबाबदार असल्याचा आरोप होत आहे, कारण त्यांनी परिणामांचा विचार न करता हट्ट आणि अहंकारातून इस्रायलसोबत मिळून इराणवर हल्ला केला.

सध्या खाडी देशांतून तेल-गॅस पुरवठा अडथळ्यात आल्यामुळे देशात पेट्रोल आणि डिझेलची कमतरता दिसत नसली तरी स्वयंपाकाच्या गॅसची टंचाई जाणवू लागली आहे. फेरीवाले, रेस्टॉरंट-हॉटेल व्यवसायिक आणि सर्वसामान्य ग्राहक यांना याचा फटका बसत आहे. पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी तेल-गॅसची कमतरता नसल्याचा दावा करत असले तरी साठेबाजी आणि काळाबाजारामुळे गॅस संकट निर्माण होत असल्याचे दिसते. नफेखोर लोक या संकटाकडे संधी म्हणून पाहत आहेत.

गॅस टंचाईची भीती निर्माण झाल्याने सामान्य लोकही चिंतेत आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी गॅस एजन्स्यांसमोर लांबलचक रांगा लागलेल्या दिसत आहेत. यामुळे नागरिकांमध्ये अधिकच भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विरोधी पक्षही या भीतीला अधिक हवा देत आहेत. सरकारने गॅसची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी अत्यावश्यक वस्तू कायदा लागू केला असून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी समिती स्थापन केली आहे. मात्र या उपाययोजनांचा अद्याप अपेक्षित सकारात्मक परिणाम दिसत नाही. राज्य सरकारांनी साठेबाजी आणि काळाबाजाराविरुद्ध कठोर कारवाई केल्याशिवाय परिस्थितीत सुधारणा होणार नाही. सरकारने सार्वजनिक वितरण प्रणालीतून अतिरिक्त केरोसीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला, ही दिलासादायक बाब आहे.

इराणवर पुढील हल्ल्यांच्या धमक्यांदरम्यान अमेरिकेने भारतासह इतर देशांना रशियाकडून तेल खरेदी करण्यास असलेला आक्षेप मागे घेतला आहे. यावरून त्यांची अडचण स्पष्ट होते. भारत सरकार रशियाकडून तेल खरेदी वाढवण्याबरोबरच इतर काही देशांकडूनही तेल-गॅस खरेदी करण्याचे प्रयत्न करत आहे. मात्र हे व्यवहार पूर्ण होईपर्यंत आणि पुरवठ्याचा मार्ग स्पष्ट होईपर्यंत परिस्थितीत दिलासा मिळणे कठीण आहे. भारत वेनेझुएलाकडूनही तेल खरेदी करत आहे. काही दिवसांपूर्वी अमेरिकेने तेथे हल्ला करून त्या देशाच्या राष्ट्राध्यक्षांचे अपहरण केले होते. वेनेझुएलामध्ये तेलसाठे मोठ्या प्रमाणावर असले तरी त्यातून तेल काढणे आणि त्याचे शुद्धीकरण करणे सोपे नाही. अमेरिकेने वेनेझुएलाप्रमाणेच इराणवरही विचार न करता मनमानी पद्धतीने हल्ला केल्याचे स्पष्ट होते.

तेल संकट कमी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेने आपल्या आपत्कालीन साठ्यातील सुमारे ४० कोटी बॅरल तेल बाजारात सोडले आहे. तरीही तेलाचे दर १०० डॉलर्सच्या पुढे गेले आहेत. इराण अजूनही प्रत्युत्तर देण्याच्या स्थितीत असल्याने हे युद्ध कधी संपेल, हे सांगणे कठीण आहे. जर हे युद्ध दीर्घकाळ चालले आणि खाडी देशांतून तेल-गॅस पुरवठा अडथळ्यात राहिला, तर जागतिक ऊर्जा संकट आणखी तीव्र होईल. या ऊर्जा संकटासाठी सर्वात मोठी जबाबदारी अमेरिकेवरच येईल.

अमेरिका हे युद्ध लवकर संपवू शकेल असेही दिसत नाही. अब्जावधी डॉलर्स खर्च होऊनही युद्ध संपण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. अमेरिकेला वाटले होते की अली खामेनेई यांचा अंत केल्यास इराणमध्ये सत्ताबदल होईल, पण सध्या तरी तसे काही घडताना दिसत नाही. उलट इराणचे नवे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनेई युद्ध समाप्त करण्यासाठी अशा अटी मांडत आहेत, ज्या ना अमेरिका स्वीकारू शकते ना खाडी देश.

# स्वयंपाकघरापर्यंत पोहोचलं युद्ध

होर्मुझ सामुद्रधुनी ही जागतिक हायड्रोकार्बन व्यापाराच्या केंद्रस्थानी आहे. 2024 मध्ये या सामुद्रधुनीतून दररोज सुमारे 20 दशलक्ष बॅरल तेल वाहून नेले गेले, जे जागतिक पेट्रोलियम द्रवांच्या एकूण वापराच्या सुमारे 20 टक्के इतके आहे. त्यामुळे ही जगातील सर्वात महत्त्वाच्या तेल वाहतूक मार्गांपैकी एक मानली जाते. येथे कोणताही व्यत्यय आल्यास जहाजांची वाहतूक थांबते, मालवाहतुकीचा खर्च आणि युद्ध-जोखीम विमा प्रीमियम वाढतात, माल पाठवण्याच्या वेळापत्रकात उशिर होतो आणि भविष्यातील पुरवठ्यावरचा विश्वास कमी होतो.

सध्या मध्यपूर्वेतील संघर्षामुळे या मार्गातून होणाऱ्या लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस (LPG) वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. मालवाहतूक थांबली असून आयातदार पर्यायी पुरवठ्यासाठी धडपड करत आहेत. भारतासारख्या देशासाठी, जिथे घरगुती कल्याणाशी थेट संबंधित असलेल्या या इंधनाचा मोठा भाग समुद्री आयातीवर अवलंबून आहे, हा जागतिक धक्का त्वरेने देशांतर्गत वितरणाच्या समस्येत रूपांतरित झाला आहे.

भारताची जोखीम विशेषतः जास्त आहे, कारण LPG हे मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे घरगुती इंधन असून त्यासाठी आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबित्व आहे. भारताच्या LPG वापरापैकी सुमारे 60 टक्के पुरवठा आयातीद्वारे केला जातो आणि त्या आयातीपैकी जवळपास 90 टक्के माल होर्मुझ सामुद्रधुनीतूनच येतो. याचा अर्थ असा की, जर हा मार्ग बंद राहिला तर देशातील LPG उपलब्धतेपैकी सुमारे 54 टक्के पुरवठा थेट धोक्यात येऊ शकतो. जर LPG केवळ औद्योगिक वापरापुरते मर्यादित इंधन असते, तर ही परिस्थिती काही प्रमाणात हाताळता आली असती. मात्र जानेवारी 2026 पर्यंत भारतात सुमारे 332.1 दशलक्ष सक्रिय घरगुती LPG जोडण्या असून त्यापैकी 104.29 दशलक्ष जोडण्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजना (PMUY) अंतर्गत आहेत. घरगुती स्तरावर एवढ्या मोठ्या प्रमाणावर अवलंबित्व असल्यामुळे पुरवठ्यातील कोणताही दीर्घकालीन व्यत्यय त्वरित कल्याणकारी संरक्षण, वितरणाची सातत्यता आणि इंधन रेशनिंगच्या राजकीय-आर्थिक परिणामांबाबत गंभीर चिंता निर्माण करतो.

भारताच्या LPG वापरापैकी सुमारे 60 टक्के पुरवठा आयातीद्वारे केला जातो आणि त्या आयातीपैकी जवळपास 90 टक्के माल होर्मुझ सामुद्रधुनीतूनच येतो.

भारतातील LPG पुरवठा साखळी

LPG च्या पुरवठा साखळीची रचना पाहिल्यास हा धक्का सहजपणे पचवणे का कठीण आहे हे स्पष्ट होते. भारताला LPG दोन मुख्य मार्गांनी मिळतो, रिफायनरी आणि गॅस-प्रक्रिया प्रकल्पांमधून होणारे देशांतर्गत उत्पादन, तसेच प्रोपेन-ब्युटेनच्या थेट आयात मालवाहतुकीद्वारे. या प्रवाहांना नंतर किनारी टर्मिनल्स, साठवण सुविधा, बॉटलिंग प्लांट्स, वाहतूक नेटवर्क आणि वितरकांच्या माध्यमातून घरगुती व व्यावसायिक ग्राहकांपर्यंत पोहोचवले जाते. भारताची ही व्यवस्था मोठी असली तरी अत्यंत काटेकोरपणे चालवली जाते. देशात 215 बॉटलिंग प्लांट्स, सुमारे 25,600 वितरक आणि सरासरी साठा असा आहे की तो साधारणपणे 18 दिवसांचा पुरवठा सुनिश्चित करू शकतो. हा साठा अल्पकालीन अडथळ्यांसाठी उपयोगी असला तरी दीर्घकालीन नाकेबंदीपासून संरक्षण देण्यासाठी पुरेसा नाही. ही प्रणाली सातत्यपूर्ण पुरवठ्यासाठी तयार करण्यात आली आहे, दीर्घकाळ चालणाऱ्या बाह्य व्यत्ययासाठी नव्हे. त्यामुळे समुद्री प्रवेशबिंदूवर झालेला विलंब लवकरच बॉटलिंग वेळापत्रक, वितरकांचा पुरवठा आणि प्रादेशिक उपलब्धतेवर परिणाम करतो.

सरकारचा तात्काळ प्रतिसाद आपत्कालीन स्थिरीकरणाचा राहिला आहे. विशेष अधिकारांचा वापर करून रिफायनरी आणि पेट्रोकेमिकल प्रकल्पांना प्रोपेन आणि ब्युटेन देशांतर्गत पूलमध्ये वळवून LPG उत्पादन वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपाययोजनांमुळे देशांतर्गत LPG उत्पादनात सुमारे 25 टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्याचवेळी घरगुती पुरवठा



सुरक्षित ठेवण्यासाठी औद्योगिक आणि व्यावसायिक वापरासाठी होणाऱ्या वाटपात कपात करण्यात आली आहे. मात्र आकडेवारी चिंताजनक आहे. जर एकूण सामान्य पुरवठा 100 युनिट मानला, तर त्यापैकी 54 युनिट होर्मुझमार्गे येणाऱ्या पुरवठ्यावर अवलंबून आहेत. देशांतर्गत 40 युनिटचा पुरवठा 25 टक्क्यांनी वाढल्यानंतर 50 युनिटपर्यंत पोहोचतो, तर होर्मुझबाहेरील आयातीची 6 युनिट पूर्ववत राहतात. अशा परिस्थितीत आपत्कालीन आयात आणि मागणी कमी करण्यापूर्वी एकूण उपलब्धता सुमारे 56 युनिटवर येते. त्यामुळे अशा परिस्थितीत धोरण नैसर्गिकरित्या बाजाराधारित वाटपापासून प्राधान्याधारित वाटपाकडे वळते.

LPG च्या पुरवठा साखळीची रचना पाहिल्यास हा धक्का सहजपणे पचवणे का कठीण आहे हे स्पष्ट होते.

या संरक्षणात्मक संरचनेचे अर्थव्यवस्थेवर असमान परिणाम होतात. घरगुती ग्राहकांना सर्वप्रथम संरक्षण मिळण्याची शक्यता आहे, कारण स्वयंपाकासाठीचे इंधन हे राजकीयदृष्ट्या संवेदनशील असून ते थेट कल्याणकारी धोरणांशी जोडलेले आहे. त्यामुळे प्रारंभीचा समायोजनाचा भार व्यवसाय क्षेत्रावर पडण्याची शक्यता आहे विशेषतः रेस्टॉरंट्स, केटरिंग सेवा, हॉटेल्स आणि व्यावसायिक सिलिंडर वापरणाऱ्या लहान औद्योगिक घटकांवर. व्यावसायिक वापरासाठीचे वाटप कठोरपणे नियंत्रित केले जात आहे, तसेच काही क्षेत्रांमध्ये घरगुती पुरवठा टिकवून ठेवण्यासाठी पर्यायी इंधनांचा तात्पुरता वापर करण्याचा सल्लाही सरकारने दिला आहे. याचबरोबर भारताने अमेरिकेसह रशिया, नॉर्वे आणि कॅनडा यांसारख्या पर्यायी स्रोतांकडून LPG मिळवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

आर्थिक खर्च आणि परिणाम

या परिस्थितीचा आर्थिक परिणाम पुरवठा-आधारित धक्क्यासारखा दिसून येईल: सर्वप्रथम इंधनाचा थेट वापर करणाऱ्या क्षेत्रांमध्ये खर्च वाढेल आणि त्यानंतर हा परिणाम अन्नसेवा, स्थानिक किरकोळ व्यापार आणि शहरी अनौपचारिक व्यवसायांपर्यंत पसरू शकतो. संशोधन दर्शवते की वाहतूक व्यवस्थेतील अडथळे काही कालावधीच्या अंतराने ग्राहकांच्या किमतींवर परिणाम करू शकतात, विशेषतः ज्या वस्तू किंवा कच्चा माल विशिष्ट वितरण मार्गांवर अवलंबून असतात. जर ही नाकेबंदी दीर्घकाळ टिकली, तर LPG चा हा धक्का केवळ इंधनाच्या समस्येपुरता मर्यादित न राहता स्थानिक पातळीवरील महागाई आणि व्यवसाय टिकवण्याच्या संकटात रूपांतरित होऊ शकतो.

अल्प आणि मध्यम कालावधीत आर्थिक प्रतिसाद तीन मुख्य साधनांवर आधारित आहे: प्राधान्यक्रम निश्चिती, पुरवठ्याचे विविधीकरण आणि लॉजिस्टिक व्यवस्थेचे बळकटीकरण. प्राधान्यक्रम निश्चिती आधीच दिसून येत आहे जसे की घरगुती पुरवठा सुरक्षित ठेवण्यासाठी सरकारने गैर-आवश्यक मागणी कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. पुरवठ्याचे विविधीकरणही सुरू आहे, कारण भारत अमेरिकेसह नॉर्वे, कॅनडा आणि रशिया येथून LPG आयात वाढवत आहे. भारताने आधीच 2026 साठी अमेरिकेसोबत 2.2 MTPA LPG पुरवठ्याचा करार केला आहे, जो वार्षिक आयातीच्या सुमारे 10 टक्क्यांच्या समतुल्य आहे. यामुळे स्थैर्य आणि कार्यक्षमतेतील तडजोड स्पष्ट होते: स्थिर काळात मर्यादित स्रोतांवर आधारित पुरवठा स्वस्त पडतो, परंतु विविध स्रोतांचा वापर धक्क्याच्या काळात जोखीम कमी करतो. त्यामुळे पर्यायी करारांना सामान्य खरेदी प्रक्रियेपासून विचलन म्हणून न पाहता विमा म्हणून पाहणे आवश्यक आहे. अधिक साठवण क्षमता, लवचिक टर्मिनल्स, रेल्वे वाहतूक व्यवस्था आणि पाइपलाइन जोडणी वाढवल्यास या "विमा" यंत्रणेचा वापर करण्याचा खर्च कमी होऊ शकतो.

अशा परिस्थितीत धोरण नैसर्गिकरित्या बाजाराधारित वाटपापासून प्राधान्याधारित वाटपाकडे वळते.

अशा प्रकारच्या व्यत्ययाच्या काळात एक महत्त्वाचे धोरणात्मक उद्दिष्ट म्हणजे पुरवठा-आधारित धक्का व्यापक महागाईच्या संकटात रूपांतरित होऊ न देणे. सर्वसाधारण आणि लक्ष्य नसलेल्या ऊर्जा सहाय्य योजनांमुळे मोठा आर्थिक भार निर्माण होऊ शकतो आणि अनेकदा अशा लोकांनाही लाभ मिळतो ज्यांना संरक्षणाची गरज नसते. याउलट, अधिक लक्षित सहाय्य उपाय अधिक कार्यक्षम ठरतात आणि सार्वजनिक वित्तीय जागाही जपतात. भारताच्या संदर्भात याचा अर्थ असा होतो की घरगुती ग्राहकांना विशेषतः असुरक्षित गटांना LPG उपलब्धता सुनिश्चित करणे आवश्यक आहे, परंतु अशा सर्वसाधारण अनुदानांपासून टाळावे लागेल ज्यामुळे बचत किंवा पर्यायी इंधन वापरण्याचे प्रोत्साहन कमी होते. यासोबतच व्यावसायिक क्षेत्रातील रेशनिंग प्रक्रिया इतकी पारदर्शक असणे आवश्यक आहे की साठेबाजी आणि काळाबाजार रोखता येईल. या धोरणाचे उद्देश आर्थिक स्थैर्य राखणे आणि वितरणात्मक न्याय साधणे हे दोन्हीही आहेत. कारण एकदा व्यवसायांनी वाढलेले इंधन आणि वाहतूक खर्च ग्राहकांकडे ढकलण्यास सुरुवात केली, तर महागाईबाबतच्या अपेक्षा दृढ होतात आणि तात्पुरता लॉजिस्टिक अडथळा वेतन आणि किमतींच्या वर्तनामुळे दीर्घकाळ टिकू शकतो.

संभाव्य उपाय

या संकटाची तीव्रता कमी करण्यासाठी सरकार काही वित्तीय साधने वापरू शकते. मर्यादित कालावधीसाठी LPG अनुदानाची रक्कम वाढवणे, रिफिलची मर्यादा वाढवणे किंवा डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफरद्वारे PMUY योजनेबाहेरील कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांनाही तात्पुरते अनुदान देणे हे उपाय करता येऊ शकतात. यामुळे कल्याणकारी संरक्षण मिळेल, परंतु मोठा अनुदान भार निर्माण होणार नाही. मालवाहतूक खर्च, युद्ध-जोखीम विमा आणि पर्यायी मार्गांमुळे वाढलेले खर्च पूर्णपणे ग्राहकांवर पडू नयेत म्हणून सरकार ऑइल मार्केटिंग कंपनीज (OMCs) ना मर्यादित कालावधीसाठी बजेटमधून "क्रायसिस प्रीमियम" ची भरपाई देऊ शकते. हे किंमत-स्थिरीकरण यंत्रणेप्रमाणे कार्य करू शकते, म्हणजेच किमती कायमस्वरूपी दाबून न ठेवता धक्क्याचा परिणाम कमी करणे. याशिवाय रशिया, अमेरिका आणि कॅनडा यांसारख्या पर्यायी स्रोतांकडून होणाऱ्या आयातीमुळे निर्माण होणारा आर्थिक ताण कमी करण्यासाठी सरकार व्याज अनुदान, सार्वभौम हमी असलेल्या कर्जरेषा (क्रेडिट लाईन्स) किंवा आपत्कालीन ऊर्जा आयातीसाठी तात्पुरती हमी सुविधा उपलब्ध करून देऊ शकते.

या संपूर्ण परिस्थितीतून मिळणारा व्यापक धोरणात्मक धडा असा आहे की लवचिकता केवळ संकटाच्या वेळी निर्माण केली जाऊ नये; ती आधीच तयार केली पाहिजे. विविध स्रोतांमधून पुरवठा, मजबूत लॉजिस्टिक व्यवस्था आणि पर्यायी तंत्रज्ञानांचा विस्तार यांद्वारे असुरक्षित व्यापार मार्गांवरील अवलंबित्व कमी करणे हे यासाठी अत्यावश्यक आहे.

दीर्घकालीन दृष्टीने पाहिले तर हा प्रश्न ऊर्जा सुरक्षेशी अधिक व्यापकपणे संबंधित आहे. भारतासारख्या मोठ्या देशाने स्वयंपाकासाठी आवश्यक असलेल्या स्वच्छ ऊर्जा सुरक्षेला एका आयातित इंधनावर आणि तेही एका महत्त्वाच्या समुद्री मार्गावर अवलंबून ठेवणे योग्य नाही. याचा अर्थ असा नाही की LPG चा वापर तातडीने कमी केला पाहिजे, कारण घरगुती स्वयंपाकासाठी ते अजूनही अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र याचा अर्थ असा आहे की ऊर्जा स्रोतांचा अधिक व्यापक पोर्टफोलिओ तयार करण्याची गरज आहे. शहरी भागांमध्ये पाइप्ड नॅचरल गॅस (PNG) हा एक पर्याय ठरू शकतो, जरी त्याचाही काही अंशी आयातित वायूवर अवलंब असतो. अधिक शाश्वत देशांतर्गत पर्यायांमध्ये विद्युत स्वयंपाक आणि जैवऊर्जा यांचा समावेश होतो. LPG तुटवड्याच्या भीतीमुळे इंडक्शन स्टोव्हच्या विक्रीत आधीच वाढ झालेली दिसते, ज्यातून पुरवठ्याच्या विश्वसनीयतेवर प्रश्न निर्माण झाल्यास घरगुती ग्राहक किती जलद प्रतिसाद देतात हे स्पष्ट होते. पुरवठ्याच्या बाजूने पाहिले तर भारताकडे सध्या 143.60 गिगावॅट इतकी एकूण सौर ऊर्जा क्षमता आहे, तसेच देशभरात 195 कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प उभारले जात आहेत. कालांतराने स्वयंपाकासाठी विविध ऊर्जा स्रोतांचा वापर वाढल्यास एका बाह्य इंधन मार्गावर असलेले अवलंबित्व कमी होऊ शकते.

आर्थिक दृष्टिकोनातून पाहता, होर्मुझ सामुद्रधुनीवरील नाकेबंदी ही एक केंद्रित बाह्य धक्का आहे, जो एका अरुंद लॉजिस्टिक मार्गाद्वारे येणाऱ्या आणि कल्याणाशी संबंधित इंधनावर परिणाम करतो. तात्काळ आव्हान म्हणजे योग्य वाटप; मध्यम कालावधीतले आव्हान म्हणजे लवचिकता वाढवणे; आणि दीर्घकालीन उद्दिष्ट म्हणजे कमी खर्चात ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण. भारत तात्काळ टप्प्यात उत्पादन वाढवून आणि घरगुती पुरवठ्याला प्राधान्य देऊन परिस्थिती हाताळू शकतो. मध्यम कालावधीत करार, साठवण क्षमता आणि वाहतूक पायाभूत सुविधा मजबूत करून लवचिकता वाढवता येईल. दीर्घकालीन उपाय म्हणून स्वयंपाकासाठी अधिक सुरक्षित देशांतर्गत ऊर्जा आधार निर्माण करणे आवश्यक आहे. या संपूर्ण परिस्थितीतून मिळणारा व्यापक धोरणात्मक धडा असा आहे की लवचिकता केवळ संकटाच्या वेळी निर्माण केली जाऊ नये; ती आधीच तयार केली पाहिजे. विविध स्रोतांमधून पुरवठा, मजबूत लॉजिस्टिक व्यवस्था आणि पर्यायी तंत्रज्ञानांचा विस्तार यांद्वारे असुरक्षित व्यापार मार्गांवरील अवलंबित्व कमी करणे हे यासाठी अत्यावश्यक आहे.

# 'शस्त्रा'पेक्षा 'माइंड' महत्त्वाचं: आधुनिक युद्धाचा नवा धडा

आधुनिक लष्करी औद्योगिक व्यवस्थेला धातू म्हणजेच शस्त्रसामग्रीबद्दल एक प्रकारचे आकर्षण आहे. एखाद्या देशाची धोरणात्मक ताकद बख्तरबंद तुकड्या, हवाई यंत्रणा आणि स्वायत्त प्रणालींच्या संगणकीय क्षमतेच्या आधारावर मोजली जाते. युक्रेनमधील अलीकडील युद्धाने जर काही शिकवले असेल तर ते म्हणजे मोठ्या प्रमाणातील सामूहिक शक्ती महत्त्वाची असते. मात्र सायबर आधारित युद्ध, AI वर आधारित दिशाभूल आणि सतत बदलणाऱ्या रणांगणाच्या या काळात केवळ हार्डवेअरवर जास्त भर देणे एक धोकादायक कमतरता निर्माण करत आहे. आपण शस्त्रसामग्रीवर जास्त गुंतवणूक करत आहोत, पण युद्धातील अंतिम निर्णय ठरवणाऱ्या मानवी मनोविज्ञानावर पुरेसे लक्ष दिले जात नाही.

मानवी मानसशास्त्र आणि प्रगत तंत्रज्ञान यांचा संबंध आता केवळ वैमानिकाने हेड अप डिस्प्ले कसा वापरतो किंवा सैनिक रणांगण व्यवस्थापन प्रणाली कशी समजून घेतो इतक्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. आता प्रश्न आहे खंदकात दीर्घकाळ तैनात असलेल्या सैनिकाच्या मानसिक ताकदीचा, संयुक्त कारवाई केंद्रातील जनरलच्या निर्णयांवर प्रभाव टाकणाऱ्या मानसिक पूर्वग्रहांचा आणि या नव्या काळातील सर्वात धोकादायक शस्त्र कदाचित हायपरसोनिक क्षेपणास्त्र नसून सत्य हळूहळू कमकुवत होण्याच्या प्रक्रियेचा आहे.

ज्ञानात्मक पतन म्हणजे सामायिक वास्तवाचा अंत

आज आपल्या समोरचे सर्वात मोठे संकट म्हणजे ज्ञानात्मक पतन. हा तो टप्पा आहे जिथे मूलभूत तथ्यांबाबत समाजात एकमत निर्माण करण्याची क्षमता कमी होऊ लागते. जेव्हा डीपफेकसारखी कृत्रिम माध्यमे, AI ने तयार केलेला मजकूर आणि बदललेले ध्वनी वास्तविकतेपासून वेगळे ओळखणे कठीण होते, तेव्हा आपण सामायिक पुराव्याचा आधार गमावतो. सत्य मोजण्यासाठी समान निकष नसतील तर समाजात फूट पडणे आणि मोठ्या प्रमाणावर संघर्ष निर्माण होणे जवळजवळ अपरिहार्य ठरते.

जेव्हा डीपफेक, AI ने तयार केलेला मजकूर आणि बदललेले ध्वनी यांसारखी कृत्रिम माध्यमे वास्तवापासून वेगळी ओळखणे कठीण होते, तेव्हा आपण सामायिक पुराव्याचा आधारच गमावतो.

लष्करी कमांडरसाठी ही परिस्थिती अत्यंत धोकादायक ठरू शकते. उदाहरणार्थ, ड्रोनमधून येणारे प्रत्यक्ष दृश्यच रिअल टाइममध्ये डीपफेक करून बदलले गेले तर काय होईल याची कल्पना करा. किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीमुळे सैनिकांचे मनोबल कमी होते आणि सोशल मीडियावर पसरलेल्या संदेशांमुळे ते स्वतःच्या आदेशांवरच शंका घेऊ लागतात. आपण आपल्या तांत्रिक प्रणालींना सायबर हल्ल्यांपासून सुरक्षित करण्यासाठी अब्जावधी रुपये खर्च केले आहेत, पण मानसिक पातळीवरील छेडछाडीपासून आपल्या मनांचे संरक्षण करण्याकडे मात्र पुरेसे लक्ष दिले गेलेले नाही.

BMS विरोधाभास आणि हवाई वर्चस्वाची नव्याने समज

आपण मिलस्पेक (MIL-SPEC) तंत्रज्ञान नेहमीच सर्वोत्तम असते किंवा ते कायम उपलब्ध राहील असा समज ठेवणे थांबवले पाहिजे. लष्करी नियोजनाचा मोठा भाग प्रगत तंत्रज्ञानावर सतत प्रवेश मिळेल असे गृहीत धरून केला जातो. पण समान क्षमतेच्या A2 AD वातावरणात अवकाशातील साधनांमध्ये मोठा अडथळा निर्माण झाला तर आधुनिक युद्ध लगेचच 1980 च्या दशकातील क्षमतांपर्यंत मागे जाऊ शकते. अशा परिस्थितीत सैनिकांना मात्र 21 व्या शतकातील युद्धासाठी प्रशिक्षण दिलेले असते.

तंत्रज्ञान उपलब्ध असले तरी ते नवीन प्रकारच्या असुरक्षा देखील निर्माण करते. उदाहरणार्थ BMS टॅबलेट वापरणारा सैनिक रणांगणाचा एक डिजिटल नकाशा पाहतो जिथे मित्रपक्ष निळ्या रंगात आणि शत्रू लाल रंगात दाखवले जातात. पण गोळीबाराच्या परिस्थितीत सैनिकाची हृदयगती वाढते आणि त्याची मानसिक लवचिकता कमी होते. त्यामुळे धोक्याचे आकलन चुकीचे होऊ शकते आणि खरा धोका कमी वाटू शकतो. सैनिक स्वतःच्या शरीरातील संकेत योग्यरीत्या ओळखू शकला नाही तर तो टॅबलेट उलट त्याच्यासाठी अडचण ठरू शकतो.

सैनिकांना शस्त्रे आणि प्रणाली व्यवस्थित वापरता यावीत यासाठी शेकडो तास प्रशिक्षण दिले जाते. त्याचप्रमाणे त्यांच्या शरीराच्या ताण प्रतिक्रिया नियंत्रित करण्यासाठीही तितकेच प्रशिक्षण आवश्यक आहे.

म्हणून युद्धासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे महत्त्वाचे आहेच. पण त्या प्रणाली चालवणाऱ्या मानवांना देखील तितकेच सक्षम बनवणे गरजेचे आहे. जर आपण मानवी ऑपरेटिंग सिस्टम सुधारली नाही तर जगातील सर्वात प्रगत हार्डवेअरही फक्त महागडे आणि उपयोग नसलेले धातू ठरू शकते.

संज्ञानात्मक खंदक म्हणजे जोखीम टाळण्याची वृत्ती हा अडथळा

आधुनिक लष्करांमध्ये कमांड स्तर आणि रणांगणाच्या अग्रभागामध्ये एक प्रकारचा संज्ञानात्मक खंदक तयार होत आहे. शांततेच्या काळातील प्रशासकीय व्यवस्थेत तयार झालेले निर्णयकर्ते खालच्या स्तरावरून येणाऱ्या नव्या कल्पनांकडे अनेकदा संस्थात्मक जोखीम म्हणून पाहतात.

प्रत्यक्षात सैनिक विजय मिळवत आहेत ते कॉर्पोरेट पद्धतीच्या खरेदी प्रक्रियेच्या चक्रांमुळे नाही. ते जिंकत आहेत कारण त्यांना स्वतः उपाय शोधण्याचे, परिस्थितीनुसार बदल करण्याचे आणि आवश्यकतेनुसार लगेच दिशा बदलण्याचे स्वातंत्र्य मिळते.

जेव्हा एखादा सैनिक स्वतः तयार केलेला इलेक्ट्रॉनिक घटक वापरण्याचा प्रयत्न करतो, एखादे व्यावसायिक ॲप वापरतो, ग्राहकांसाठी उपलब्ध उपग्रह प्रतिमांचा उपयोग करतो किंवा प्रमाणित पर्याय उपलब्ध नसल्यामुळे किंवा कालबाह्य झाल्यामुळे ड्रोनमध्ये बदल करतो, तेव्हा मुख्यालय अनेकदा प्रमाणपत्र किंवा सैद्धांतिक सायबर जोखमीचे कारण देत त्याला नकार देते. हे नेतृत्वाच्या मानसिकतेतील अधिक खोल अपयश दाखवते. जर एखादा कमांडर चर्चा जोखीम या शब्दाने सुरू करत असेल, तर त्याने आधीच पुढाकाराची शक्यता संपवलेली असते.

ड्रोन युद्ध खूप वेगाने बदलत आहे. सैनिक विजय मिळवत आहेत ते कॉर्पोरेट खरेदी प्रक्रियेच्या चक्रांमुळे नव्हे, तर त्यांना स्वतः तयार करण्याचे, परिस्थितीनुसार बदल करण्याचे आणि त्वरेने दिशा बदलण्याचे स्वातंत्र्य असल्यामुळे. अशा परिस्थितीत एखाद्या सैनिकाने स्वतःचा जॅमर तयार करण्यातील जोखीम ही अनेक वर्षे वाट पाहून अखेरीस कालबाह्य ठरणारे प्रमाणित समाधान येईपर्यंत सैनिकाचा जीव जाण्याच्या जोखमीपेक्षा खूपच कमी असते.

आपण सँडबॉक्स्ड सॉव्हरिनिटीकडे वाटचाल केली पाहिजे. म्हणजे रणांगणावरील तुकड्यांना स्थानिक पातळीवर अपयश स्वीकारण्याचे, पुन्हा प्रयत्न करण्याचे आणि नवकल्पना करण्याचे मानसिक आणि कायदेशीर स्वातंत्र्य दिले पाहिजे.

ब्रेन ड्रेन म्हणजे मूल्यांच्या संकटाची छाया

आज लष्करी नवकल्पनांवर परिणाम करणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे ब्रेन ड्रेन. अनुभवी अभियंते आणि तांत्रिक कौशल्य असलेले योद्धे देश सोडत आहेत. हे केवळ पैशासाठी नाही, तर मानसिक विसंगती आणि वाढत्या निराशेमुळे घडत आहे.

अत्यंत तणावाच्या परिस्थितीत माणसाची स्मरणशक्ती सुमारे 80 टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते. उच्च स्तरावरील विचारक्षमतेकडे पुन्हा परत येण्यासाठी हृदयगती पुरेशी कमी करण्यासाठी साधारणतः 99 सेकंदांचा कालावधी लागतो.

ज्या वातावरणात तांत्रिक कौशल्य असलेल्या लोकांच्या ज्ञानाकडे दुर्लक्ष केले जाते आणि काही कमांडर तांत्रिक साक्षरतेचा दिखावा करत असूनही तंत्रज्ञानाला फक्त पूरक सहाय्यक साधन म्हणून पाहतात, अशा वातावरणात प्रतिभावान लोक टिकून राहत नाहीत. जोपर्यंत आपण अशी व्यवस्था तयार करत नाही ज्यात तंत्रज्ञान केवळ वापरण्याऐवजी त्यात नवकल्पना करण्यासाठी आणि नेतृत्व करण्यासाठी सक्षम लोकांना प्रोत्साहन दिले जाईल, तोपर्यंत आपण रिकाम्या होत चाललेल्या मनुष्यबळाकडून चालवले जाणारे महागडे मेटलच रणांगणात वापरत राहू.

भावनिक बुद्धिमत्ता म्हणजे एक शस्त्र प्रणाली

संशोधनानुसार भावनिक बुद्धिमत्ता प्रशिक्षणामुळे अत्यंत तणावाच्या परिस्थितीत ताण नियंत्रित करण्याची क्षमता आणि कामगिरी सुधारते. लष्करी संदर्भात हे थेट जीविताशी संबंधित असते. खूप तणावाच्या परिस्थितीत माणसाची स्मरणशक्ती सुमारे 80 टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते. पुन्हा स्पष्टपणे विचार करण्यासाठी हृदयगती कमी करण्यासाठी साधारणतः 99 सेकंद लागतात. त्यानंतर स्मरणशक्ती पुन्हा आठवण्याची क्षमता कोसळू शकते. आधुनिक युद्धात प्रत्यक्ष लढाईदरम्यान असे 99 सेकंद म्हणजे खूप मोठा कालावधी असतो. तो एखाद्याचे आयुष्य वाचवू शकतो किंवा संपवू शकतो.

भावनिक बुद्धिमत्ता असलेले नेते तणाव कमी करण्यास सक्षम असतात. उच्च भावनिक बुद्धिमत्ता असलेला नेता आपल्या टीमवर मानसिक किंवा माहितीच्या माध्यमातून होणारी छेडछाड ओळखू शकतो. त्याला हे समजते की भावना हीदेखील एक प्रकारची माहिती असते. भावनिक बुद्धिमत्ता अशी मानसिक सुरक्षितता निर्माण करते जिथे लोकांना जोखीम घेणे, मोकळेपणाने बोलणे आणि नवकल्पना करणे सुरक्षित वाटते.

जर आपण मान्य केले की आधुनिक संघर्षाचे केंद्र आता मानवी विचार, धारणा आणि भावनिक नियंत्रण याकडे सरकत आहे, तर लोकांना त्या वास्तवासाठी तयार करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान पुढे विकसित होत राहील, पण मानवी ऑपरेटिंग सिस्टम हा निर्णायक घटक राहणार आहे. भविष्य त्या संस्थांचे असेल, ज्या मानसिक क्षमतेकडे शारीरिक ताकद किंवा तांत्रिक कौशल्याइतकेच महत्त्व देतील. याचा अर्थ ही क्षमता प्रशिक्षणाद्वारे विकसित करणे, तिचे मोजमाप करणे आणि संकट येण्याच्या खूप आधीपासून ती संस्थात्मक संस्कृतीत रुजवणे आवश्यक आहे.

## जोगेश्वरीतील 'त्या' बिल्डरचे धाबे दणाणले अग्निसुरक्षा परवानग्यांमध्ये घोळ?

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबईतील जोगेश्वरी येथील मे. ज्ञानप्रकाश शुक्ला डेव्हलपर्स एलएलपी या बांधकाम प्रकल्पाने घेतलेली अग्निसुरक्षा परवानगी आता राज्य सरकारच्या रडारवर आली आहे. या प्रकल्पाला देण्यात आलेल्या परवानग्यांमध्ये नियमांचे उल्लंघन झाल्याचा संशय व्यक्त केला जात असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिले आहेत. जर या चौकशीत विकासक दोषी आढळला, तर त्याच्यावर कठोर कारवाई करण्याचा इशाराही सरकारने दिला आहे.

आमदार प्रकाश सुर्वे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे या बांधकाम प्रकल्पातील संशयास्पद बाबींकडे सरकारचे लक्ष वेधले होते. या चर्चेत सुनील प्रभू आणि अस्लम शेख या सदस्यांनीही सहभाग घेत प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. यावर उत्तर देताना राज्यमंत्री मिसाळ यांनी स्पष्ट केले की, ३२ मीटरपर्यंतच्या इमारतींना ऑनलाइन प्रणालीद्वारे तात्पुरती अग्निसुरक्षा परवानगी देण्याचे अधिकार विभागाला आहेत, मात्र या विशिष्ट प्रकल्पाच्या बाबतीत सर्व नियम पाळले गेले आहेत का, याची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली जाईल.

"या प्रकरणाचा प्राथमिक तपास अहवाल येत्या १५ दिवसांत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, सभागृहात उपस्थित झालेल्या इतर सर्व तांत्रिक मुद्द्यांचीही स्वतंत्रपणे चौकशी केली जाईल," असे मिसाळ यांनी ठणकावून सांगितले. या संपूर्ण चौकशीचा सविस्तर अहवाल एका महिन्याच्या आत मागवण्यात आला असून, कोणत्याही प्रकारची अनियमितता किंवा भ्रष्टाचार आढळल्यास संबंधित विकासकाचा परवाना रद्द करण्यापर्यंतची कारवाई होऊ शकते.

मुंबईत वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, विकासकांकडून अग्निसुरक्षेच्या नियमांची होणारी पायमल्ली रोखण्यासाठी राज्य सरकार आता आक्रमक झाले आहे. या चौकशीमुळे जोगेश्वरी परिसरातील इतर बांधकाम प्रकल्पांचेही धाबे दणाणले असून, नियम धाब्यावर बसवणाऱ्या विकासकांचे धाबे दणाणले आहेत.

# कांदळवन गिळंकृत करणाऱ्यांची आता खैर नाही; उपग्रहाद्वारे होणार 'सर्जिकल स्ट्राईक'!

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबईला समुद्री लाटा आणि सुनामीपासून वाचवणाऱ्या कांदळवनांवर (खारफुटी) डल्ला मारणाऱ्या भूमाफियांना वनमंत्री गणेश नाईक यांनी आज विधानसभेत थेट इशारा दिला आहे. कांदळवन क्षेत्रातील एकही अतिक्रमण खपवून घेतले जाणार नाही, असे ठणकावून सांगत नाईक यांनी या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आणि दोषींवर कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. विशेष म्हणजे, केवळ अतिक्रमणेच हटवली जाणार नाहीत, तर मागील काही वर्षांतील 'सॅटेलाईट' (उपग्रह) चित्रांची मदत घेऊन कांदळवनाचा घास घेणाऱ्यांचा पर्दाफाश केला जाणार आहे.

बोरीवली विधानसभा क्षेत्रातील कांदळवनांवर झालेल्या अतिक्रमणाबाबत आमदार संजय उपाध्याय यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. यावर उत्तर देताना वनमंत्र्यांनी धक्कादायक माहिती



उघड केली. ७ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या संयुक्त पाहणीत वन विभाग, खासगी जमीन आणि ५० मीटरच्या बफर झोनमध्ये अनेक ठिकाणी नियमबाह्य बांधकामे झाल्याचे स्पष्ट झाले आहे. वन विभागाच्या अखत्यारीतील अतिक्रमणे हटवण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, हस्तांतरित न झालेल्या जागांबाबत नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

"कांदळवन हे मुंबईचे फुफ्फुस आणि नैसर्गिक भिंत आहे. त्याच्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही कंपनीला किंवा व्यक्तीला सोडले जाणार नाही," असे सांगत नाईक यांनी प्रशासकीय यंत्रणेलाही सतर्क केले. अधिवेशनानंतर वन, महसूल, महानगरपालिका आणि पोलीस अशा सर्व विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक बोलावली जाणार आहे. जर कोणत्याही अधिकाऱ्याने यापूर्वी अनियमित परवानग्या दिल्या असतील, तर त्यांच्यावरही गुन्हे दाखल केले जातील, असे मंत्र्यांनी स्पष्ट केले.

ज्या ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झाले आहे, तिथे पुन्हा वृक्षारोपण करून निसर्गाची हानी भरून काढली जाईल. उपग्रह चित्रे आणि जुन्या नकाशांच्या आधारे नेमके कुठे आणि कधी फेरफार झाले, याचा शोध घेतला जाणार आहे. सरकारच्या या आक्रमक भूमिकेमुळे मुंबईच्या किनारपट्टीवर अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# ५० वर्षांतील सर्वात भीषण उष्णतेचा तडाखा

## भविष्यातील संकटातून महाराष्ट्राला वाचवण्यासाठी पंकजा मुंडेंचे 'मिशन ५ आर'

**मुंबई, प्रतिनिधी**

गेल्या ५० वर्षांतील हवामानाचा कल पाहता २०२५ हे वर्ष सर्वाधिक उष्ण ठरले असून, हवामान बदलाच्या बाबतीत महाराष्ट्र देशातील सर्वाधिक 'धोकादायक' पाच राज्यांच्या यादीत पोहोचले आहे. या नैसर्गिक संकटाचा सामना करण्यासाठी आता राज्य सरकारने कंबर कसली असून, प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र आणि वैज्ञानिक 'हवामान कृती आराखडा' तयार करण्याची घोषणा पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी केली आहे.

विधान परिषदेत सुनील शिंदे यांनी उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर देताना पंकजा मुंडे यांनी राज्याच्या भविष्यातील पर्यावरणाचे





विदारक चित्र मांडले. "रस्ते, उद्योग आणि पायाभूत सुविधांच्या विकासात आपण वेगाने पुढे जात असलो, तरी निसर्गाचे संतुलन राखणे हे सर्वात मोठे आव्हान आहे," असे त्या म्हणाल्या. वाढते कार्बन उत्सर्जन रोखण्यासाठी राज्याने आता 'डिकार्बोनायझेशन' आणि कचरा व्यवस्थापनाच्या पाच सूत्रीवर (रिफ्यूज, रिड्यूस, रियूज, रिसायकल आणि रिकव्हर) भर देण्याचा निर्णय घेतला आहे.

या आराखड्याचे वैशिष्ट्य म्हणजे हा केवळ कागदी आराखडा नसून, ३५० हून अधिक तज्ज्ञांच्या मदतीने तो तयार करण्यात आला आहे. आता प्रत्येक जिल्ह्याचा अभ्यास करून तिथे कोणत्या प्रकारची पिके घ्यावीत, नद्यांची स्थिती काय आहे आणि प्रदूषण रोखण्यासाठी नेमके काय करावे लागेल, याचे सूक्ष्म नियोजन केले जाणार आहे. राज्यातील काही प्रमुख शहरांमध्ये हे प्रायोगिक प्रकल्प आधीच सुरू झाले असून, आता त्याचे जाळे जिल्हा पातळीवर विस्तारले जाणार आहे.

"हवामान बदलाचे परिणाम पूर्णपणे थांबवणे आपल्या हातात नसले, तरी त्याचे दुष्परिणाम कमी करणे आणि विकासाचा समतोल साधणे हे आमचे उद्दिष्ट आहे," असे मुंडे यांनी ठणकावून सांगितले. राज्याच्या या व्यापक आराखड्याला केंद्र सरकारनेही हिरवा कंदील दिला असून, यामुळे महाराष्ट्राला वाढत्या तापमानापासून वाचवण्यासाठी एक मोठी कवचकुंडले मिळणार आहेत.

## गोवंडी-मानखुर्दचा 'श्वास' मोकळा होणार! मृत्यूचा धूर ओकणारा भस्मीकरण प्रकल्प अखेर अंबरनाथला धाडला

**मुंबई, प्रतिनिधी**

मानखुर्द आणि शिवाजीनगर परिसरातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या 'एसएमएस एन्व्होक्लीन' या वादग्रस्त भस्मीकरण प्रकल्पाचे दिवस आता भरले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून या प्रकल्पातून निघणाऱ्या विषारी धुरामुळे त्रस्त असलेल्या रहिवाशांना मोठा दिलासा देत, हा प्रकल्प पुढील २१ महिन्यांत अंबरनाथ एमआयडीसीमध्ये स्थलांतरित केला जाईल, अशी घोषणा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत केली. या निर्णयामुळे गोवंडी परिसरातील प्रदूषणाच्या लढ्याला मोठे यश मिळाले आहे.

आमदार अबू आझमी यांनी विधानसभेत मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना पंकजा मुंडे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. "स्थानिक नागरिकांना होणारा त्रास आणि न्यायालयाच्या आदेशाचा मान राखून आम्ही हा प्रकल्प हलवण्याचा निर्णय घेतला आहे. पाताळगंगा आणि खालापूरमध्ये स्थानिकांच्या विरोधामुळे हा प्रकल्प उभारता आला नाही, मात्र आता अंबरनाथमध्ये नवीन जागा निश्चित झाली असून प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर सुरू होईल," असे त्यांनी सांगितले. २१ महिन्यांच्या कालावधीत जुना प्रकल्प पूर्णपणे बंद करून नव्या जागी स्थलांतरित करण्याचे लक्ष्य सरकारने ठेवले आहे.

केवळ भस्मीकरण प्रकल्पच नव्हे, तर या परिसरातील धुळीचे साम्राज्य निर्माण करणाऱ्या आरएमसी (सिमेंट) प्लांटवरही सरकारने हातोडा फिरवला आहे. एकूण आठ केंद्रांपैकी नियम मोडणाऱ्या चार केंद्रांना तातडीने टाळे ठोकण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सध्या सुरू असलेल्या उर्वरित चार केंद्रांवरही कडक देखरेख ठेवली जाणार असून, नियमांचे उल्लंघन झाल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाईसह थेट फौजदारी गुन्हे (खटले) दाखल केले जातील, असा कडक इशारा पंकजा मुंडे यांनी दिला.

या निर्णयामुळे मानखुर्द-शिवाजीनगर भागातील श्वसनाचे आजार आणि वाढत्या प्रदूषणामुळे हैराण झालेल्या लाखो नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाच्या मुदतीत हे स्थलांतर पूर्ण करण्याचे आव्हान आता प्रशासनासमोर असणार आहे.

## कर्जमाफीचे निकष जाहीर करण्याची मागणी

**मुंबई, प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या अर्थसंकल्पात पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा केली आहे. मात्र, प्रत्यक्षात त्यासाठी अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद नाही. याशिवाय कर्जमाफीसाठी ३० सप्टेंबर २०२५ ची अट घालून सरकारने शेतकऱ्यांचा विश्वासघात केला असून कर्जमाफीची घोषणा फसवी असल्याची टीका काँग्रेसच्या विजय वडेट्टीवार यांनी गुरुवारी विधानसभेत केली.

आज विधानसभेत गृह खात्यासह कृषी, जलसंपदा, अन्न आणि नागरी पुरवठा अशा सहा विभागाच्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा झाली. या चर्चेत सहभागी होताना वडेट्टीवार यांनी शेतकरी कर्जमाफीवरून सरकारला लक्ष्य केले. ज्या शेतकऱ्यांचे कर्ज दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांना लाभ कसा मिळणार? आधी त्यांनी वरची रक्कम भरावी आणि मग तुम्ही २ लाख देणार का? विधानसभा निवडणुकीत तुम्ही शेतकऱ्यांना सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते, त्याचे काय झाले? शेतकरी कर्जमाफीचे नेमके निकष काय आहेत याची स्पष्टता आली पाहिजे, अस वडेट्टीवार म्हणाले.

गेल्या वर्षी पावसात शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या. अशा खरडून गेलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीची सरकारने मशागत केली, असे एकतरी उदाहरण दाखवून द्या, असे आव्हान देताना वडेट्टीवार यांनी राज्य सरकारने केंद्राकडे शेतकऱ्यांच्या मदतीसाठी २९ हजार ७८१ कोटी रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव पाठवला होता. मात्र, केंद्राने राज्याला मदत दिली नाही. गुजरातला पाहणी पथक न पाठवता मदत दिली जाते. मात्र, महाराष्ट्राला मदत मिळत नाही. राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस देण्याची मागणी होती. मात्र , अर्थसंकल्पात त्याचा कोणताही उल्लेख नाही, याकडे लक्ष वेधत वडेट्टीवार यांनी शेतकऱ्यांसाठी धान खरेदीचा कोटा वाढवून देण्याची मागणी केली. तापी खोऱ्यातील उपसा सिंचन योजनेत मोठा भ्रष्टाचार झाला आहे. जळगाव जिल्ह्यातील ही योजना कागदोपत्री विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात दाखवून विदर्भाचा निधी लाटला जात आहे. या योजनेतील लाडके कंत्राटदार नेमके कोणाचे आहेत? असा सवाल त्यांनी केला.

राज्यातील कायदा-सुव्यवस्था पूर्णपणे कोलमडली असून पोलीस भरतीतही अनियमितता होत आहे. बीडमध्ये पोलीस भरती प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असून, अपात्र तरुणांना तोंडी परीक्षेत जास्त गुण दिल्याचे आरोप झालेले आहेत. ही प्रक्रि

# मुंबईतील झोपडीच्या 'माळ्या'वर राहणाऱ्यांचे नशीब फळफळणार?

**मुंबई, प्रतिनिधी**

मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये पहिल्या किंवा वरच्या मजल्यावर राहणाऱ्या लाखो रहिवाशांसाठी एक मोठी आणि दिलासादायक बातमी समोर येण्याची शक्यता आहे. एसआरए (SRA) प्रकल्पांमध्ये केवळ जमिनीला लागून असलेल्या झोपड्यांनाच घर मिळण्याचा आतापर्यंतचा नियम बदलण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. वरच्या मजल्यावरील रहिवाशांनाही हक्काचे घर मिळावे, यासाठी राज्य सरकार आता थेट मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या दरबारी 'विशेष धोरण' तयार करण्याच्या तयारीत आहे.

विधानसभेत आमदार सुनील प्रभू यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मंत्री शंभूराज देसाई यांनी ही महत्त्वपूर्ण माहिती दिली. सध्याच्या कायद्यानुसार, झोपडी जमिनीला टेकलेली असेल तरच ती पात्र ठरते. मात्र, मुंबईच्या वाढत्या गर्दीत एकावर एक मजले चढवून तिथे पिढ्यानपिढ्या राहणाऱ्या कुटुंबांचे काय? हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनीही यावर कडक भूमिका घेत, २०११ पूर्वीपासून पुराव्यांसह पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या नागरिकांचा विचार करून सरकारने व्यापक धोरण ठरवण्याचे निर्देश दिले आहेत.

मंत्री देसाई यांनी स्पष्ट केले की, अनेक ठिकाणी मूळ झोपडीधारकाने कालांतराने वरचे मजले बांधले आहेत, जिथे त्यांचे नातेवाईक किंवा भाडेकरू राहतात. सध्या हे प्रकरण न्यायालयातही प्रलंबित आहे. मात्र, मुंबईला खऱ्या अर्थाने झोपडपट्टीमुक्त करायचे असेल, तर वरच्या मजल्यावरील रहिवाशांच्या पात्रतेबाबत विद्यमान धोरणात बदल करणे आवश्यक आहे. यासाठी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची विशेष बैठक बोलावली जाणार आहे.

या निर्णयामुळे मुंबईतील दाट लोकवस्तीच्या झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून, त्यांच्या अनेक वर्षांच्या घराच्या स्वप्नाला कायदेशीर मान्यता मिळण्याची चिन्हे आहेत. सरकार यावर नक्की काय तोडगा काढते, याकडे संपूर्ण मुंबईचे लक्ष लागले आहे.

## अजित पवारांच्या अपघातातील सत्य सांगा! राष्ट्रवादीच्या सुनील शेळके यांची मागणी

**मुंबई, प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबद्दल अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत. अपघाताच्या घटनेबाबत पोलीस ठाण्यात तक्रार का घेतली जात नाही, ऐनवेळी विमानाचा वैमानिक का बदलण्यात आला. विमानाला टेक ऑफ घेण्यात वेळ का लागला, बारामतीत दृश्यमानता कमी असताना विमान उतरविण्याचा प्रयत्न का झाला, अपघाताबाबतअशा अनेक शंका उपस्थित होत असल्याने मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला अपघातामागचे सत्य सांगावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सुनील शेळके यांनी गुरुवारी विधानसभेत केली.

आज विधानसभेत गृह खात्यासह सहा खात्याच्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा झाली. या चर्चेत सहभागी होताना शेळके यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताचा मुद्दा मांडला. २८ जानेवारीला बारामतीत जो विमान अपघात झाला त्या विमानात अजितदादा पवार खरेच होते का? इथपासून शंका उपस्थित होत आहेत. अजितदादांच्या विमानाला झालेल्या अपघाताबद्दल वेगवेगळे तर्क लावलेजात आहेत, तसेच आरोप-प्रत्यारोप होत आहेत. विमान अपघाताच्या तपासावर दबाव असल्याने तपासातून काहीच निष्पन्न होणार नसल्याचे सांगितले जात असल्याचे शेळके म्हणाले.

अजित पवार यांच्या अपघातानंतरही आम्ही गप्प का? यामागे काही षडयंत्र आहे काय? अशा शंका उपस्थित केल्या जात आहेत. अजित पवार यांनी कधीही जातीचे राजकारण केले नाही. मात्र, त्यांच्या निधनानंतर अपघाताला जातीय रंग दिला जात आहे. आमचे नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांची नावे घेतली जात आहेत. आमच्या निष्ठा अजितदादांशी होत्या. त्यांच्या उत्तराधिकारी म्हणून सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपद आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपद स्वीकारले. आम्ही सर्व सुनेत्रा पवार, पार्थ आणि जय यांच्या पाठीशी उभे आहोत. त्यामुळे अजितदादांच्या अपघाताबद्दल सभागृहात खुली चर्चा झाली पाहिजे आणि मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला अपघामागचे सत्य सांगितले पाहिजे, असे शेळके म्हणाले. दरम्यान, पुण्यातील गहुंजे येथील क्रिकेट स्टेडियमला अजित पवार यांचे नाव देण्यात यावे. तसेच विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपण्यापूर्वी अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीतून काय निष्पन्न झाले याची माहिती देण्यात यावी, अशी मागणी सुनील शेळके यांनी केली.

## नवी मुंबईतील ११ हजार ८९० अनधिकृत बांधकामांवर कारवाई

### नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची माहिती

**मुंबई, प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिका आणि सिडको प्रशासनाने नवी मुंबईतील ११ हजार ८९० अनधिकृत बांधकामांवर कारवाई केल्याची माहिती नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी गुरुवारी विधानसभेत लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या उत्तरात दिली. नवी मुंबईत राजकीय पक्षांनी अनधिकृतपणे उभारलेल्या कमानीवर येत्या आठ दिवसात कारवाई केली जाईल, असे आश्वासनही मिसाळ यांनी दिले.

नवी मुंबईतील अनधिकृत बांधकामांबाबत भाजपच्या मंदा म्हात्रे यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. महापालिका आणि सिडकोच्या जागांच्या मालकीवर भू माफिया अनधिकृत बांधकाम करत असल्याची तक्रार म्हात्रे यांनी यावेळी केली.

त्यावर, नवी मुंबईत महापालिकेने अनधिकृत बांधकाम प्रकरणात ८७० नोटीस बजावल्या होत्या. त्यातील ३४० अनधिकृत बांधकामे आणि ३ हजार १३३ अनधिकृत झोपड्यांवर कारवाई केली. याप्रकरणी १२६ गुन्हे दाखल केले आहेत. सिडकोने केलेल्या कारवाईत १० हजार १६० नोटीस बजवल्या असून त्यातील ८ हजार ४१७ अतिक्रमणे पाडण्यात आली. तसेच ४ प्रकरणात गुन्हे दाखल केल्याची माहिती मिसाळ यांनी दिली.

नवी मुंबईत अनधिकृतपणे दोन नव्याने कमानी बांधल्या आहेत. रस्त्यावर बॅनर,पोस्टरच्या कमानी उभारल्या जात आहेत. महापालिका, पोलीस प्रशासनाचीही परवानगी घेतली जात नाही. तसेच अनधिकृत बांधकामांवर कारवाई होत नाही, असा आरोप म्हात्रे यांनी यावेळी केला. यावेळी अशा कमानींचे अतिक्रमण असेल तर त्यावर आठ दिवसात कारवाई करण्याचे आश्वासन राज्यमंत्र्यांनी दिले.

# मुंबईच्या आभाळाला भिडणाऱ्या इमारती आता 'फायरप्रूफ' होणार

## चेन्नईला मागे टाकत मुंबईत येणार देशातील सर्वात उंच शिडी

**मुंबई, दि. १३ प्रतिनिधी**

मुंबईतील गगनचुंबी इमारतींची वाढती संख्या आणि तिथे उद्भवणाऱ्या आगीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. मुंबईची अग्निशमन यंत्रणा आता केवळ आधुनिकच नाही, तर देशातील सर्वात प्रगत यंत्रणा बनणार असल्याची ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत दिली. मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरात आगीच्या संकटाचा सामना करण्यासाठी आता जगातील सर्वोत्तम तंत्रज्ञान आणण्याची तयारी सरकारने सुरू केली आहे.

आमदार प्रवीण दरेकर यांनी नियम ९२ अन्वये उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेला उत्तर देताना सामंत यांनी ही माहिती दिली. सध्या मुंबई अग्निशमन दलाकडे ९४ मीटर उंचीपर्यंत पोहोचणारी शिडी उपलब्ध आहे. मात्र, मुंबईतील इमारतींची उंची पाहता ही यंत्रणा अपुरी पडू शकते. विशेष म्हणजे, सध्या देशातील सर्वात उंच १०४ मीटरची शिडी चेन्नईमध्ये आहे. आता मुंबई महानगरपालिकेला चेन्नईपेक्षाही अधिक प्रगत आणि





उंच शिडी खरेदी करण्याच्या सूचना दिल्या जातील, असे मंत्र्यांनी स्पष्ट केले. यामुळे मुंबईच्या सुरक्षा ताफ्यात लवकरच एक 'महाकाय' यंत्र दाखल होणार आहे.

केवळ उंच शिडीच नाही, तर यापुढे मुंबईतील प्रत्येक उंच इमारतीसाठी 'अग्निसुरक्षा नियमावली' अधिक कठोर करण्यात आली आहे. नवीन इमारतींना परवानगी देताना फायर स्टेअरकेस, फायर लिफ्ट, अत्याधुनिक स्प्रिंकलर प्रणाली आणि आपत्कालीन अलार्म व्यवस्था असणे आता बंधनकारक असेल. या सर्व सुविधांची प्रत्यक्ष पडताळणी केल्याशिवाय महानगरपालिका किंवा अग्निशमन दल इमारतीला अंतिम भोगवटा प्रमाणपत्र (OC) देणार नाही.

मुंबई हे देशाचे आर्थिक केंद्र आणि आंतरराष्ट्रीय शहर असल्याने, येथील रहिवाशांना आगीच्या धोक्यापासून वाचवण्यासाठी सरकार कोणतीही कसर सोडणार नाही, असा विश्वासही उदय सामंत यांनी यावेळी व्यक्त केला. या निर्णयामुळे मुंबईतील उंच इमारतींमध्ये राहणाऱ्या लाखो कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### वैद्यकीय प्रवेशाच्या बहाण्याने ३० लाखांची दोघांची फसवणूक

**मुंबई, प्रतिनिधी**

वैद्यकीय कॉलेजमध्ये प्रवेश देण्याच्या बहाण्याने एका त्रिकुटाने दोघांची सुमारे तीस लाखांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी लक्ष्मण भोसले, प्रांजली लक्ष्मण भोसले आणि केतन दत्तात्रय खजिनदार या तिघांविरुद्ध नवघर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून आरोपी पळून गेले आहेत.

यातील तक्रारदार हॉटेल व्यावसायिक असून सातारा, कोरेगावचे रहिवाशी आहे. त्यांच्या चुलत भावाच्या मुलाला वैद्यकीय कॉलेजमध्ये प्रवेश हवा होता. नीट परिक्षेत कमी मार्क्स मिळाल्याने ते मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश मिळावा यासाठी प्रयत्नशील होते.

आरोपींपैकी प्रांजली ही शिक्षण अधिकारी असून ती त्याला वैद्यकीय कॉलेजमध्ये प्रवेश देईल असे सांगितले होते. पुण्यातील पिंपरी-चिंचवडच्या डॉ. डी. वाय पाटील वैद्यकीय कॉलेजमध्ये प्रवेश देण्याचे आश्वास देऊन त्यांना एक कोटी वीस लाख रुपये जमा करावे लागतील असे सांगितले. टोकन म्हणून दहा लाख रुपये दिले होते. मात्र लक्ष्मण आणि प्राजंलीने त्याला कॉलेजमध्ये प्रवेश दिला नाही. दरम्यान त्यांना या दोघांनी अशाच प्रकारे एका व्यक्तीकडून वैद्यकीय कॉलेजमध्ये प्रवेश देण्यासाठी वीस लाख रुपये घेतल्याचे समजले. या दोघांकडून तीस लाख रुपये घेऊन त्यांनी त्यांच्या मुलांना वैद्यकीय कॉलेजमध्ये प्रवेश न देता त्यांची फसवणुक केली होती. हा प्रकार लक्षात येताच तक्रारदारांनी या तिघांविरुद्ध नवघर पोलिसांत तक्रार केली आहे.

### महानगर गॅसचे बिल भरण्यासाठी बोगस लिंक पाठवून फसवणूक

**मुंबई, प्रतिनिधी**

महानगर गॅसचे बिल भरण्यासाठी बोगस लिंक पाठवून एका वयोवृद्धाची अज्ञात सायबर ठगाने फसवणूक केल्याची घटना वडाळा परिसरात उघडकीस आली आहे. साडेपाचशे रुपयांचे बिल भरण्यास सांगून या ठगाने त्यांच्या बँक खात्याचे ॲक्सेस घेऊन सुमारे सव्वाबारा लाख रुपये ट्रान्स्फर करुन ही फसवणूक केली. ७२ वर्षांच्या तक्रारदाराला ७ मार्चला एका अज्ञात व्यक्तीने मॅसेज करुन तो महानगर गॅस कंपनीतून बोलत असल्याचे सांगून त्यांचे ५५० रुपयांचे बिल बाकी आहे. ते बिल तातडीने भरा, नाहीतर गॅस जोडणी बंद होईल असे सांगितले. त्यासाठी त्याने त्यांना एक एपीके फाईल पाठविली. त्यांनी ती लिंक ओपन केली असता समोर महानगर गॅसचा लोगो दिसला. त्यात त्यांनी पैसे भरण्याचा प्रयत्न केला होता. दुसऱ्या दिवशी त्यांच्या मोबाईलवर बँक खात्यातून पाच ऑनलाईन व्यवहार होऊन ८ लाख २५ हजार ७९५ रुपये तसेच त्यांच्या पत्नीच्या बँक खात्यातून दोन ऑनलाईन व्यवहार होऊन ३ लाख ९९ हजार ५०० रुपये असे एकूण १२ लाख २५ हजार २९५ रुपये डेबीट झाले आहेत.

### मोबाईल हॅक करून २३ लाखांचा ऑनलाईन व्यवहार

**मुंबई, प्रतिनिधी**

मोबाईल हॅक करून सुमारे २३ लाखांचा ऑनलाईन व्यवहार करून एका वयोवृद्ध व्यावसायिकाची अज्ञात व्यक्तीने फसवणूक केली आहे. तक्रारदार ८५ वर्षांचे असून ते गोवंडीतील देवनार परिसरात राहतात. त्यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. १० मार्चला त्यांना एका अज्ञात व्यक्तीने कॉल करुन तो त्यांच्या बँकेचा कर्मचारी बोलत असल्याचे सांगितले. त्यांच्या बँक खात्यातून तीन वेगवेगळे ऑनलाईन व्यवहार झाले असून आणखी काही व्यवहार होत आहेत. त्यांच्याशी बोलताना त्याने त्यांचा मोबाईल हॅक केला होता. त्यांना कॉल चालू ठेवण्यास सांगून स्वतःचा कॉल बंद केला होता. हा प्रकार संशयास्पद वाटताच त्यांनी कॉल बंद करुन त्यांच्या बँक मॅनेजरला कॉल करुन ही माहिती दिली. त्यानंतर त्यांच्या मॅनेजरने त्यांच्यासह त्यांच्या पत्नी आणि मुलीच्या बँक खात्याची पाहणी केली. या तिन्ही बँक खात्यातून काही ऑनलाईन व्यवहार झाल्याचे सांगितले. त्यांच्या बँक खात्यातून ७ लाख ९९ हजार ९६६, त्यांच्या पत्नीच्या बँक खात्यातून ४ लाख ९९ हजार ०२६ तर त्यांच्या मुलीच्या बँक खात्यातून ९ लाख ८६ हजार ६८६ रुपये डेबीट झाले होते.

### एस.टी. डेपोंच्या विकासाकरिता भाडेकरार ९८ वर्षांपर्यंत वाढवला

**मुंबई, प्रतिनिधी**

एस.टी. महामंडळाच्या मालकीच्या मोकळ्या जागांचा सार्वजनिक-खासगी सहभाग तत्त्वावर विकास केला जाणार आहे. त्यासाठी विकासकांना आकर्षित करण्यासाठी भाडेकराराचा कालावधी आता ४९ + ४९ वर्षे म्हणजे एकूण ९८ वर्षे वाढविण्याचे धोरण महामंडळाने आखले आहे, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत दिली. यासंदर्भातील प्रस्तावाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून, अंतिम मंजुरीसाठी तो राज्य सरकारकडे पाठवण्यात आला आहे. मंजुरी मिळाल्यानंतर निविदा प्रक्रियेला वेग येईल, असा विश्वास सरनाईक यांनी व्यक्त केला.

एस.टी. महामंडळाचे डेपो, एस.टी. स्टैंडच्या जागांचा विकास 'बीओटी' तत्त्वावर करण्यासंदर्भात भाजपच्या उमा खापरे, गटनेते प्रवीण दरेकर यांनी अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती.

यापूर्वी भाडेकराराचा कालावधी ३० वर्षांऐवजी ६० वर्षांपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, त्यानंतरही कमी कालावधीच्या भाडेकरारामुळे अनेक ठिकाणी विकासकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे आता व्यावसायिक तत्त्वावर विकास प्रकल्पांसाठी प्रत्यक्ष भाडेकरार ४९+४९ वर्षे म्हणजे एकूण ९८ वर्षे ठेवण्याबाबत ही योजना आखून निविदा प्रक्रिया राबवावी यासंदर्भात एस. टी. महामंडळाने धोरण आखले आहे, असे सरनाईक म्हणाले. दरम्यान, एस.टी. महामंडळाला १०० वर्षे पूर्ण होत आली असून, शहरांमध्ये जमिनीच्या विकासासाठी विकासकांचा कल अधिक असतो; हे लक्षात घेऊन शहरी, तालुका आणि ग्रामीण भागातील प्रत्येकी किमान एक डेपो किंवा एस.टी. स्थानकांचे पॅकेज तयार करून त्यांच्या विकासासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे सरनाईक म्हणाले.

### खटला चालत नसेल तर आरोपीला तुरुंगात डांबता येणार नाही : मुंबई सत्र न्यायालय

**मुंबई, प्रतिनिधी**

खटला प्रभावीपणे चालत नसेल तर आरोपीला बेभरवशी काळासाठी तुरुंगात डांबता येणार नाही, असा महत्वपूर्ण निर्वाळा मुंबई सत्र न्यायालयाने दिला आहे. बनावट नोटांच्या मोठ्या रॅकेटमधील आरोपीला जामीन मंजूर करताना सत्र न्यायाधीश अनिल साळुंखे यांनी हा निर्णय दिला. खटल्याच्या रखडपट्टीमुळे वर्षानुवर्षे तुरुंगात खितपत पडणाऱ्या आरोपींना सत्र न्यायालयाच्या या निर्णयाने दिलासा मिळणार आहे. गेल्यावर्षी जानेवारीमध्ये भायखळ्यात पोलिसांनी बनावट नोटांच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला होता. त्यातील आरोपी उमरान बलबले याने जामिनासाठी ॲड. गणेश नागरगोजे यांच्यामार्फत सत्र न्यायालयात अर्ज केला होता. त्यावर सुनावणी घेताना न्यायालयाने पोलिस तपासातील त्रुटींवर बोट ठेवत सरकारी पक्षाला झटका दिला. बनावट नोटांच्या रॅकेटच्या तपासाची संपूर्ण कागदपत्रे बारकाईने तपासली. त्या कागदपत्रांवरून अर्जदार आरोपीचा बनावट नोटा तयार करण्यात सहभाग असल्याचे कुठेही दिसून येत नाही. तसेच या गुन्ह्याचा खटला प्रभावीपणे चालत नाही. अशा स्थितीत आरोपीला बेभरवशी काळ तुरुंगात डांबता येणार नाही, असेही न्यायलयाने सांगितले.

### शुल्क निर्धारणासाठी चौकशी समिती

**मुंबई, प्रतिनिधी**

महाविद्यालयीन शुल्क निर्धारण प्रक्रियेत अनियमिततेच्या तक्रारींची शासनाने दखल घेतली असून निवृत्त उच्च न्यायालय न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करुन याबाबतची चौकशी करण्यात येईल, अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात केली. दरम्यान, या चौकशी प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागातील उपसचिव स्तरावरील अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. सदस्य महेश शिंदे यांनी या संदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य प्रशांत बंब यांनी सहभाग घेतला. चंद्रकांत पाटील म्हणाले, न्यायालयाच्या सर्वोच्च निर्णयानुसार राज्यात शुल्क निर्धारणासाठी (फी रेग्युलेशन ॲथॉरिटी) कार्यरत आहे. प्रत्येक महाविद्यालयाने मागील वर्षाचे ऑडिट केलेले अहवाल सादर करणे बंधनकारक असते. दरम्यान, महाविद्यालयांकडून बोगस खर्च दाखवला जातोय, त्याला आळा बसेल, असेही पाटील म्हणाले.



# अब मैं अपने एक्टिंग करियर पर पूरा फोकस करना चाहती हूं

रियलिटी शो रियलिटी शो 'द 50' से बाहर होने के बाद अभिनेत्री दिव्या अग्रवाल ने इंटरव्यू में बड़ा बयान दिया। उन्होंने खुलकर बताया कि शो का अनुभव उनके लिए कैसा रहा और अब वह अपने करियर को किस दिशा में आगे बढ़ाना चाहती हैं। दिव्या अग्रवाल ने आईएएनएस से बात करते हुए कहा, ''मुझे इस बात की खुशी है कि मैं अब इस शो से बाहर आ चुकी हूं। यह शो काफी हद तक मेल डॉमिनेटेड था और इसमें बहुत ज्यादा फिजिकल एक्टिविटी शामिल थी। शो में हर कोई खुद को नोटिस करवाने की कोशिश कर रहा था। इसी वजह से कई बार कंटेस्टेंट्स एक-दूसरे के बारे में अजीब और अनचाही बातें भी कह देते थे। यह माहौल कई बार असहज कर देने वाला होता था।'' दिव्या ने आगे कहा, ''मैंने यह शो अपने फैंस की वजह से किया था। लंबे समय से मेरे फैंस मुझसे कह रहे थे कि मुझे एक और रियलिटी शो में हिस्सा लेना चाहिए। इसी वजह से मैंने 'द 50' में हिस्सा लेने का फैसला किया था।''

उन्होंने कहा, 'अब मैं किसी भी तरह का रियलिटी शो नहीं करूंगी। मेरा ध्यान सिर्फ और सिर्फ अभिनय पर रहेगा। मैं अपने एक्टिंग करियर पर पूरा फोकस करना चाहती हूं।'' दिव्या अग्रवाल के करियर की बात करें तो उन्होंने मनोरंजन की दुनिया में अपनी पहचान एक रियलिटी शो कंटेस्टेंट के तौर पर बनाई। साल 2017 में उन्होंने 'एमटीवी स्प्लिट्सविला 10' में हिस्सा लिया था। इस शो में वह अभिनेता प्रियांक शर्मा के साथ रनर-अप रहीं और यहीं से उन्हें बड़ी पहचान मिली। इसके बाद उन्होंने कई रियलिटी शोज और टीवी प्रोजेक्ट्स में काम किया और धीरे-धीरे दर्शकों के बीच लोकप्रिय होती चली गईं। 2018 में दिव्या ने 'एमटीवी ऐस ऑफ स्पेस' में हिस्सा लिया और इस शो की विजेता बनीं। इस जीत ने उन्हें टीवी इंडस्ट्री में और मजबूत पहचान दिलाई। इसके बाद उन्होंने एक्टिंग में डेब्यू किया और हॉरर वेब सीरीज 'रागिनी एमएमएस: रिटर्न्स' के दूसरे सीजन में नजर आईं। उनके करियर में बड़ा मोड़ तब आया वह 'बिग बॉस ओटीटी सीजन 1' की विजेता बनीं। इस जीत के बाद उनकी लोकप्रियता में जबरदस्त इजाफा हुआ और उन्हें कई वेब सीरीज, म्यूजिक वीडियो और अन्य प्रोजेक्ट्स के ऑफर मिलने लगे।



# टीवी के बाद अब ओटीटी पर जादू बिखेरेंगी रूप दुर्गापाल

'स्वरागिनी,' 'कुछ रंग प्यार के ऐसे भी,' और 'बालवीर' जैसे कई धारावाहिकों में काम कर घर-घर में अपनी पहचान बना चुकी अभिनेत्री रूप दुर्गापाल अब ओटीटी डेब्यू करने जा रही हैं। दरअसल, अभिनेत्री जल्द ही आगामी वेब सीरीज 'संकल्प' में नजर आएंगी। इस सीरीज में वे अभिनेता मोहम्मद जीशान अय्यूब की पत्नी माधुरी के किरदार में हैं। रूप ने अपने को-स्टार जीशान के अभिनय की जमकर प्रशंसा की। उन्होंने कहा, 'जीशान बहुत ही शानदार अभिनेता है। एनएसडी से पढ़ाई करने और फिल्मों-वेब सीरीज में इतना अनुभव होने के कारण उनसे बहुत कुछ सीखने को मिला। उनके सीन्स को देखने का नजरिया, भाषा पर अच्छी पकड़ और एनर्जी ने मेरे साथ के सीन को बेहतर बनाया। मैं हर दिन सेट पर उनके आने का इंतजार करती थी।' अभिनेत्री ने आगे सीरीज की पूरी टीम की सराहना की। उन्होंने बताया कि शानदार कलाकारों के साथ काम करना ही उन्हें इस प्रोजेक्ट में शामिल होने के लिए उत्साहित कर रहा था। अभिनेत्री ने कहा, 'जब सबके पास अच्छा काम होता है, तो सेट पर और बाहर भी बहुत कुछ सीखने को मिलता है। नाना पाटेकर सर और प्रकाश सर के साथ काम करना एक्टिंग, फिल्म बनाने और जिंदगी के कई पहलुओं को समझने जैसा था। मेघना मलिक से भी बहुत कुछ सीखा। हम लंच और डिनर के दौरान भी खूब बातें करते थे। वे न सिर्फ बेहतरीन एक्टर हैं, बल्कि बहुत अच्छे इंसान भी हैं।' उन्होंने आगे बताया कि सीरीज के लिए उन्हें ऑफर कैसे मिला था। उन्होंने बताया, 'साल 2019 तक मैंने टेलीविजन से आगे जाने के बारे में ज्यादा नहीं सोचा था, लेकिन कोविड के दौरान सब कुछ बदल गया। लोगों को जाते देखकर मुझे एहसास हुआ कि जिंदगी बहुत छोटी है। कुछ भी कहा नहीं जा सकता। तब मैंने फैसला लिया कि अब उन चीजों को आजमाना है जिनसे पहले डर लगता था।'

उत्तराखंड के अल्मोड़ा की रहने वाली अभिनेत्री रूप ने सिल्वर स्क्रीन पर परफॉर्म करने के अलावा, थिएटर में भी काम किया, जो उनके लिए नया था। उन्होंने थिएटर को लेकर अपना एक्सपीरियंस शेयर करते हुए बताया, 'बिना कट, रीटेक के, महीनों रिहर्सल करके स्टेज पर परफॉर्म करना काफी अजीब था, लेकिन जिंदगी की अनिश्चितता ने मुझे हिम्मत दी। स्टेज पर खड़े होकर बिना किसी डर के परफॉर्म करना शानदार अनुभव था। इसी हिम्मत ने मुझे टीवी से आगे बढ़कर वेब सीरीज में आने की ताकत दी।' अभिनेत्री का मानना है कि हर किसी का सफर अलग होता है और सब कुछ अपने सही समय पर ही होता है। उन्होंने कहा, 'शायद मेरा सफर ऐसा ही होना था। सालों की संख्या मायने नहीं रखती। मैं बहुत खुश हूं कि यह सब अपने आप हुआ।' सीरीज का निर्देशन प्रकाश झा ने किया है। रूप ने निर्देशक की भी जमकर तारीफ की। उन्होंने कहा, 'प्रकाश सर के साथ काम करना किसी बड़े संस्थान में पढ़ाई करने जैसा था। साथ ही काम में मजा भी आता था और यादगार पल भी बनते थे।'



# फिल्मों में मिलने वाली फीस सिर्फ जेंडर पर निर्भर नहीं होती

बॉलीवुड में अक्सर यह चर्चा होती रहती है कि एक्टर्स और एक्ट्रेसेस की फीस में काफी फर्क होता है। इसी मुद्दे पर अब अभिनेता सैफ अली खान ने अपनी राय रखी है।

हाल ही में यूट्यूब में एक पॉडकास्ट में बातचीत के दौरान सैफ ने कहा कि फिल्मों में मिलने वाली फीस सिर्फ जेंडर पर निर्भर नहीं होती। उनके मुताबिक किसी कलाकार को कितना पैसा मिलेगा, यह काफी हद तक उसकी स्टार पावर और बॉक्स ऑफिस पर दर्शकों को थिएटर तक लाने की क्षमता पर निर्भर करता है। सैफ का कहना है कि अगर दो कलाकार एक जैसी स्टार वैल्यू रखते हैं, तो उन्हें बराबर पैसा मिलना चाहिए। लेकिन फिल्म इंडस्ट्री का अपना एक आर्थिक गणित भी होता है। जो कलाकार ज्यादा दर्शक खींचता है, उसकी फीस भी उसी हिसाब से तय होती है।

### इंडस्ट्री में चीजें बेहतर हो रही हैं

उन्होंने यह भी कहा कि सिर्फ इसलिए किसी को ज्यादा या कम पैसे नहीं मिलने चाहिए कि वह मेल है या फीमेल। असल में इंडस्ट्री में यह तय होता है कि कौन स्टार बॉक्स ऑफिस पर कितना असर डाल रहा है। सैफ के मुताबिक धीरे-धीरे इंडस्ट्री में चीजें बेहतर हो रही हैं और अब पे-पैरिटी पर पहले से ज्यादा खुलकर बात हो रही है। सैफ अली खान दिग्गज अभिनेत्री शर्मिला टैगोर के बेटे हैं। उनकी शादी अभिनेत्री करीना कपूर से हुई है।

### वर्कफ्रंट

सैफ जल्द ही नेटफ्लिक्स की पीरियड ड्रामा फिल्म 'हम हिंदुस्तानी' में नजर आएंगे। यह फिल्म भारत के पहले लोकतांत्रिक चुनाव के पीछे की कहानी को दिखाती है। इस फिल्म में प्रतीक गांधी भी अहम भूमिका में हैं और इसका निर्देशन राहुल ढोलकिया ने किया है। हालांकि फिल्म की रिलीज डेट अभी घोषित नहीं की गई है। इसके अलावा सैफ के पास प्रियदर्शन की फिल्म 'हैवान' भी पाइपलाइन में है, जिसमें उनके साथ अक्षय कुमार भी नजर आएंगे। फिल्म की शूटिंग पूरी हो चुकी है, लेकिन इसकी रिलीज डेट का अभी इंतजार है। पिछले साल सैफ नेटफ्लिक्स की फिल्म 'ज्वेल थीफ: द हीस्ट बिगिन्स' में दिखाई दिए थे।

# करीना कपूर ने फिल्मों में खून-खराबे के ट्रेंड पर जाहिर की चिंता



करीना कपूर खान ने हाल ही में फिल्मों में बढ़ती हिंसा और खून-खराबे के ट्रेंड पर अपनी चिंता जाहिर की है। उनका कहना है कि आजकल की कई फिल्मों में पहले जैसी मस्ती, रंग, गाने और रोमांस की कमी महसूस होती है। हाल ही में द हॉलीवुड रिपोर्टर इंडिया को दिए एक इंटरव्यू में करीना ने कहा कि मौजूदा समय में कई फिल्में ज्यादा 'क्राइम और खून' पर ज्यादा फोकस करती हैं। उनके मुताबिक, इस तरह की फिल्मों में पहले जैसा मनोरंजन, एनर्जी, रंग और रोमांस देखने को कम मिलता है, जो कभी बॉलीवुड की पहचान हुआ करता था। करीना ने यह भी माना कि सिनेमा में बढ़ती 'हाइपर-मस्कुलिनिटी' यानी अत्यधिक मर्दानगी दिखाने का चलन उन्हें थोड़ा डराता है। उनका मानना है कि फिल्में सिर्फ एक्शन और हिंसा तक सीमित नहीं होनी चाहिए, बल्कि उनमें प्यार, म्यूजिक और भावनाएं भी उतनी ही जरूरी हैं। वर्क फ्रंट की बात करें तो करीना कपूर खान जल्द ही निर्देशक मेघना गुलजार की फिल्म 'दायरा' में नजर आएंगी। इस फिल्म में उनके साथ पृथ्वीराज सुकुमारन भी मुख्य भूमिका में दिखाई देंगे।

# शानदार अभिनेता हैं नाना पाटेकर, अपने काम के प्रति पूरी तरह समर्पित रहते हैं

अभिनेत्री कुब्रा सैत, जो इन दिनों अपनी आने वाली फिल्म संकल्प को लेकर चर्चाओं में हैं। इस फिल्म में उनके साथ नाना पाटेकर हैं।
फिल्म संकल्प का निर्देशन प्रकाश झा कर रहे हैं। हाल ही में फिल्म का ट्रेलर रिलीज किया गया, जिसे लोग काफी पसंद कर रहे हैं। इस बीच क्रुब्रा सैत ने नाना पाटेकर के साथ काम करने के अनुभव को साझा किया। क्रुबा ने कहा कि उन्होंने नाना पाटेकर से अभिनय की बारीकियां सीखीं हैं, साथ ही उन्हें काम के प्रति समर्पण भी सीखने को मिला। नाना पाटेकर की तारीफ करते हुए कुब्रा सैत ने कहा, नाना पाटेकर शानदार अभिनेता हैं। वह अपने काम के प्रति पूरी तरह समर्पित रहते हैं। वह हर सीन को बहुत गंभीरता से लेते हैं और उसकी तैयारी भी उतनी ही मेहनत से करते हैं। वह अक्सर अगले दिन के सीन्स की कहानी खुद अपने हाथों से लिखते हैं और फिर उसकी हर लाइन को याद भी करते हैं। कुब्रा ने कहा, नाना पाटेकर की लिखने की शैली बहुत प्रभावशाली है और काम करने का तरीका भी बेहद अलग है। सेट पर उन्हें काम करते हुए देखना मेरे लिए किसी सीखने वाली क्लास की तरह है। सेट के बारे में बताते हुए कुब्रा ने कहा, संकल्प के सेट पर कलाकारों के बीच काफी सहयोग भरा माहौल था, जहां हर कोई एक-दूसरे से कुछ नया सीख रहा था। नाना पाटेकर जैसे कलाकार नई पीढ़ी के अभिनेताओं के लिए एक प्रेरणा हैं और उनके साथ काम करना किसी सौभाग्य से कम नहीं है।



# अपनी पर्सनल लाइफ के मुद्दे मैं खुद संभाल लूंगा



**एक्टर और राजनेता थलापति विजय इन दिनों लगातार सुर्खियों में बने हुए हैं। वजह है उनकी पर्सनल जिंदगी। विजय की पत्नी ने संगीता सोरनलिंगम ने 26 साल के वैवाहिक जीवन के बाद विजय से तलाक के लिए अर्जी डाली है। उन्होंने विजय के एक अभिनेत्री से अफेयर की बात कही है। इसके बाद विजय का नाम एक्ट्रेस तृषा कृष्णन के साथ जोड़ा जाने लगा। इस बीच हाल ही में विजय तृषा के साथ एक कार्यक्रम में भी शामिल हुए। वहीं विजय की फिल्म 'जन नायकन' को लेकर भी विवाद अभी तक थमा नहीं है। इस बीच अब विजय ने अपने आसपास की हाल ही की समस्याओं पर बात की है।**

अपनी पर्सनल लाइफ को लेकर चर्चाओं में बने थलापति विजय का एक वीडियो सोशल मीडिया पर वायरल है। यह वीडियो चेन्नई में उनकी पार्टी 'तमिलगा वेट्री कजगम' (टीवीके) के महिला दिवस कार्यक्रम का है। इस कार्यक्रम में लोगों को संबोधित करते हुए विजय ने अपनी हालिया समस्याओं को लेकर बात की। वीडियो में विजय अपने प्रशंसकों से अपील करते हुए दिख रहे हैं कि वे उनकी समस्याओं के कारण दुखी या तनावग्रस्त न हों। उन्होंने कहा, 'कृपया मेरे आसपास की हाल की समस्याओं के बारे में चिंता न करें। ये मुद्दे आपके समय के लायक नहीं हैं। मैं इन्हें खुद संभाल लूंगा। मुझे सबसे ज्यादा दुख तब होता है, जब आप मेरी समस्याओं के कारण दुखी या तनावग्रस्त होते हैं। कृपया मेरे लिए यह बोझ न उठाएं। इसके बजाय, लोगों के कल्याण पर ध्यान दें।'

## पत्नी ने दायर की विजय से तलाक की याचिका

विजय की ये टिप्पणी ऐसे समय में आई हैं, जब उनका निजी जीवन ऑनलाइन और मीडिया में व्यापक चर्चा का विषय बना हुआ है। कुछ समय पहले ही उनकी पत्नी संगीता सोरनलिंगम ने 26 साल के वैवाहिक जीवन के बाद विजय से तलाक के लिए याचिका दायर की थी। विजय और संगीता का विवाह अगस्त 1999 में हुआ था और उनके दो बच्चे हैं - जेसन संजय और दिव्या शशा। पत्नी ने याचिका में आरोप लगाया गया है कि विजय का एक महिला अभिनेत्री के साथ एक्स्ट्रा मैरिटल अफेयर था। याचिका के अनुसार, संगीता को इस कथित संबंध के बारे में 2021 में पता चला। संगीता ने बाद में निवास सुरक्षा और आर्थिक सहायता के लिए एक और याचिका दायर की।

## तृषा के साथ कार्यक्रम में पहुंचे विजय

पत्नी के आरोपों के बाद विजय का नाम तृषा कृष्णन के साथ जोड़ा जाने लगा। तृषा और विजय का नाम इससे पहले भी जोड़ा गया था। हालांकि, बाद में दोनों का रिश्ता खत्म हो गया, लेकिन तृषा ने अभी तक शादी नहीं की है। ऐसे में जब पत्नी ने ये आरोप लगाए, तो सोशल मीडिया पर एक बार फिर तृषा का नाम विजय के साथ जोड़ा जाने लगा। इन आरोपों के बीच विजय तृषा के साथ फिल्म निर्माता कलपथी सुरेश और मीनाक्षी के बेटे के विवाह समारोह में पहुंचे। विजय और तृषा एक ही कार में समारोह में पहुंचे और साथ ही वहां से जाते हुए भी देखे गए। इसके बाद संगीता ने एक नई याचिका भी दायर की है।



# एक अरब 85 करोड़ से सड़क-पुलों और डैम पर होगा काम, UP के इस जिले को चमकाने के लिए एक्शन प्लान तैयार

**बलरामपुर**

गांवो में मजदूरों को रोजगार देने और विकास कार्यो के लिए विकसित भारत रोजगार एवं आजीविका मिशन के तहत कार्य योजना तैयार की गई है। वित्तीय वर्ष 2026-27 में योजना के तहत एक अरब 85 करोड़ 93 लाख दो हजार 300 रुपये विकास कार्यों पर खर्च होंगे। निर्धारित कार्य योजना में 44 लाख 26 हजार 910 मानव दिवस सृजित कर श्रमिकों को रोजगार उपलब्ध कराए जाएंगे। यह कार्ययोजना युक्तधारा पोर्टल पर अपलोड कर दी गई है। इससे न सिर्फ गांवों में विकास की गंगा बहेगी, बल्कि श्रमिकों का पलायन भी रुकेगा।

विकसित भारत ग्रामीण रोजगार और आजीविका मिशन के तहत आगामी वर्ष में 793 ग्राम पंचायतों में मजदूरों को रोजगार देने और विकास कार्य कराने की तैयारी पूरी कर ली गई है। इसके लिए एक अरब 88 लाख रुपये योजना तैयार की गई है। इससे गांवों की तस्वीर बदलने की तैयारी है।

इस योजना के तहत श्रमिकों को बड़े पैमाने पर रोजगार देने का लक्ष्य रखा गया है। करीब 44 लाख मानव दिवस सृजित करने की तैयारी है। वहीं इस बार से श्रमिकों को वर्ष में 125 दिन तक काम मिल सकेगा। जिले में एक लाख.49 हजार सक्रिय श्रमिकों को इसका सीधा फायदा मिलने की उम्मीद है। कार्य योजना के अनुसार जल संरक्षण, जल संग्रहण, पर्यावरण बचाने के लिए पौधरोपण, पशुपालन



को बढ़ावा देने के लिए कैटल शेड का निर्माण, जरूरतमंदों के लिए आवास संबंधी कार्य और गांवों में कच्चे-पक्के निर्माण कार्य कराए जाएंगे। योजना के तहत कुछ काम सीधे लाभार्थियों को ध्यान में रखकर भी होंगे। जिससे ग्रामीणों को व्यक्तिगत लाभ मिल सके।

40 प्रतिशत बजट निर्माण सामग्री पर होगा खर्च

कुल बजट का लगभग 40 प्रतिशत हिस्सा निर्माण सामग्री और अन्य खरीद पर खर्च किया जाएगा। जबकि बाकी राशि मजदूरी में जाएगी। ब्लाक और ग्राम पंचायत स्तर पर अलग-अलग कामों का प्रस्ताव तैयार कर अनुमोदन कराया जाएगा। एक अप्रैल से ग्राम पंचायतों में काम धरातल पर शुरू होगा।

# पीरियड्स लीव अनिवार्य की तो महिलाओं को नहीं मिलेगी नौकरी, सुप्रीम कोर्ट ने याचिका खारिज की

(एजेंसी)।

**नई दिल्ली।** उच्चतम न्यायालय ने देश भर की महिला छात्रों और कामकाजी महिलाओं के लिए मासिक धर्म अवकाश (Menstrual Leave) की नीति बनाने की मांग वाली याचिका पर सुनवाई करने से साफ इनकार कर दिया है। कोर्ट ने कड़ी टिप्पणी करते हुए कहा कि इस तरह के अनिवार्य नियम महिलाओं के करियर के लिए घातक साबित हो सकते हैं और नियोक्ता उन्हें काम पर रखने से कतराने लगेंगे।

### कानूनी अनिवार्यता करियर कर देगी खत्म...

जस्टिस सूर्यकांत और जस्टिस जॉयमाल्य बागची की पीठ ने मामले की गंभीरता और इसके सामाजिक प्रभाव पर जोर देते हुए कहा कि अगर इस छुट्टी को कानूनी रूप से अनिवार्य बनाया गया, तो यह महिलाओं के खिलाफ भेदभाव को बढ़ावा दे सकता है।

### सीजेआई ने याचिकाकर्ता की दलीलों पर प्रतिक्रिया देते हुए कहा

"स्वेच्छा से छुट्टी देना एक सराहनीय कदम है, लेकिन जैसे ही आप इसे कानूनन अनिवार्य करेंगे, कोई भी महिलाओं को नौकरी नहीं देगा। कंपनियां और विभाग उन्हें न्यायपालिका या सरकारी नौकरियों में लेने से बचेंगे, जिससे उनका करियर पूरी तरह खत्म हो जाएगा।"

### रूढ़िवादिता को बढ़ावा देने का खतरा...

सुप्रीम कोर्ट ने चिंता व्यक्त की कि इस तरह की याचिकाएं अनजाने में महिलाओं के प्रति बनी रूढ़िवादी



सोच को और मजबूत कर सकती हैं। अदालत ने कहा कि मासिक धर्म को एक 'कमी' या 'बुरी चीज' के रूप में पेश करना महिलाओं को समाज में हीन दिखाने जैसा है। पीठ के अनुसार, नियोक्ता सवेतन अवकाश (Paid Leave) के बोझ से बचने के लिए पुरुष उम्मीदवारों को प्राथमिकता दे सकते हैं।

### नीति निर्धारण का काम सरकार का...

कोर्ट ने स्पष्ट किया कि यह मुद्दा न्यायिक हस्तक्षेप के बजाय नीतिगत निर्णय का है। अदालत ने सुझाव दिया कि-

- याचिकाकर्ता केंद्र सरकार और संबंधित विभागों के पास आवेदन भेज सकते हैं।
- सरकार सभी हितधारकों (Stakeholders) के साथ परामर्श कर इस दिशा में संभावनाओं की जांच कर सकती है।

### केरल और निजी क्षेत्र का दिया गया हवाला...

सुनवाई के दौरान याचिकाकर्ता शैलेंद्र मणि त्रिपाठी की ओर से पेश वरिष्ठ अधिवक्ता एम.आर. शमशाद ने तर्क दिया कि केरल जैसे राज्यों ने स्कूलों में छात्राओं को छूट दी है और कई निजी कंपनियां भी अपनी मर्जी से पीरियड्स लीव प्रदान कर रही हैं। हालांकि, कोर्ट ने स्पष्ट किया कि जो संस्थान स्वेच्छा से ऐसा कर रहे हैं वे स्वतंत्र हैं, लेकिन इसे पूरे देश में कानून के जरिए लागू करना व्यावहारिक रूप से महिलाओं के रोजगार के अवसरों को कम कर देगा।

# संसद में गूंजी बीमा कंपनियों की मनमानी, एक साल में 26,000 करोड़ के क्लेम खारिज

(एजेंसी)।

**नई दिल्ली।** स्वास्थ्य बीमा कंपनियों द्वारा लुभावने वादों के जाल में फंसाकर क्लेम के समय मरीजों को परेशान करने का मुद्दा राज्यसभा में गरमाया। आम आदमी पार्टी की सांसद स्वाति मालीवाल और राजद के संजय यादव ने शून्यकाल के दौरान बीमा कंपनियों और निजी अस्पतालों के 'गठजोड़' पर अंकुश लगाने की मांग की।



### IRDAI के आंकड़ों ने बढ़ाई चिंता...

सांसद स्वाति मालीवाल ने IRDAI (2024) के चौंकाने वाले आंकड़े पेश करते हुए दावा किया कि:

- एक ही साल में 26,000 करोड़ के बीमा क्लेम खारिज कर दिए गए।
- यह पिछले साल की तुलना में लगभग 20% अधिक है।
- सांसद ने आरोप लगाया कि बीमा कंपनियां सेलिब्रिटीज से विज्ञापन करवाकर 'मिनटों में अप्रूवल' का वादा करती हैं, लेकिन असलियत में मरीज अस्पताल और कंपनी के बीच 'टेनिस बॉल' बन जाता है।

### विदेशी फंड और अस्पतालों का 'मकड़जाल'...

सदन में चर्चा के दौरान निजी अस्पतालों और बीमा कंपनियों के बीच बढ़ते व्यापारिक हितों पर भी सवाल उठाए गए:

- **प्राइवेट इक्विटी फंड :** देश के बड़े अस्पताल और बीमा कंपनियां विदेशी प्राइवेट इक्विटी फंडों के नियंत्रण में हैं, जिनका लक्ष्य केवल भारी मुनाफा (रिटर्न) कमाना है।
- **हितों का टकराव :** स्वाति मालीवाल ने बताया कि ऑनलाइन बीमा बाजार का 93% हिस्सा नियंत्रित करने वाली कंपनियां अब अस्पतालों में भी निवेश कर रही हैं। यानी कंपनी ही पॉलिसी बेचेगी, अपने अस्पताल में भर्ती करेगी और क्लेम पर भी खुद ही फैसला लेगी।

### मानवीय संवेदनाओं का हनन...

चर्चा के दौरान उस दर्दनाक स्थिति का भी जिक्र हुआ जब बीमा कंपनी द्वारा क्लेम खारिज करने पर निजी अस्पताल शव देने तक से मना कर देते हैं। राजद सांसद संजय यादव ने कहा कि कंपनियां सालाना 3.20 लाख करोड़ रुपये का प्रीमियम वसूलती हैं, लेकिन भुगतान के वक्त तकनीकी पेच फंसाकर क्लेम का बड़ा हिस्सा काट लेती हैं।

# संसद में LPG पर संग्रामः विपक्ष की नारेबाजी और 1 लाख करोड़ का 'सुरक्षा कवच'

(एजेंसी)।

**नई दिल्ली।** संसद के बजट सत्र के दूसरे चरण का पांचवां दिन (शुक्रवार) हंगामे की भेंट चढ़ गया। LPG संकट, खाड़ी देशों में युद्ध और सांसदों के निलंबन को लेकर विपक्ष के भारी विरोध के कारण लोकसभा की कार्यवाही को 16 मार्च तक के लिए स्थगित करना पड़ा। जहां विपक्ष ने 'अरे मोदी जी, LPG' के नारे लगाए, वहीं सरकार ने इसे 'गैर-जिम्मेदाराना' व्यवहार करार दिया।

### वित्त मंत्री का मास्टरप्लान, 1 लाख करोड़ का 'बफर' फंड...

हंगामे के बीच वित्त मंत्री निर्मला सीतारमण ने देश की अर्थव्यवस्था को वैश्विक झटकों से बचाने के लिए एक बड़ी घोषणा की। उन्होंने कहा कि सरकार 1 लाख करोड़ का आर्थिक स्थिरीकरण कोष बना रही है।



- **उद्देश्य :** पश्चिम एशिया (ईरान-इजरायल-अमेरिका) के तनाव से पैदा होने वाली चुनौतियों का सामना करना।
- **फायदा :** यह फंड एक 'बफर' या सुरक्षा कवच के रूप में काम करेगा, जिससे वैश्विक संकट के बावजूद भारत की वित्तीय स्थिति स्थिर बनी रहे।

### सरकार का पक्ष...

- **निर्मला सीतारमण :** विदेशी घटनाक्रमों से मुश्किलें आ रही हैं, विपक्ष को सरकार के साथ कंधे से कंधा मिलाकर खड़ा होना चाहिए।
- **किरेन रिजिजू :** विपक्ष के नेता और सांसद सदन की गरिमा बिगाड़ रहे हैं। वे प्राइवेट मेंबर बिल का समय बर्बाद कर रहे हैं।
- **मनोज तिवारी :** देश में गैस-डीजल की कमी नहीं है, सपा-कांग्रेस नेताओं के घरों से सिलेंडर जब्त हो रहे हैं।

### विपक्ष का पक्ष...

- **शशि थरूर :** पेट्रोलियम मंत्री कह रहे हैं सप्लाई ठीक है, लेकिन धरातल पर स्टॉक की भारी कमी है। ग्रामीण इलाकों में स्थिति गंभीर है।
- **इकरा हसन (सपा):** सरकार की विदेश नीति दबाव में है। हमें ईरान के साथ खड़ा होना चाहिए था। कई राज्यों में गैस सिलेंडर नहीं मिल रहे।
- **टीएमसी का बड़ा कदम:** टीएमसी ने मुख्य चुनाव आयुक्त ज्ञानेश कुमार को पद से हटाने के खिलाफ दोनों सदनों में प्रस्ताव दिया है।

# बड़ी राहत : ईरान भारत को देगा 'सुरक्षित रास्ता', होर्मुज से रवाना हुआ पहला टैंकर

(एजेंसी)।

**नई दिल्ली।** देश में जारी ईंधन की चिंताओं के बीच कूटनीतिक मोर्चे से एक बेहद सकारात्मक खबर आई है। खाड़ी क्षेत्र में जारी भारी तनाव के बावजूद ईरान ने भारत को अपना 'सच्चा दोस्त' बताते हुए भारतीय झंडे वाले जहाजों को होर्मुज जलडमरूमध्य से सुरक्षित रास्ता देने का भरोसा दिया है।

### जग प्रकाश की सुरक्षित रवानगी

जहाजरानी मंत्रालय के विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा ने जानकारी दी कि ओमान से अफ्रीका जा रहा



भारतीय ईंधन टैंकर 'जग प्रकाश' होर्मुज के पूर्व से सुरक्षित रवाना हो गया है।

- **वर्तमान स्थिति :** ओमान की खाड़ी में भारत के 4 जहाज फंसे थे, जिनमें से 1 निकल चुका है।
- **बाकी जहाज :** अभी भी 3 जहाज वहां मौजूद हैं, जिन पर 76 भारतीय नाविक सवार हैं।
- **फारस की खाड़ी :** होर्मुज के पश्चिम में भारत के 24 जहाज फंसे हुए हैं, जिन पर कुल 677 भारतीय नागरिक मौजूद हैं।

### ईरानी राजदूत का बड़ा बयानः 'भारत हमारा दोस्त'...

नई दिल्ली में पत्रकारों से बात करते हुए भारत में ईरान के राजदूत मोहम्मद फतहाली ने दोस्ती का हाथ बढ़ाते हुए कहा कि भारत को सुरक्षित गलियारा दिया जाएगा। जब उनसे पूछा गया कि क्या ईरान भारतीय टैंकरों को रास्ता देगा, तो उन्होंने कहा, "हां, बिल्कुल। भारत हमारा पुराना और भरोसेमंद दोस्त है। आप अगले दो-तीन घंटों में ही इसका असर देखना शुरू कर देंगे।"

### क्यों तनावपूर्ण हैं खाड़ी के हालात?

पिछले दो हफ्तों से खाड़ी क्षेत्र में जहाजों की आवाजाही बुरी तरह प्रभावित है। 28 फरवरी को ईरान के सर्वोच्च नेता अयातुल्ला अली खामेनेई की मृत्यु के बाद उपजे क्षेत्रीय तनाव और अमेरिका-इजरायल के हमलों के जवाब में ईरान ने इस समुद्री रास्ते पर सख्ती बढ़ा दी है। चूंकि दुनिया का एक बड़ा तेल और गैस व्यापार इसी रास्ते से होता है, इसलिए भारत के लिए यह 'ग्रीन सिग्नल' राहत की बड़ी खबर है।

# कांग्रेस झूठ की दुकान, एक वादे के साथ चार झूठ देती है मुफ्त : पीएम मोदी

(एजेंसी)।

**गुवाहाटी।** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने अपने दो दिवसीय असम दौरे के पहले दिन विपक्षी दल कांग्रेस पर तीखा हमला बोला। उन्होंने 24,250 करोड़ की परियोजनाओं की सौगात देते हुए कहा कि कांग्रेस की गलत नीतियों और 'झूठ की राजनीति' ने असम को दशकों तक विकास से वंचित रखा। उन्होंने चाय बागान के श्रमिकों से भावनात्मक जुड़ाव जताते हुए कहा कि आपकी चाय बेचकर ही मैं आज इस पद पर पहुँचा हूँ।

### चाय बागानों का कर्ज और विकास की सौगात...

पीएम मोदी ने असम के लिए कुल 47,800 करोड़ के विकास कार्यो का खाका खींचा है। पहले दिन उन्होंने:

- 24,250 करोड़ के प्रोजेक्ट्स का उद्घाटन और शिलान्यास किया।
- नॉर्थ ईस्ट के लिए 3 नई ट्रेनों को हरी झंडी दिखाई।
- शनिवार (14 मार्च) को वे सिलचर में 23,550 करोड़ की अन्य परियोजनाओं को देश को समर्पित करेंगे।

### प्रधानमंत्री के भाषण की 7 बड़ी बातें...

- **किसानों के लिए तकनीक :** पीएम ने कहा कि UPI के जरिए सीधे खातों में पैसा भेजने की जो व्यवस्था भारत में है, वह कई विकसित देशों के पास भी नहीं है।
- **MSP का हिसाब :** उन्होंने तुलना करते हुए बताया कि कांग्रेस के 10 साल में किसानों को 6.5 लाख



करोड़ MSP मिली, जबकि NDA के कार्यकाल में अब तक 20 लाख करोड़ से ज्यादा दिए जा चुके हैं।

- **यूरिया पर सब्सिडी :** किसानों पर बोझ कम करने के लिए सरकार ने 12 लाख करोड़ से अधिक की सब्सिडी यूरिया पर खर्च की है।
- **आत्मनिर्भर कृषि :** विदेशी युद्धों (ईरान-इजरायल संकट के संदर्भ में) के प्रभाव से बचने के लिए उन्होंने भारतीय कृषि को बाहरी निर्भरता से मुक्त करने और आत्मनिर्भर बनाने पर जोर दिया।
- **बोडोलैंड में शांति :** पीएम ने कहा कि कोकराझार जैसे क्षेत्रों ने दशकों तक हिंसा झेली, लेकिन आज बोडोलैंड शांति और प्रगति के पथ पर है।
- **झूठ की दुकान:** कांग्रेस पर तंज कसते हुए मोदी ने कहा, 'कांग्रेस झूठे वादों की दुकान है, जो एक वादे के साथ चार झूठ मुफ्त देती है।'
- **घुसपैठ पर कड़ा संदेश :** उन्होंने जनता से अपील की कि आने वाले चुनाव में कांग्रेस को सजा दें और यह स्पष्ट कर दें कि असम में घुसपैठियों के लिए कोई जगह नहीं है।

### भावुक संबोधन...

'टी-गार्डन के किसानों का सम्मान करना मेरे लिए अपना कर्ज चुकाने जैसा है। मां कामाख्या ने मुझे चाय बागान के लोगों की सेवा का मौका दिया है।'

– नरेंद्र मोदी, प्रधानमंत्री

# वित्तीय चुनौती से निपटने के लिए एक लाख करोड़ का आर्थिक फंड, वित्त मंत्री ने सदन में दी जानकारी

(एजेंसी)।

**नई दिल्ली।** पश्चिम एशिया संकट से उत्पन्न होने वाले किसी भी वित्तीय संकट से निपटने के लिए सरकार तैयार है। वित्त मंत्री निर्मला सीतारमण ने सोमवार को संसद में बताया कि युद्ध की वजह से जारी संकट को देखते हुए एक लाख करोड़ रुपए के आर्थिक स्थिरता फंड बनाने का फैसला किया गया है।

इस फंड का इस्तेमाल युद्ध की वजह से होने वाले आर्थिक गतिरोध को दूर करने में किया जाएगा। पूरक अनुदान के दूसरे बैच की मांग पर चर्चा के दौरान वित्त मंत्री ने यह भी कहा कि इस फंड के निर्माण या अन्य वजहों से



भी देश के राजकोषीय घाटे में बढ़ोतरी नहीं होगी और चालू वित्त वर्ष में राजकोषीय घाटा लक्ष्य के मुताबिक जीडीपी का 4.4 प्रतिशत ही रहेगा।

### कितना खर्च कर पाएगी सरकार?

पूरक अनुदान के दूसरे चरण की मांग को लोक सभा में पारित कर दिया गया। इसके साथ ही चालू वित्त वर्ष में सरकार अतिरिक्त रूप से 2.81 लाख करोड़ रुपए खर्च कर पाएगी। सीतारमण ने कहा कि युद्ध की वजह से किसी भी प्रकार की सप्लाई चेन के बाधित होने, अर्थव्यवस्था के किसी सेक्टर को नुकसान या किसी भी अन्य वित्तीय असर को कम करने के लिए आर्थिक स्थिरता फंड का उपयोग किया जाएगा।

उन्होंने यह भी भरोसा दिया कि युद्ध संकट के कारण किसानों को खाद व अन्य सप्लाई को प्रभावित नहीं होने दिया जाएगा। उन्होंने क हा कि संकट के इस दौर में विपक्षी पार्टियों को सरकार का साथ देना चाहिए।

# नेशनल हाईवे टोल कलेक्शन में बंपर उछाल, 5 साल में 120% बढ़कर 61 हजार करोड़ के पार





(एजेंसी)।

**नई दिल्ली।** देश में नेशनल हाईवे से होने वाली टोल वसूली में पिछले पांच सालों में करीब 120 प्रतिशत की बढ़ोतरी हुई है। जिसके चलते टोल वसूली से होने वाली कमाई 61 हजार करोड़ के पार हो गई है। गुरुवार को यह जानकारी सड़क एवं परिवहन व राजमार्ग मंत्री नितिन गडकरी ने लोकसभा में दी।

गडकरी ने लोकसभा में बताया कि देश में टोल कलेक्शन में पांच सालों में लगातार बड़ी वृद्धि दर्ज की गई है। 2024-25 में यह राशि 61,408 करोड़ रुपए रही। आंकड़ों के मुताबिक, वित्त वर्ष 2020-21 में 27,926.67 करोड़ रुपए टोल वसूला गया था।

### टोल के आकंड़े

| साल | टोल (करोड़ में) |
|---|---|
| 2020-21 | 27,926.67 |
| 2021-22 | 33,928.66 |
| 2022-23 | 48032. 40 |
| 2023-24 | 55,882.12 |
| 2024-25 | 61.408.15 |

# 'पैनिक बुकिंग' न करें, उत्पादन 30% बढ़ा : सरकार

(एजेंसी)।

**नई दिल्ली।** देश में रसोई गैस की कमी को लेकर फैल रही अफवाहों के बीच केंद्र सरकार ने नागरिकों को आश्वस्त किया है कि आपूर्ति पूरी तरह सामान्य है। पेट्रोलियम और प्राकृतिक गैस मंत्रालय की संयुक्त सचिव सुजाता शर्मा ने स्पष्ट किया कि 5 मार्च की तुलना में घरेलू LPG उत्पादन में 30% की बढ़ोतरी की गई है, इसलिए घबराने या जरूरत से ज्यादा बुकिंग करने की कोई आवश्यकता नहीं है।

### उत्पादन और रिफाइनिंग में भारत 'आत्मनिर्भर'...

मंत्रालय ने डेटा साझा करते हुए बताया कि भारत की रिफाइनिंग क्षमता





258 मिलियन मीट्रिक टन है। वर्तमान में सभी रिफाइनरियां अपनी 100% या उससे भी अधिक क्षमता पर काम कर रही हैं।

### सरकार की ओर से जारी मुख्य बिंदु...

- **ईंधन में आत्मनिर्भरता :** पेट्रोल और डीजल के मामले में भारत आत्मनिर्भर है, इनके आयात की कोई आवश्यकता नहीं है।
- **कच्चे तेल का स्टॉक :** रिफाइनरियों के पास कच्चे तेल का पर्याप्त भंडार मौजूद है और सप्लाई चेन में कोई बाधा नहीं है।
- **वितरण नेटवर्क :** देश के 25,000 वितरकों में से कहीं से भी स्टॉक खत्म होने की कोई सूचना नहीं मिली है।

### कमर्शियल सिलेंडर की जिम्मेदारी राज्यों के पास

व्यावसायिक गैस की आपूर्ति को सुव्यवस्थित करने के लिए सरकार ने इसे राज्य सरकारों के सुपुर्द कर दिया है। राज्यों से अनुरोध किया गया है कि वे प्राथमिकता तय करें ताकि अस्पतालों, शिक्षण संस्थानों और अन्य आवश्यक सेवाओं को निर्बाध आपूर्ति मिलती रहे।

### PNG अपनाने की सलाह...

शहरी क्षेत्रों के उन व्यावसायिक उपभोक्ताओं के लिए, जिन्हें LPG आपूर्ति में कठिनाई हो रही है, सरकार ने वैकल्पिक समाधान सुझाया है। मंत्रालय ने अपील की है कि वे अपने स्थानीय सिटी गैस डिस्ट्रीब्यूशन नेटवर्क से संपर्क कर PNG कनेक्शन प्राप्त करें, ताकि गैस की निर्भरता और उपलब्धता का संकट दूर हो सके।

### अफवाहों से बचने की अपील...

संयुक्त सचिव सुजाता शर्मा ने कहा, "घरेलू उपभोक्ताओं को PNG, CNG और LPG की आपूर्ति बिना किसी कटौती के सुनिश्चित की जा रही है। नागरिक अफवाहों पर ध्यान न दें। पेट्रोल पंपों पर भी पर्याप्त ईंधन उपलब्ध है।"

सरकार ने साफ किया है कि वर्तमान में स्थिति पूरी तरह नियंत्रण में है और मांग को पूरा करने के लिए उत्पादन को रिकॉर्ड स्तर पर बढ़ा दिया गया है।

# ‘कळ्यानिळ्या रेषा’ आत्मचरित्रासाठी

## राजू बाविस्कर यांना साहित्य अकादमी पुरस्कार

**नवी दिल्ली, प्रतिनिधी**

साहित्य अकादमीने आज (दि. १६ मार्च) २४ भारतीय भाषांमधील आपल्या वार्षिक पुरस्कारांची घोषणा केली. यामध्ये आत्मचरित्र या श्रेणीत राजू बाविस्कर यांच्या ‘कळ्यानिळ्या रेषा’ या पुस्तकाची निवड करण्यात आली आहे. यंदा या प्रतिष्ठित सन्मानासाठी आठ काव्यसंग्रह, चार कादंबऱ्या, सहा कथासंग्रह, दोन निबंधात्मक ग्रंथ, एक साहित्यिक समीक्षा, एक आत्मचरित्र आणि दोन आठवणींच्या पुस्तकांची निवड करण्यात आली आहे.



साहित्य अकादमीने आत्मचरित्र या श्रेणीत राजू बाविस्कर यांच्या ‘कळ्यानिळ्या रेषा’ या मराठी आत्मचरित्राची निवड केली आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह (कोरीव ताम्रपट), शाल आणि एक लाख रुपये रोख असे आहे. येत्या ३१ मार्च २०२६ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित समारंभात हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

**काव्यसंग्रहः** या श्रेणीत ‘श्रेष्ठ कविता’ (बंगाली), ‘ठाकूर सत्सयी’ (डोगरी), ‘भट्टखडकी’ (गुजराती), ‘नजदवानैक्य पोत आलव’ (काश्मिरी), ‘पदापुराण’ (ओडिया), ‘प्रस्थानचतुष्टये ब्रह्मघोषः’ (संस्कृत), नंदिनी सिधा रेड्डी यांचा ‘अनिमेषा’ (तेलगू) आणि ‘सफर जारी है’ (उर्दू) या काव्यसंग्रहांचा समावेश आहे.

**कादंबरीः** निवडलेल्या कादंबऱ्यांमध्ये ‘कर्ही खेलर साधू’ (आसामी), ‘द्वंग्नवी लामा म्वन्से गाथ्वन’ (बोडो), ‘क्रिम्सन स्प्रिंग’ (इंग्रजी) आणि ‘मायामानुष्यार’ (मल्याळम) यांचा समावेश आहे.

**कथासंग्रहः** या श्रेणीत ‘दादा सीरिसू तंदे’ (कन्नड), ‘कांगलामद्रिबा इफूत’ (मणिपुरी), ‘सेफ्टी किट’ (पंजाबी), ‘भरखमा’ (राजस्थानी), ‘मिड बिरना चेन्ने साओन इनाग सगाई’ (संताली) आणि ‘वाघू’ (सिंधी) या पुस्तकांची निवड झाली आहे.

# खामेनी यांनी वापरलेले विमान इस्रायलने नष्ट केले

**तेल अवीव, वृत्तसंस्था**

इस्रायलच्या सेनेने हा दावा केला आहे की अयातुल्ला अली खामेनी यांनी वापरलेले विमान नष्ट केले आहे. इस्रायलच्या सेनेने हे सांगितले की रविवारी रात्री त्यांनी मेहराबाद विमानतळावर असलेले खामेनी यांनी वापरलेले विमान उद्ध्वस्त केले. इस्रायलच्या सैन्याने हा दावाही केला आहे की या विमानाचा उपयोग इराणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लष्कराशी संबंधित अधिकाऱ्यांनीही वापरले होते आम्ही ते नष्ट केले.

२८ फेब्रुवारीला इस्रायल आणि अमेरिकेने संयुक्त कारवाई करत इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांचा घराला लक्ष्य केलं. त्यांच्या घरावर क्षेपणास्त्र डागण्यात आली. या हल्ल्यात खामेनी यांचा मृत्यू झाला. त्यानंतर इराणमध्ये ४० दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. आता इस्रायलने अयातुल्ला अली खामेनी वापरत होते ते विमानही नष्ट केल्याचा दावा केला आहे. तिन्ही देशांमध्ये युद्ध सुरु झालं आहे. या युद्धाला १७ दिवस झाले आहेत. या युद्धाचा परिणाम जगातल्या देशांवर होतो आहे. कारण हे देश इराणवर इंधनासाठी अवलंबून आहेत. या युद्धानंतर भारतात एलपीजीचा तुटवडा जाणवतो आहे.



**श्री.सिद्धिविनायक गणपती मंदिरात भारतीय टी २० विश्वचषक २०२६ विजेत्या क्रिकेट संघाचे प्रशिक्षक गौतम गंभीर व कर्णधार सुर्यकुमार यादव यांनी क्रिकेट विश्वचषकासह "श्रीं" चे दर्शन घेतले. यावेळी श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाचे मा. कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी, विश्वस्त मा. सर्वश्री राहुल लोंढे, मा.महेश मुदलियार,मा जितेंद्र राऊत, मा.सुदर्शन सांगळे, कार्यकारी अधिकारी सौ.वीणा पाटील व उप कार्यकारी अधिकारी डॉ.मा. संदिप राठोड उपस्थित होते.यावेळी गणेश भक्तांनी टी २० विश्वचषक बघण्यासाठी श्री सिद्धिविनायक मंदिर व आसपासच्या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. मंदिर परिसर इंडिया इंडिया, चक दे इंडिया, वंदे मातरम, सूर्या सूर्या घोषणांनी दुमदुमून गेला.**

# गॅसवर नाही तर वाफेवर शिजवला जातो आहार

## छत्रपती संभाजीनगरमध्ये अनोखा प्रयोग

**छ. संभाजीनगर, प्रतिनिधी**

गॅस तुटवडा निर्माण झाल्यामुळं सगळीकडं भीतीचं वातावरण सर्वसामान्यांमध्ये पाहायला मिळत आहे. हॉटेल व्यवसायिक आणि उद्योजकांच्या व्यवसायावर याचा परिणाम आहे. त्यामुळं त्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसत आहे. मात्र त्यात एक संस्था अशी आहे जी रोज ३५ ते ४० हजार लोकांचा आहार तयार करत आहे. ते देखील अवघा दहा टक्के गॅसचा वापर करून. विश्वास बसत नसेल मात्र शालेय पोषण आहार आणि गरजू रुग्णांच्या नातेवाईकांना मोफत आहार पुरवणाऱ्या 'अन्न अमृत फाउंडेशन'तर्फे वाफेच्या सहाय्यानं आहार शिजवला जात आहे. फक्त चपाती तयार करण्यासाठी आणि फोडणी देण्यासाठीच गॅस वापर होत असल्यानं टंचाई असूनही त्यांच्या सेवेवर परिणाम झालेला नाही. मागील पंधरा वर्षांपासून त्यांनी केलेला प्रयोग टंचाईमध्ये इतरांना प्रेरणा देतोय.



"पोषण आहार योजनेंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना पोषक अन्न देण्याचं काम शहरातील इस्कॉन केंद्रामार्फत 'अन्न अमृत फाउंडेशन' करत आहे. या केंद्रावर गॅसचा वापर अगदी कमी करून रोज ३५ हजार विद्यार्थ्यांच्या पोषण आहारासोबत गरजू रुग्णांच्या नातेवाईकांसाठी भोजनाची व्यवस्था केली जाते. या केंद्रात वीज, सोलरमार्फत होणारे गरम पाणी यांच्या माध्यमातून वाफेच्या सहाय्यानं आहार शिकवण्याचं काम केलं जातं. मोठ्या खोलीमध्ये सहाशे लिटर क्षमता असलेले सात मोठे कुकर लावले आहेत. त्यामुळं एकाच वेळी चार हजार किलो अन्न वाफेवर शिजवलं जात. २०१२ पासून या प्रयोगाला हळूहळू सुरुवात करण्यात आली होती. आज त्याला मोठं स्वरूप प्राप्त झालं आहे. टंचाईच्या काळात हीच व्यवस्था उपयोगी ठरत आहे," अशी माहिती अन्न अमृत फाउंडेशनचे व्यवस्थापक सुदर्शन पोटभरे यांनी दिली.

"सुरुवातीला गॅसचा वापर केला नंतर हळूहळू सोलर आणि वाफेच्या माध्यमातून अन्न शिकवण्याच्या प्रक्रिया विकसित केली. सध्या ९० टक्के खाद्यपदार्थ वाफेवर तयार होतात, तर गॅसचा वापर अवघा १० टक्क्यांवर आला आहे. सुरुवातीला खर्च कमी व्हावा आणि पोषणमूल्य जपलं जावं असा उद्देश होता. मात्र, आज हा प्रयोग फायदेशीर ठरत आहे. वेगवेगळ्या प्रकारची खिचडी, सांबर भात, उसळ, आमटी भात, पुलाव, मटर पनीर राईस, रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांसाठी चपाती, भाजी, वरण, भात असे आठवड्याचे प्रत्येक दिवशी वेगवेगळे पदार्थ शिजवले जातात. चपाती भाजण्यासाठी आणि भाज्यांना किंवा डाळीला फोडणी देण्यासाठी गॅसचा वापर केला जातो. उर्वरित प्रक्रिया वाफेवर केली जाते," अशी माहिती अन्न अमृत फाउंडेशनचे व्यवस्थापक सुदर्शन पोटभरे यांनी दिली.

"महानगरपालिकेच्या माध्यमातूनच हे अन्नछत्र काम करत असल्यानं शालेय विद्यार्थी आणि रुग्णांच्या नातेवाईकांना योग्य सेवा मिळावी, याकरिता सिलेंडर वेळेवर मिळावं असं पत्र दिलं होतं. त्यावर मनपा आयुक्तांनी जिल्हाधिकारी यांना विनंती केल्यामुळं वेळेवर गॅस पुरवठा होत आहे. रोज एक ते दोन सिलेंडरच वापरलं जात असल्यानं अधिक टंचाई भासत नाही," असं सुदर्शन पोटभरे यांनी सांगितलं.

# ऑस्कर २०२६ : ‘वन बॅटल आफ्टर अनदर’ सर्वोत्तम चित्रपट

## मायकेल बी. जॉर्डन सर्वोत्तम अभिनेता, जेसी बक्ली सर्वोत्तम अभिनेत्री

**लॉस एंजेलिस, वृत्तसंस्था**

लॉस एंजेलिस येथील डॉल्बी थिएटरमध्ये ९८वे वार्षिक अकादमी पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. हॉलिवूडमधील नामांकित कलाकार आणि दिग्दर्शक एकत्र येऊन वर्षातील सर्वोत्तम चित्रपटांचा गौरव करण्यासाठी या सोहळ्यात सहभागी झाले. यावर्षी भारतासाठी विशेष आनंदाची बाब म्हणजे अभिनेत्री प्रियांका चोप्रा जोनस या पुरस्कार सोहळ्यात सादरकर्त्यांपैकी एक होत्या. तसेच भारतीय-अमेरिकन चित्रपट निर्माती गीता गंधभीर यांना ‘सर्वोत्तम माहितीपट चित्रपट’ आणि ‘सर्वोत्तम माहितीपट लघुपट’ या दोन विभागांत नामांकन मिळाले होते; मात्र त्यांना दोन्ही विभागांत पुरस्कार मिळू शकला नाही.

हॉलिवूडच्या महिनाभर चालणाऱ्या पुरस्कार हंगामाचा शेवट या सोहळ्याने झाला. ‘सिनर्स’ आणि ‘वन बॅटल आफ्टर अनदर’ हे चित्रपट प्रमुख दावेदार मानले जात होते. मात्र यंदाच्या पुरस्कारांसाठीची स्पर्धा अत्यंत चुरशीची आणि अनिश्चित राहिली.

दिग्दर्शक रायन कुग्लर यांच्या ‘सिनर्स’ या व्हॅम्पायर विषयावरील नाट्यमय चित्रपटाला विक्रमी १६ नामांकने मिळाली होती. या चित्रपटाला यापूर्वी ‘एसएजी अभिनेता पुरस्कार’ सोहळ्यात सर्वोच्च सन्मान मिळाल्याने त्याची जोरदार चर्चा होती. या चित्रपटासाठी अभिनेता मायकेल बी. जॉर्डन याने दुहेरी भूमिकेसाठी सर्वोत्तम अभिनेत्याचा ऑस्कर पटकावला. हा त्याचा या विभागातील पहिलाच ऑस्कर पुरस्कार ठरला. या पुरस्कारासाठी लिओनार्डो डिकॅप्रियो (‘वन बॅटल आफ्टर अनदर’), इथन हॉक (‘ब्लू मून’), वॅग्नर मोरा (‘द सीक्रेट एजंट’) आणि टिमोथी शॅलामे (‘मार्टी सुप्रीम’) यांच्यातही जोरदार स्पर्धा होती.



या सोहळ्यात एक ऐतिहासिक क्षणही नोंदला गेला. ‘सिनर्स’ या चित्रपटासाठी छायाचित्रण केलेल्या ऑटम ड्युराल्ड अर्कापॉ या ‘सर्वोत्तम छायाचित्रण’चा ऑस्कर जिंकणाऱ्या पहिल्या वर्णीय महिला ठरल्या.

‘हॅम्नेट’ या चित्रपटातील अभिनयासाठी अभिनेत्री जेसी बक्ली हिला ‘सर्वोत्तम अभिनेत्री’चा ऑस्कर मिळाला. मॅगी ओ’फॅरेल यांच्या कादंबरीवर आधारित या चित्रपटात तिने शेक्सपियर यांच्या पत्नी अ‍ॅग्नेसची भूमिका साकारली आहे. या विभागात एमा स्टोन (‘ब्युगोनिया’), केट हडसन (‘सॉग संग ब्लू’), रोज बर्न (‘इफ आय हॅड लेग्स आयड किक यू’) आणि रेनेट राइन्स्वे (‘सेंटिमेंटल व्हॅल्यू’) यांना मागे टाकत तिने हा सन्मान मिळवला. जेसी बक्ली ही सर्वोत्तम अभिनेत्रीचा ऑस्कर जिंकणारी पहिली आयरिश अभिनेत्री ठरली.

‘सिनर्स’ला सर्वाधिक १६ नामांकने मिळाली असली, तरी पुरस्कारांच्या बाबतीत ‘वन बॅटल आफ्टर अनदर’ या चित्रपटाने बाजी मारली. १३ नामांकनांपैकी या चित्रपटाने एकूण ६ ऑस्कर जिंकले आणि २०२६ मधील सर्वाधिक पुरस्कार मिळवणारा चित्रपट ठरला. दिग्दर्शक पॉल थॉमस अँडरसन यांनी ‘सर्वोत्तम दिग्दर्शक’चा पुरस्कार जिंकला. याशिवाय या राजकीय थ्रिलर चित्रपटाने ‘सर्वोत्तम चित्रपट’, ‘सर्वोत्तम सहाय्यक अभिनेता’ (शॉन पेन), ‘सर्वोत्तम रूपांतरित पटकथा’, ‘सर्वोत्तम संपादन’ आणि ‘सर्वोत्तम कास्टिंग’ असे पुरस्कारही मिळवले. कॅसँड्रा कुलुकुंडिस यांनी ‘कास्टिंग’साठी दिला जाणारा पहिलाच अकादमी पुरस्कार जिंकला, हीदेखील उल्लेखनीय बाब ठरली.

यावर्षीच्या सोहळ्यातील आणखी एक विशेष क्षण म्हणजे ७५ वर्षीय एमी मॅडिगन यांना ‘वेपन्स’ या भयपटातील ‘आंट ग्लॅडिस’ या भूमिकेसाठी ‘सर्वोत्तम सहाय्यक अभिनेत्री’चा ऑस्कर मिळाला. त्यांच्या पहिल्या नामांकनानंतर तब्बल ४० वर्षांनी त्यांनी हा पुरस्कार जिंकला, त्यामुळे नामांकनांमधील सर्वाधिक अंतराचा विक्रमही त्यांनी नोंदवला असल्याचे सांगितले जाते. या वर्षीच्या ऑस्कर सोहळ्याचे सूत्रसंचालन विनोदी कलाकार कोनन ओ’ब्रायन यांनी सलग दुसऱ्या वर्षी केले.

# गॅस टंचाईमुळे दुधाच्या पिशव्यांचे उत्पादन मंदावले

**मुंबई, प्रतिनिधी**

सुरू असलेल्या एलपीजी टंचाईचा परिणाम आता दूध वितरणावरही होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दूध पाश्चरायझेशन प्रक्रियेसाठी एलपीजी किंवा पाईपद्वारे मिळणाऱ्या गॅसचा सातत्याने पुरवठा आवश्यक असतो. मात्र सध्या गॅसच्या कमतरतेमुळे दूध पॅकिंगसाठी लागणाऱ्या पिशव्या व पॉलिथिन पिशव्यांसारख्या पॅकेजिंग साहित्याचीही टंचाई जाणवत आहे.

याशिवाय हॉटेल आणि उपाहारगृहांसारख्या मोठ्या ग्राहकांनी दूध खरेदी कमी केली आहे. त्यामुळे दुग्धव्यवसायिकांना साठवलेले दूध कमी दरात विकण्याची वेळ येत आहे.

गोवर्धन डेअरीचे संस्थापक अध्यक्ष देवेंद्र शहा यांनी सांगितले, “दूध पॅकिंगसाठी लागणाऱ्या पिशव्या आणि कार्टन उपलब्ध नाहीत, कारण हे साहित्य तयार करणाऱ्या उद्योगांना उत्पादनासाठी आवश्यक गॅस मिळत नाही. आमच्याकडे सध्या फक्त दहा दिवस पुरेल इतकाच साठा शिल्लक आहे.”

चेंबूरमधील सुरेश डेअरीचे व्यवस्थापक शरीब शेख म्हणाले, “प्लास्टिक पिशव्यांची कमतरता आहे. ही परिस्थिती अशीच राहिली तर पुढील दहा दिवसांत गंभीर अडचण निर्माण होईल. वाहतूकसह सर्व उत्पादन खर्च वाढले आहेत.”

दरम्यान, तबेलाधारक आणि दुग्धव्यवसायिकही चिंतेत आहेत. हॉटेल, उपाहारगृहे आणि इतर संस्थात्मक ग्राहकांनी खरेदी कमी केल्याने म्हैस व गाईच्या दुधाची मागणी घटली आहे.



बॉम्बे मिल्क प्रोड्युसर्स असोसिएशनचे अध्यक्ष सी. के. सिंह, जे स्वतःही दूध विक्रीचा व्यवसाय करतात, म्हणाले, “शुक्रवारी म्हशीच्या दुधाच्या एकूण २३० किलोच्या तीन मोठ्या ऑर्डर रद्द झाल्या. एक ग्राहक १५० किलो, दुसरा ५० किलो आणि तिसरा ३० किलो दूध घेत असे. आता आम्हाला हे दूध खुले बाजारात अर्ध्या किमतीत विकावे लागत आहे. लहान डेअऱ्यांकडे साठवणुकीची मर्यादित क्षमता असल्याने अतिरिक्त दुधाचे काय करावे, हा प्रश्न निर्माण झाला आहे.” विलेपार्ले येथील श्री नारायण डेअरीचे ऋषी जोशी म्हणाले, “आम्ही बासुंदी आणि श्रीखंडसारखी दुग्धजन्य उत्पादने तयार करतो. सध्या गुढीपाडवा जवळ आला असून हा आमच्यासाठी व्यवसायाच्या दृष्टीने महत्त्वाचा काळ असतो. मात्र गॅसअभावी ही उत्पादने तयार करता येत नाहीत. पनीर तयार करण्यासाठी मी विद्युत बॉयलर बसवला आहे, पण तो गॅसचा पूर्ण पर्याय ठरू शकत नाही.” शहरातील अनेक डेअऱ्यांशी संपर्क साधल्यानंतर त्यांनी सांगितले की, एलपीजीची टंचाई कायम राहिली तर परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते.

Across State मराठी अक्रॉस मुंबई
युनायटेड महाराष्ट्रीय साऊथ इंडियन फाऊंडेशन





संजय मं. भैरे
संपादक
महाराष्ट्र उपाध्यक्ष
डिजिटल मिडीया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र





अक्रॉस मबई यह सप्ताहिक स्वामी संजय तेजसिग खिमेसरा के लिए मुद्रक, प्रकाशक- संजय मगेश भैरे द्वारा सोमानी प्रिटिंग प्रेस, गाला न. ४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेंट, सोनावाला क्रॉस रोड-२, नियर जवाहर नगर, फाटक ब्रीज, गोरेगांव पर्व), मबई- ४०००६३ से मद्रित और राजेंद्र पार्क, बिल्डिग न. २/२०, चोथा माला, स्टेशन रोड, गोरेगाव (प.) मबई-४००१०४ वहा प्रकाशित किया। संपादक संजय मंगेश भैरे फोन: ०२२-४९७१९९३२ ईमेल: sanjay.bhaire@gmail.com RNI NO: MAHBIL/2016/68485